पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, जुलै २०२६, खंड २५, अंक ४, पृष्ठे ७६

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ■ वरूणकृपा

५ ■ हिंसामुक्त समाजासाठी स्कॉटलंडचे प्रयोग

१३ ■ अंतराळभरारीची नवी पहाट

१८ ■ करडा संशोधक, सच्चा ज्ञानव्रती

२४ ■ व्यापारवाद आणि वसाहतवाद

**पुरवणी**

३० ■ बदलते जागतिक अर्थकारण व भारत

**उजळणी**

४६ ■ दांडगे वाचन करणारे तात्यासाहेब


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

**वार्षिक वर्गणी २००/– रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/मनीऑर्डर/पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. **त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१–२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : ०२०–२५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई–मेल : ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड २५ (अंक ४)**
**जुलै २०२६**
**संपादक – अभय टिळक**
**सहयोगी संपादक – पराग पोतदार**

- **अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?**
- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

## अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी अनेक माहिती संदर्भासह पुरविणे.**

***अर्थबोधपत्रिका कशी साकारते?***

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याल अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

---

- या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि / किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.
- अंकातील लेख आपण नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. **यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

संपादकीय

# वरूणकृपा

'सुपर एल् निनो' या शब्दसंहतीने चालू वर्षीच्या मार्च–एप्रिल महिन्यापासूनच आपल्या सगळ्यांच्या पोटात खड्डा पाडलेला होता. गेल्या जवळपास दीड शतकांमध्ये आपण अनुभवली नसलेली पर्जन्यमानातील घट या वर्षी संभवते, यंदाचा पावसाळा हा कमालीचा बेभरवशाचा ठरेल, या वर्षीच्या पावसाळ्यात जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांतच काय तो पाऊस पडेल, परिणामी पुढील वर्षीचा उन्हाळा तर कल्पनातीत शाबीत होईल... अशा प्रकारची भाकिते विविध माध्यमांद्वारे आपल्यावर चहूंकडून सतत आदळत होती. परंतु, त्याच वेळी, दुसरीकडे, 'एल् निनो' सक्रिय बनला की केवळ अवर्षण अथवा अपुरी पर्जन्यवृष्टीच संभवते असे नाही, काही ठिकाणी अवर्षण तर काही ठिकाणी धुवांधार पाऊस असेही चित्र दिसू शकते, अशा प्रकारचे पूर्वानुभवाधारित आणि अभ्यासपूत अंदाजदेखील डॉ. रंजन केळकर यांच्यासारखे अभ्यासक व्यक्त करत होते. त्यांमुळे, एक वेळ खरीपाचा हंगाम नेहेमीसारखा झाला नाही तरी परवडले; परंतु, निदान पिण्यासाठी वर्षभर पुरेल इतके तरी पाणी आभाळातून पडून धरणे भरू देत, असे सांकडे जो तो वरूणराजाला त्याच्या परीने घालत होता. अखेर, वरूणराजा पावला! राज्यातील जवळपास सगळ्यांच धरणांमधील जलसाठा जुलै महिन्यात सर्वत्रच बरसलेल्या पावसामुळे समाधानकारक पातळीवर स्थिरावलेला आहे. येत्या वर्षात पाणीटंचाईला आणि परिणामी पाणीकपातीला सामोरे जावे लागणार नाही म्हणून सगळ्यांनी समाधानाचे सुस्कारे सोडलेले आहेत. या सगळ्यांत, विलक्षण अस्वस्थ करणारी एक बाब, खास करून, वृत्तपत्रादी माध्यमांद्वारे प्रकर्षाने पुढ्यात आली. धरणांमधील पाणीसाठा आश्वासक स्तरावर पोहोचल्यानंतर, 'चला, आता पाणीकपातीचे संकट टळले,' अशा आशयाच्या व शीर्षकाच्या बातम्या वृत्तपत्रांमध्ये झळकल्या.

कमी–अधिक पावसापायी उद्‌भवणाऱ्या पाणीटंचाईच्या संभाव्य सावटाकडे, वस्तुतः, 'पाणीवापराच्या जबाबदार संस्कृतीचे धडे गिरवण्याचा पर्वकाळ' म्हणून बघण्याची प्रगल्भता, एक समाज म्हणून, आपण केव्हा अंगी बाणवणार? पाणीकपात हे संकट नसून काटकसरीने पाणी वापरण्याचे कौशल्य आत्मसात करण्याची ती संधी होय, ही विचारदिशा आपण कधी तरी चोखाळणार आहोत की नाही? भरपूर पाऊस झाला, धरणे भरली म्हणजे आता वर्षभर अवाच्यासवा, बेदरकारपणे पाणी वापरायला आपण मोकळे आहोत, ही भावना समाजमनामध्ये व्यापक स्तरावर बळकट बनणे ही बाब विलक्षण खेदजनक आणि संतापकारक अशीच आहे. जीवनावश्यक बाब म्हणून पाणी नि:शुल्क मिळावे, पुन्हा ते मोजून मिळता कामा नये, आम्ही नळ सोडू तेव्हा पाण्याची धार वाहायला हवी... अशी आपली मानसिकता बनलेली आहे.

मुळात, पाणी ही मूल्यवान चीज आहे, वाढत्या लोकसंख्येबरोबर पाण्याची गरज वाढती राहणार आहे, पाण्याचे पर्यायी वापरही विविधांगी आहेत अशा परिस्थितीत पाण्यासारखी निसर्गसिद्ध चीज काटकसरीने व जबाबदारपणेच वापरली पाहिजे, ही जाणीव आपण अंगी बाणवून घेणार की नाही? पाणी प्रत्येकाने मोजूनच वापरले पाहिजे. शासनसंस्थेनेदेखील पाण्यासारखा जिन्नस, त्याचे संकलन, साठवण, शुद्धीकरण, वहन व वितरण यांसाठी आवश्यक असणाऱ्या खर्चाची भरपाई (काही प्रमाणात तरी का होईना) घडून येईल अशा प्रकारे शुल्कआकारणी करूनच, नागरिकांना उपलब्ध करून द्यावा. त्याला आता पर्यायच नाही. तसे करण्यानेच पाण्याचे मोल कळेल आणि 'किंमत'ही! पाणी मूल्यवानच आहे. त्याचा वापरदेखील तितक्याच निगुतीने केला गेला पाहिजे. कोणतीही वस्तू फुकट मिळाली की तिची किंमत राहत नाही! शुद्धीकरण केलेल्या पाण्याचा पुरवठा वर्षभर करण्यासाठी जो महसुली खर्च स्थानिक स्वराज्य संस्थेला उचलावा लागतो त्याची तरी भरपाई पाण्यासाठी आकारावयाच्या शुल्कामधून केली जाणे, हे तरी होणे गरजेचे आहे. त्या वस्तुखातर खिशातून दाम वेचावा लागत नसेल तर वापराची शिस्त लयाला जाते. नासधूस वाढते, अपव्ययाला रान मोकळे मिळते. वरूणराजाच्या कृपेचा असा बेमुर्वत अधिक्षेप आपण टाळायलाच हवा! अशा प्रकारचा सामाजिक विवेक जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये सतत झिरपत राहावा यासाठीच 'अर्थबोधपत्रिके'सारख्या व्यासपीठाचा खटाटोप भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने, पदराला खार लावून, आजवर जारी राखलेला आहे. ■■

## सामाजिक

# हिंसामुक्त समाजासाठी स्कॉटलंडचे प्रयोग

समाजात वाढणाऱ्या हिंसक घटनांकडे केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून न पाहता तो व्यापक अशा सामाजिक आरोग्याचा प्रश्न आहे, अशा भूमिकेतून पाहिल्यास अशा प्रश्नांची सोडवणूक अधिक प्रभावीपणे करता येऊ शकते हे स्कॉटलंड या देशाने दाखवून दिले आहे. समाजातील वाढती गुन्हेगारी आणि सातत्याने घडणाऱ्या हिंसक घटना ही कोणत्याही देशाला चिंतेत पाडणारी गोष्ट असते. परंतु, नियोजनबद्ध अशा प्रयत्नांनी त्यावर मात करता येऊ शकते हे स्कॉटलंडने सिद्ध केले आहे.

अलीकडील काही दशकांत स्कॉटलंडमध्ये हिंसक घटना प्रमाणापलीकडे वाढलेल्या होत्या. अमेरिकेमधील एकूण हिंसक घटनांच्या तुलनेत ते प्रमाण तिप्पट झालेले होते. त्यामुळेच सामाजिक सुरक्षा व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने त्यावर तोडगा काढणे गरजेचे बनलेले होते. स्कॉटलंडच्या प्रशासनाने त्या दृष्टीने नियोजनबद्ध पावले उचलण्यास सुरुवात केली. सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर हे प्रमाण कमी करण्यात आणि सामाजिक आरोग्य सुधारण्यात त्या देशाला यश मिळू लागल्याचे आश्वासक चित्र आता दिसू लागले आहे. ज्या देशामध्ये हिंसक घटनांचे प्रमाण सर्वाधिक होते तोच देश आता जगातील सर्वांत सुरक्षित देश म्हणून गणला जाऊ लागला आहे. हिंसामुक्त समाजाचे एक नवे 'स्कॉटलंड मॉडेल' यातून तयार झालेले आहे. एकेकाळी युरोपातील सर्वाधिक हिंसक प्रदेशांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या देशाने, आजमितीस, गुन्हेगारी नियंत्रणात आणण्यासाठी प्रवर्तित केलेले प्रयोग केवळ अभ्यसनीयच नव्हे तर अनुकरणीयही ठरतात. त्या प्रयोगांचा परिचय करून घेण्यापूर्वी स्कॉटलंडचा थोडा इतिहास जाणून घेणे उद्‌बोधक ठरावे.

Acts of Union या व्यवस्थेंतर्गत १७०७ साली स्कॉटलंड आणि ब्रिटन एकत्र आले. परंतु स्कॉटलंडने स्वत:ची न्यायव्यवस्था, शिक्षणप्रणाली आणि सांस्कृतिक ओळख मात्र कायम ठेवली. १८व्या व १९व्या शतकात स्कॉटलंडची चांगली प्रगती झाली. तेथील Glasgow हे शहर पोलाद, कोळसा यांच्या उत्पादनात तसेच विक्रीत अग्रेसर बनले आणि अभियांत्रिकी उद्योजकांचे एक प्रमुख केंद्र म्हणून प्रस्थापित बनले. परंतु, १९९७ ते २००० या कालावधीत मात्र परिस्थिती वेगाने बदलत गेली. तिथे निर्माण झालेल्या आर्थिक अस्थिरतेपायी जहाजबांधणी व पोलादउद्योग वेगाने बंद पडले. हजारो लोक बेरोजगार झाले. रोजगाराच्या संधींमध्ये एकाएकी घट घडून आल्यामुळे तरुणांमध्ये असंतोष निर्माण झाला. परिणामी, स्कॉटलंडमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढू लागले. त्यांतूनच तिथे संघटित गुन्हेगारी निपजली आणि टोळ्यांचे साम्राज्य वाढू लागले. शिक्षण, आरोग्य व रोजगाराचा अभाव यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण सातत्याने वाढतच राहिले. त्या काळात Glasgow मध्ये शेकडो टोळ्या कार्यरत होत्या. भांडणे, चाकूहल्ले व हत्याकांड या अगदी नित्याच्या गोष्टी होऊन बसल्या होत्या. हिंसक गुन्ह्यांचे प्रमाण प्रचंड वाढलेले होते. १९९१ या एकाच वर्षात पाच लाखांहून अधिक गुन्ह्यांची नोंद व्हावी, इतक्या मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारी वाढली होती. अशातच अंमली पदार्थांचा प्रसार वाढल्याने संघटित गुन्हेगारीसुद्धा फोफावत राहिली. अभावग्रस्तता आणि वंचितता फैलावलेल्या अनेक वस्त्यांमध्ये गुन्हेगारी हा जीवनाचा अविभाज्य भाग बनला. या काळात टोळीयुद्धे, चाकूसारख्या शस्त्रांद्वारे केले जाणारे हिंसक हल्ले आणि खुनाच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झालेली होती. या शिवाय घरफोड्या, घरगुती हिंसा आणि दरोड्यांचेही प्रमाण वाढले होते. त्यामुळे नागरिकांना सतत धास्तीच्या सावटाखाली जगावे लागत होते. कोणाच्याही मनात सुरक्षिततेची भावना वसत नव्हती व नसे. त्यामुळे, सर्वाधिक हिंसक घटना घडणारा प्रदेश, म्हणूनच जागतिक समुदाय स्कॉटलंडकडे पाहत असे. मात्र हे चित्र बदलण्यासाठी स्कॉटलंडच्या प्रशासनाने २००५ सालानंतर कंबर कसली.

गुन्हेगारी रोखण्यासाठी उचलण्यात आलेल्या प्रमुख पावलांपैकी एक महत्त्वाचे पाऊल ठरले ते म्हणजे self-referral sessions. ही कार्यप्रणाली. हाताबाहेर चाललेल्या अथवा गेलेल्या हिंसाचाराला आळा घालण्यासाठी हा एक अभिनव प्रयोग स्कॉटलंडने करून पाहिला. सर्वांत प्रथम हा प्रयोग केला होता अमेरिकेने.

Chicago Project for Violence Prevention या नावाने हा प्रयोग तिथे करून पाहण्यात आला. नावावर गुन्हे दाखल झालेल्या व्यक्तींना न्यायालयात बोलावून समुपदेशनाद्वारे त्यांचे मन:परिवर्तन करण्याचा तो एक वेगळा प्रयोग होता. Cincinnati या अमेरिकेतील एका प्रमुख औद्योगिक शहरामध्ये टोळ्यांचे संघर्ष त्या काळात खूप वाढले होते. साहजिकच, हिंसाचार व खुनांच्या घटनाही तिथे नित्याच्या बनलेल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर हा एक वेगळा प्रयोग तिथे करून बघण्यात आला. त्या प्रयोगाविषयी सुरुवातीला अनेकांच्या मनात साशंकता होती. परंतु, या प्रयत्नांना मिळालेले यश मात्र डोळे दिपवणारे होते. त्यामुळे असाच एक प्रयोग Glasgow शहरातदेखील करण्याचे स्कॉटलंड प्रशासनाने ठरविले.

स्कॉटलंडमधील Glasgow या मोठ्या शहरांत गुन्हेगारी टोळ्या अनेक दशकांपासून सक्रिय होत्या. अमली पदार्थांचा काळाबाजार, स्थानिक परिसरावर वर्चस्व प्रस्थापित करण्यासंदर्भातील चढाओढ, शस्त्रास्त्रांचा वापर व विक्री यांवरील नियंत्रण... अशांसारख्या विविध कारणांसाठी या टोळ्यांनी शहरात नुसता धुमाकूळ घातलेला होता. टोळ्याटोळ्यांमधील हिंसक संघर्ष थांबायला तयार नव्हते आणि पोलिस यंत्रणा या गुन्हेगारांना रोखण्यात अपयशी ठरत होती. कायदा-सुव्यवस्था पूर्णत: निष्प्रभ ठरलेली होती. परिणामी, हिंसक हल्ले ही या शहरातील नित्याची बाब बनून गेलेली होती. त्याला प्रतिबंध कसा घालावा, याबाबत चालू असलेल्या विचारविनिमयादरम्यान एक आगळावेगळा प्रयोग करून बघण्याची कल्पना पुढ्यात उभरून आली.

गुन्हेगारी कृत्यांत सहभागी असणाऱ्या, परस्परांवर हल्ले करणाऱ्या आणि निष्पाप नागरिकांना नाहक त्रास देऊन सामाजिक आरोग्य धोक्यात आणणाऱ्या Glasgow शहरातील सर्व गुन्हेगारी टोळ्यांच्या सदस्यांना एके दिवशी एकत्र बोलावण्यात आले. विविध टोळ्यांचे ८५ सदस्य त्या वेळी तिथे उपस्थित राहिले. या हिंसाचारामध्ये ज्यांचे कायमचे नुकसान झालेले होते आणि ज्यांनी आपल्या परिवारातील व्यक्तींना गमावले होते, अशा कुटुंबांतील घटकांनी त्यांच्या दुख:भरित कहाण्या तिथे कथन केल्या. गुन्हेगारीमुळे सामाजिक आरोग्य कसे बिघडते आणि एखादी हिंसक कृती दूरगामी स्वरूपाचे किती गंभीर परिणाम घडवून आणत असते याची जाणीव त्या कथनांनी तिथे उपस्थित असणाऱ्या गुन्हेगारांना करून दिली गेली. स्वत:च्या अनुचित कृत्यांबाबत

मनात अपराधी भावना निर्माण होण्याबरोबरच, या गुन्हेगारी विश्वातून बाहेर पडल्यास समाजात पुन्हा एकवार सन्मानाने चांगले जीवन जगणे आपल्याला शक्य आहे, असाही विश्वास त्या कथनांद्वारे तिथे जमलेल्या गुन्हेगारांच्या मनात निर्माण झाला. हा प्रयोग करून बघणे हे तसे धाडसाचे काम होते. त्यामुळे न्यायालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्तही ठेवण्यात आलेला होता. कोणत्याही क्षणी काहीही घडू शकेल, अशी शक्यता सगळ्यांनीच गृहीत धरलेली होती. परंतु, त्या प्रयोगाला यश आले. तिथे जमलेल्या अनेक गुन्हेगारांनी हिंसाचाराचा मार्ग सोडून सामान्य व चांगले आयुष्य जगण्याची तयारी दर्शवली. अशा व्यक्तींसाठी मग एक 'हेल्पलाइन' तयार करण्यात आली.

हा प्रयोग Glasgow मधील न्यायालयात वानगीदाखल प्रथम करण्यात आला. त्या नंतर तशीच अनेक सत्रे गुन्हेगारीसाठी विख्यात असलेल्या विविध वस्त्यांमध्ये आणि त्यांच्या परिसरात घेण्यात आली. या सत्रांमध्ये सहभागी झालेल्या एकंदर ४७३ तरूणांपैकी ४०० तरुणांनी गुन्हेगारी व हिंसाचाराचा मार्ग सोडण्याची तयारी दर्शवली. त्या प्रयोगाचे हे खरोखरीच मोठे यश होते. त्यांना मदत करण्यासाठी स्कॉटलंड प्रशासनाने एक अनुरूप योजना तयार केली आणि गुन्हेगारीचा शिक्का बसलेल्यांना पुन्हा एकदा सामान्य जीवन जगण्यासाठी आवश्यक तो मदतीचा हात त्यांद्वारे देण्यात आला. समाजातील गुन्हेगारीचे प्रमाण सरासरीनेच कमी करण्यासाठी Scottish Violence Reduction Unit (SVRU) या विभागाची स्थापना करण्यात आली. निव्वळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न, एवढ्याच मर्यादित भूमिकेतून गुन्हेगारी घटनांकडे न बघता, तो एकंदरच सामाजिक आरोग्याचा व्यापक प्रश्न आहे आणि त्यामुळेच त्याचे निराकरण केवळ कायद्याच्या चौकटीत राहून करता येणार नाही, ही खूणगाठ प्रथम बांधण्यात आली. त्या दृष्टीने, मग, विस्तृत अशा काही सामाजिक बदलांची त्यासाठी गरज आहे हे हेरून चौकटीबाहेरील वेगळे प्रयोग करण्याच्या हेतूने विविध उपाययोजना करण्यात आल्या. हिंसक घटनांचा व त्यांतील गुन्हेगारीचा पूर्वेतिहास, तिच्याशी निगडित अशी उपलब्ध आकडेवारी आणि गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभागी झालेल्यांची पार्श्वभूमी यांचा एकत्रित विचार केल्यानंतर असे लक्षात आले की, गुन्हेगारी स्वरूपाच्या बहुतांश घटना पूर्वनियोजित नव्हत्या. अचानकच उद्‌भवलेल्या काही घटकांचे परिणाम तात्कालिक हिंसाचाराद्वारे प्रगटलेले होते. हिंसाचार ही एक सामाजिक समस्या

आहे आणि तिच्या निराकरणासाठी सामाजिक आरोग्य सुधारण्याच्या दिशेने काही प्रयत्न करणे गरजेचे आहे हे लक्षात घेऊन, Scottish Violence Reduction Unit हा विभाग पोलिस दलाचाच एक भाग असला तरी संबंधित उपाययोजनांबाबत त्याला स्वातंत्र्य देण्यात आले होते.

हिंसाचार ही सार्वजनिक आरोग्याशी संबंधित अशी वैश्विक स्तरावरील एक गंभीर समस्या आहे, असे जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) १९९६ साली जाहीर केले होते. त्यामुळे स्कॉटलंडमधील त्या भूमिकेला आंतरराष्ट्रीय स्तरावरूनही पाठबळ मिळाले. मात्र, स्कॉटलंडचे वैशिष्ट्य असे होते की, या प्रयोगादरम्यान स्कॉटलंडने इतर देशांच्या संबंधित प्रयोगांची केवळ नक्कल केलेली नव्हती. तर, अन्य देशांमधील तत्सम प्रयोगांचे अनुभव, त्यांची फलिते आणि स्कॉटलंडमधील सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती यांचा मेळ घालून स्कॉटलंडने त्याच्या प्रयोगाचे तपशील निश्चित केले. Scottish Violence Reduction Unit चे (SVRU) उपसंचालक Will Lindon यांच्या मते, इतर देशांमध्ये यशस्वी ठरलेल्या कल्पना स्कॉटलंडमध्ये राबवताना तेथील सामाजिक वास्तव लक्षात घेणे आणि त्यानुसार अन्य देशांमध्ये अवलंबण्यात आलेल्या उपक्रमांमध्ये आवश्यक ते बदल करणे आवश्यक होते. शिकागो अथवा फिनलंडमध्ये एखादा प्रयोग यशस्वी ठरला म्हणून स्कॉटलंडमध्येही तो तसाच्या तसा यशस्वी होईलच, असे सांगता येत नाही. कोणतीही योजना यशस्वी ठरायची असेल तर त्या त्या परिसरातील गुन्हेगारीचे स्वरूप, तिच्यामागील कारणे व व्याप्ती यांचा सखोल अभ्यास असणे गरजेचे असते. Scottish Violence Reduction Unit (SVRU) या विभागाने हेच सूत्र हेरले आणि हा विषय पोलीस ठाण्यांपुरता मर्यादित न ठेवता रुग्णालये, शाळा, शासनाचा समाजकल्याण विभाग, युवक संघटना व स्थानिक समुदाय अशा सर्वांपर्यंत विस्तारण्याचा प्रयत्न राबविला.

हिंसाचार हा एखाद्या संसर्गजन्य रोगाप्रमाणे समाजात पसरू शकतो. त्यामुळे, अपराध घडल्यानंतर गुन्हे दाखल करण्याऐवजी, गुन्हे घडणारच नाहीत, यासाठी उपकारक ठरणाऱ्या प्रयत्नांच्या दिशेने करावयाच्या उपाययोजनांवर भर देण्याच्या दृष्टीने स्कॉटलंडमध्ये विचार करण्यात आला. एखाद्या संसर्गजन्य आजाराशी लढताना ज्याप्रमाणे, अनुक्रमे, प्रतिबंध, हस्तक्षेप आणि पुनर्वसन ही पावले उचलली जातात त्याच धर्तीवर इथेही उपाययोजनेची दिशा ठरवण्यात आली.

हिंसाचार आणि गुन्हेगारीकडे सार्वजनिक आरोग्याशी संबंधित बाब म्हणून पाहत हिंसाचाराला आळा घालण्याच्या दृष्टीने मग आवश्यक अशा उपाययोजना करण्यात आल्या. या समस्येचे नेमके स्वरूप जाणून घेण्यासाठी पुरावे आणि आकडेवारी मिळवण्यावर भर देण्यात आला. समस्येचे स्वरूप आणि ती निर्माण होण्यामागची कारणे समजून घेण्याचा प्रयत्न त्यांद्वारे करण्यात आला. हिंसाचाराचा धोका नेमका कशामुळे निर्माण होतो आणि माणूस हिंसाचाराला कशामुळे प्रवृत्त होतो या कारणांचा शोध इथे घेण्यात आला. या अभ्यासातून लक्षात असे आले की, स्कॉटलंडमध्ये ज्या हिंसक व गुन्हेगारीच्या घटना घडतात त्यापैकी दोन तृतीयांशांपेक्षा अधिक घटना या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत केवळ एक टक्का लोकसंख्येमध्ये होतात. सामाजिक संरक्षणाचे एखादे कवच आणि/अथवा कोणत्याही स्वरूपातील आर्थिक आधार यांचा अभाव, मोठ्या प्रमाणावर असलेली बेरोजगारीची समस्या, चिवट दारिद्र्य आणि सततची कौटुंबिक अस्थिरता ही कारणे हिंसाचाराच्या मुळाशी आहेत हे संबंधित आकडेवारीवरून लक्षात आले. हिंसाचार रोखण्यासाठीच्या उपाययोजनांचे स्वरूप कसे असावे. तसेच, अशा प्रकारांचा फैलाव रोखण्यासाठी कशा प्रकारचा हस्तक्षेप करता येईल याचे तपशील निश्चित करणे त्यांमुळे सुकर बनले.

गुन्हेगारी आणि तिच्या उत्पत्तीद्वारे घडणारा हिंसाचार हा एक सामाजिक प्रश्न असल्याने त्याचे निराकरण करणे हीसुद्धा सामूहिक जबाबदारी आहे, असा व्यापक दृष्टिकोन या सगळ्या प्रयत्नांच्या मुळाशी ठेवण्यात आला. त्यामुळे गुन्हेगारी व हिंसाचार कमी करण्याच्या प्रयत्नांमध्ये आरोग्यतज्ज्ञांनाही सामावून घेण्यात आले. हिंसाचाराशी संबंधिक दुखापतींवर उपचार करणे, त्यांची योग्य नोंद करणे, उपचारासाठी येणाऱ्या जखमी गुन्हेगारांचे समुपदेशन करणे, गुन्हेगारीतून बाहेर पडण्यासाठी त्यांना कुठे व कशी मदत मिळू शकते या विषयी मार्गदर्शन करणे अशासारख्या बाबींवर या प्रयोगात भर देण्यात आला. समाजात जेव्हा हिंसाचार किंवा गुन्हेगारी वाढत जाते तेव्हा त्या हिंसक घटनांचे परिणाम संबधित व्यक्तीला तर भोगावेच लागतातच; परंतु, त्याच्या जोडीनेच संपूर्ण समाजावर त्या घटनांचे व्यापक स्तरावर दुष्परिणाम होत असतात, हे वास्तव अधोरेखित करणारे समुपदेशन व त्यांद्वारे जनजागृती घडवून आणणाऱ्या व्यापक मोहिमाही स्कॉटलंडमध्ये राबविण्यात आल्या. या प्रयोगाचेही सकारात्मक परिणाम दिसून आले. गुन्हेगारीचे मूळ हे अनेकदा शालेय जीवनात घडणाऱ्या

घटनांमध्ये आणि आजुबाजूच्या वातावरणामध्ये असते, हे लक्षात घेऊन शालेय स्तरावरदेखील प्रयत्न करण्यात आले. शालेय जीवनात मुलांवर जारी केले जाणारे नाना प्रकारचे निर्बंध हे, प्रसंगी, गुन्हेगारी क्षेत्राकडे वळण्याचे एक प्रमुख कारण ठरते असे लक्षात आले. विविध कारणांसाठी शाळेतून निलंबित केल्या जाणाऱ्या किंवा शाळेतून काढल्या जाणाऱ्या मुलांची संख्या स्कॉटलंडमध्ये मोठी होती. हे प्रमाण कमी होऊन मुले शिक्षणाच्या प्रवाहात टिकून राहावीत म्हणून शिक्षण विभागाशी संवाद वाढवण्यात आला. अशा सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर शाळांतून निलंबित होणाऱ्या व काढून टाकल्या जाणाऱ्या स्कॉटलंडमधील मुलांचे प्रमाण कमी झाले. त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम एकूण गुन्हेगारी कमी होण्यासाठी निश्चितपणे झाला, असे तेथील अभ्यासक सांगतात.

या प्रयत्नांना सकारात्मक प्रतिसाद मिळतो आहे हे लक्षात आल्यानंतर समाजातील इतरही काही घटक स्वत:हून पुढे येऊ लागले आणि त्यांनी मदतीचा हात पुढे करायला सुरुवात केली. स्कॉटलंडमधील वैद्यकीय तज्ज्ञांनी एकत्र येत २००८ साली Medics Against Violence ही संस्था स्थापन केली. विविध शाळांमध्ये तसेच महाविद्यालयांमध्ये जाऊन त्यांनी प्रबोधन सुरू केले. हिंसाचाराचे शारीरिक आणि मानसिक परिणाम किती गंभीर असतात याची जाणीव लहान वयापासून मुलांना करून देण्याचा हेतू त्या उपक्रमाच्या मुळाशी होता. रुग्णालयांतील आपत्कालीन सेवा विभागात दाखल होणाऱ्या व्यक्तींचेदेखील योग्य समुपदेशन करून, सर्वसाधारण आयुष्य व्यतीत करणे त्यांना शक्य बनावे, या दृष्टीने Hospital Navigators नी प्रयत्न चालू केले. सामाजिक आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने, हिंसाचारी प्रवृत्तीच्या उगमाविषयी मानसोपचार तज्ज्ञांनीही अधिक सखोल अभ्यास सुरू केला. हिंसाचार हा सामान्य मानवी वर्तनाचा भाग ठरतो का, कोणत्याही कारणापायी मनावर कधीमधी झालेले आघात आणि हिंसाचार यांचा काही परस्परसंबंध आहे का, दुष्टता आणि क्रूरपणा म्हणजे नेमके काय, सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हिंसक प्रवृत्तीच्या माणसाची मानसिकता बदलणे शक्य आहे का... अशांसारख्या काही मूलभूत प्रश्नांबाबत त्यांमुळे व्यापक असे विचारमंथन तिथे सुरू झाले. हिंसाचार हा सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने गंभीर विषय असल्याचे, या सगळ्यामुळे, हळूहळू सर्वांच्याच लक्षात क्रमाक्रमाने येऊ लागल्यामुळे सगळेच जण त्या विषयावर मोकळेपणाने बोलू लागले.

या आणि अशा प्रयत्नांमुळे युरोपातील कोणत्याही शहराच्या तुलनेत, एके काळी सर्वाधिक खून होणाऱ्या Glasgow शहरात गुन्ह्यांचे व खुनांचे प्रमाण लक्षणीयरीत्या म्हणजे तब्बल ५६ टक्क्यांनी कमी झाले. स्कॉटलंडमधील हत्यांची संख्या मागील दोन दशकांतील संख्येच्या तुलनेत नीचांकी पातळीवर आली. देशातील गुन्हेगारीच्या एकूण घटनांमध्येही ४० टक्क्यांहून अधिक घट घडून आली. गंभीर स्वरूपाचे गुन्हे आणि खुनाचे प्रयत्न यामध्येसुद्धा लक्षणीय घट झाली. त्यामुळे, 'विकसित जगातील सर्वांत हिंसक देश' म्हणून जो देश एके काळी ओळखला जात असे तोच आता 'सर्वांत सुरक्षित देश' म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. हिंसाचार कमी करण्यात स्कॉटलंडला मिळालेले हे यश जगभरात एक आदर्शस्वरूप गणले जाते. विशेष म्हणजे हे यश लक्षात घेऊन अन्य राष्ट्रांनीही या प्रयत्नांकडे गांभीर्याने लक्ष दिले आहे आणि त्याचे काही प्रयोग आपापल्या समाजात सुरू केलेले आहेत. लंडन आणि वेल्समधील २० पोलीस दलांच्या क्षेत्रामध्ये स्कॉटलंडच्या धर्तीवर Violence Reduction Unit (VRU) ही यंत्रणा स्थापन करण्यात आली आहेत. ज्या ज्या ठिकाणी Violence Reduction Unit (VRU) कार्यरत आहेत त्या ठिकाणी हिंसक कारवायांचे आणि गुन्ह्यांचे प्रमाण कमी झाले असल्याचे तेथील संबंधित आकडेवारीवरून दिसते आहे. स्कॉटलंडची ही परिवर्तनाची कहाणी अनेकासाठी नक्कीच अनुकरणीय ठरते आहे.


## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

## नियामक मंडळ

| | |
|---|---|
| १. **प्रा. डॉ. एस. श्रीरामन** (अध्यक्ष) | २. **प्रा. डॉ. रवींद्र ढोलकिया** |
| ३. **प्रा. डॉ. सुरिंदरसिंग जोधका** | ४. **डॉ. रमानाथ झा** |
| ५. **प्रा. डॉ. सुहास पळशीकर** | ६. **प्रा. डॉ. अंजली राडकर** |
| ७. **श्री. अभय टिळक** (मानद संचालक) | |

# अवकाश- संशोधन

## अंतराळभरारीची नवी पहाट

भारताने अवकाशसंशोधनाच्या क्षेत्रामध्ये गेल्या दोन दशकांमध्ये मोठी प्रगती केली आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन–इस्रो) गेल्या पाच दशकांपासून देशाच्या अवकाश–संशोधनविषयक महत्त्वाकांक्षांचे व अवकाशविषयक मोहिमांचे नेतृत्व करत आलेली आहे. परंतु आता ही कहाणी केवळ त्या सरकारी संस्थेपुरती मर्यादित राहिलेली नाही; तर, आता अंतराळभरारीची नवी पहाट देशात उगवते आहे, असे मत या क्षेत्रातील अभ्यासक व्यक्त करू लागलेले आहेत. असे वाटायला सबळ कारण ठरले आहे ते भारताच्या नव्या अवकाश मोहिमेचे. ‘विक्रम १’ या रॉकेटचे भारताने केलेले यशस्वी प्रक्षेपण हे केवळ ‘प्रक्षेपण’ म्हणून गणता येत नाही. कारण, त्यांद्वारे भारताने अवकाशसंशोधनाच्या क्षेत्रामध्ये खासगी क्षेत्रासाठी आता नव्या संधींचे दालन खुले केले आहे. या मोहिमेमुळे, खासगी उद्योग, युवा उद्योजक, नवीन कंपन्या आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान या सर्वांच्या आपल्या देशाच्या अवकाशविषयक संशोधनाच्या क्षेत्रातील योगदानाच्या/ सहभागाच्या माध्यमातून भारतात एका नव्या स्वदेशी अवकाश संशोधन–संस्कृतीचा उदय होईल असा विश्वास या क्षेत्रातील जाणकारांकडून व्यक्त होतो आहे.

खासगी उद्योगांची या प्रांतातील आजवरची भूमिका केवळ सुटे भाग तयार करून देण्यापुरतीच मर्यादित राहिलेली होती. परंतु, अमेरिकेसारख्या देशाने मात्र खासगी संस्थांच्या मदतीने अनेक यशस्वी मोहिमा पार पाडलेल्या होत्या. National Aeronautics and Space Administration (NASA - नासा) या अमेरिकेतील सरकारी संस्थेच्या माध्यमातूनच प्रामुख्याने अवकाश मोहिमा तिथे राबविल्या जात असतात. परंतु, अलीकडच्या काळात अमेरिकेनेही

या धोरणात आमूलाग्र असे बदल केले आहेत. अवकाश मोहिमांमध्ये खासगी कंपन्यांना समाविष्ट करून घेण्याची प्रक्रिया अमेरिकेने तुलनेने लवकर सुरू केली. अमेरिकेच्या अवकाश मोहिमांमध्ये SpaceX, Blue Origin, Boeing या सारख्या खासगी संस्थांनी सरकारी संशोधन संस्थांसमवेत भागीदारी केली. त्यामुळे अवकाश मोहिमांचा एकूण खर्च कमी झाला आणि त्याच्या जोडीला नव्या तंत्रज्ञानाच्या विकासालादेखील तिथे चालना मिळाली.

एलॉन मस्क यांच्या SpaceX या कंपनीचे योगदान या वाटचालीमध्ये उल्लेखनीय आहे. रॉकेटचा पुनर्वापर करता येऊ शकेल ही संकल्पना या कंपनीने प्रत्यक्षात आणून दाखवली. Falcon 9 हे अंशत: पुनर्वापर करता येणारे आणि दोन टप्प्यांत कक्षेत पोहोचणारे असे प्रक्षेपण वाहन तयार करण्यात त्या कंपनीस यश आले. या यशामुळे प्रत्यक्ष अवकाश मोहिमेचा खर्च कमी होण्यास खूप मदत झाली. अवकाशात उपग्रह पाठविणे, मालवाहतूक करणे आणि अंतराळवीरांना चांद्र-मंगळविषयक संशोधनांसाठी अवकाश मोहिमांवर पाठविणे अशांसारख्या बाबींसाठी त्यांद्वारे नवे मार्ग खुले झाले. खासगी संस्थांचा सहभाग अशा अवकाश मोहिमांमध्ये घेताना 'नासा'नेदेखील अशा खासगी कंपन्यांकडे केवळ 'कंत्राटदार' म्हणून न पाहता त्यांना संबंधित योजनांमधील 'भागीदार' म्हणून स्वीकारले आणि यशाचे तेवढेच श्रेय त्यांच्या पदरी घातले. सरकारी आणि खासगी सहयोगाच्या एका नव्या पर्वाची तिथे त्यांद्वारे नांदी झाली. त्याच्या जोडीनेच, NASA's Commercial Crew Program या एका नवीन प्रयोगाची मुहूर्तमेढ तिथे रोवली गेली. अमेरिकेतील खासगी उद्योगक्षेत्रांत कार्यरत असणारे अंतराळविषयक उद्योग आणि NASA यांच्या भागीदारीवर आधारित असा हा कार्यक्रम होता. आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकावर अंतराळवीरांना सुरक्षित रीतीने घेऊन जाणे आणि त्यांना तिथून सुखरूप परत आणणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमांतर्गत SpaceX आणि Boeing या दोन कंपन्यांची निवड करण्यात आली. या दोन्ही कंपन्यांनी अंतराळ यान विकसित करण्यामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. अंतराळयानाची मालकी स्वत:कडे घेऊन ते तयार करण्याची जबाबदारी व जोखीम स्वीकारण्याची गरज NASAला त्या व्यवस्थेद्वारे उरली नाही. 'नासा'ने ते उत्तरदायित्व खासगी कंपन्यांकडे विश्वासाने सोपविले.

अमेरिकेच्या भूमीवरूनच अंतराळवीरांना अवकाशात पाठविणे, त्यांना सुखरूप परत पृथ्वीवर आणणे व हे करतानाच अवकाश मोहिमांचा अवाढव्य खर्च कमी करणे हे सगळे हेतू या माध्यमातून साध्य झाले. खासगी कंपन्यांशी या संदर्भात केलेल्या भागीदारीमुळे, त्या करारांतर्गत, SpaceX या कंपनीच्या पुढाकाराने व Crew Dragon आणि Boeing या कंपन्यांच्या माध्यमातून Starliner (CST-100) हे अंतराळयान विकसित करण्यात आले. यापूर्वी रशियाच्या Soyuz या अंतराळयानावर अमेरिकेला अवलंबून राहावे लागत होते. मात्र, या नव्या भागीदारीमुळे हे अवलंबित्व कमी झाले हा अमेरिकेच्या दृष्टीने सर्वांत मोठा लाभ होता. NASAचा असाच आणखी एक महत्त्वाकांक्षी उपक्रम म्हणजे Artemis हा चांद्रमोहिमेशी संबंधित कार्यक्रम. महिला अंतराळवीराला चंद्रावर पाठविणे आणि भविष्यात चंद्रावर राहण्यायोग्य अशी व्यवस्था निर्माण करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. अंतराळवीरांना चंद्राच्या कक्षेत घेऊन जाण्याचा महत्त्वाकांक्षी टप्पा गाठण्याचे उद्दिष्ट असलेल्या या उपक्रमासंबंधात अधिक काम तिथे सुरू आहे. या अवकाश मोहिमेतही खासगी कंपन्यांची भूमिका महत्त्वाची ठरते आहे. वैज्ञानिक उपकरणे घेऊन चंद्रावर जाणे, मालवाहतूक करणे आणि भविष्यात अंतराळवीरांच्या चंद्रावरील पुढील शोधमोहिमांसाठी आवश्यक ते साहित्य तिथे नेणे अशा विविध कामांसाठी खासगी कंपन्यांसमवेत करार करण्यात आले आहेत. Commercial Lunar Payload Services (CLPS) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत खासगी कंपन्यांनी चंद्रावर उतरवलेली याने आणि उपकरणे अमेरिकेच्या चांद्रमोहिमेला गती देत आहेत. त्यामुळे अवकाश संशोधनात खासगी संस्थांची भागीदारी निर्णायक ठरू शकते हे अमेरिकेने दाखवून दिले आहे.

दुसरीकडे चीननेसुद्धा खासगी अवकाश संशोधनक्षेत्राला प्रोत्साहन देण्यास सुरुवात केलेली आहे. चीनने खासगी अवकाश कंपन्यांना रॉकेट, उपग्रह आणि अवकाश तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रवेश दिला आहे. LandSpace, i-Space, Galactic Energy, Space Pioneer या सारख्या खासगी क्षेत्रातील चिनी कंपन्या आता अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात उत्तम कामगिरी करू लागलेल्या आहेत. चीनमधील खासगी कंपन्या पुनर्वापर करता येणाऱ्या रॉकेटवहन यानांच्या तंत्रज्ञानासंदर्भातही भरीव योगदान देत आहेत. उपग्रह प्रक्षेपणाच्या प्रांतात वैश्विक स्तरावर भविष्यात जी स्पर्धा उभी ठाकणार आहे

तिच्यात हे तंत्रज्ञान आणि त्याच्या विकासातील खासगी कंपन्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असा या क्षेत्रातील जाणकारांचा अंदाज सांगतो.

त्या पार्श्वभूमीवर, भारताने उचललेली पावलेही तितकीच महत्त्वाची ठरावीत अशी आहेत. आजमितीला अवकाश-संशोधनाच्या क्षेत्रात जी प्रगती दिसून येते आहे तिच्या मुळाशी पाच दशकांचे अथक प्रयत्न आहेत. 'इस्रो'ची स्थापना १९६९ साली झाली. तेव्हापासून भारताने उपग्रह प्रक्षेपण, दूरसंचार, हवामानशास्त्र, शेती, संरक्षण आणि वैज्ञानिक संशोधन अशा विविध क्षेत्रांसाठी अवकाशविषयक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर सुरू केला. पीएसएलव्ही, जीएसएलव्ही, चांद्रयान, मंगळयान, 'चांद्रयान-३' आणि 'आदित्ययान एल-१' या सारख्या यशस्वी अवकाश मोहिमांनी भारताची प्रतिमा जगभरात उंचावली. अवकाश संशोधनाच्या क्षेत्रामध्ये 'इस्रो'चे नावही सन्मानाने घेतले जाऊ लागले. परंतु, या सर्व प्रवासामध्ये अवकाशक्षेत्रावर शासकीय मालकीच्या संस्थांचेच वर्चस्व राहिले. परंतु आता, खासगी 'स्टार्ट अप', नव-उद्योजक कंपन्या,


## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी- 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

आधुनिक तंत्रज्ञान आणि युवा उद्योजकांचा सहभाग या सर्वांच्या सहयोगातून भारतात एका नव्या स्वदेशी अवकाश संशोधन संस्कृतीचा उदय होऊ लागला आहे, असा आशावाद सध्या या क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त केला जातो आहे. 'स्कायरुट एरोस्पेस' या अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या युवा उद्योजकांच्या कंपनीने 'विक्रम-१' हा संपूर्णत: स्वदेशी बनावटीचा उपग्रह यशस्वी रीतीने प्रक्षेपित करून दाखवला ही नव्या अवकाशभरारीची नांदी आहे, असा विश्वास या क्षेत्रातील संशोधकांकडून व्यक्त होतो आहे.

बदलत्या अवकाश धोरणांतर्गत २०२३ सालापासून जे काही चांगले बदल झाले त्याचा परिपाक म्हणजे ही उपलब्धी ठरते आहे. या नव्या धोरणाद्वारे अवकाश संशोधनाचे क्षेत्र खासगी कंपन्यांसाठीही खुले करण्यात आले आहे. अवकाशविषयक बाबींसंदर्भात मूलभूत संशोधन, राष्ट्रीय मोहिमा आणि तंत्रज्ञान विकास या प्रमुख बाबींची जबाबदारी 'इस्रो'कडे देण्यात आलेली आहे. व्यावसायिक पातळीवर अवकाश उद्योगाला चालना देण्यासाठी 'इन स्पेस' ही नवीन संस्था निर्माण करण्यात आलेली आहे.

या निर्णयामुळे भारताच्या अवकाश क्षेत्रात नवकल्पना, स्पर्धा आणि उद्योजकतेची नवी ऊर्जा निर्माण झालेली आहे, असा आशावाद या क्षेत्रातील जाणकार व्यक्त करीत आहेत. त्यामुळे भारतात ४००हून अधिक नवे 'स्टार्ट अप' उभे राहिले. अनेक खासगी कंपन्यांनी केलेल्या कामाची जागतिक पातळीवर दखल घेतली गेली. पूर्वी 'इस्रो'मध्ये काम केलेले पवनकुमार चंदना व भरतकुमार डागा या दोन तरुणांनी 'स्कायरूट एरोस्पेस' या कंपनीची स्थापना केली. या कंपनीच्या माध्यमातून संपूर्णत: स्वदेशी बनावटीचे 'विक्रम-१' हे अंतराळात घेऊन जाणारे रॉकेट तयार केले गेले.

या परिवर्तनाचा सर्वांत आशादायी पैलू म्हणजे यात योगदान देणारी सर्व मंडळी तरूण आहेत. त्यामुळेच येणाऱ्या काळामध्ये खासगी कंपन्यांच्या सहयोगाने अधिक चांगले काम निश्चितपणे उभे राहू शकेल आणि अवकाशविषयक संशोधनाच्या व प्रयोगाच्या कोट्यवधींच्या वैश्विक बाजारपेठेमध्ये भारतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण करू शकेल, असा आशावाद आजमितीस व्यक्त केला जातो आहे.

## स्मरण

# करडा संशोधक, सच्चा ज्ञानव्रती

*भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे माजी अध्यक्ष आणि आपल्या देशातील एक अग्रगण्य अर्थतज्ज्ञ प्रा. (डॉ.) विकासचंद्र श्रीकृष्ण चित्रे यांचे २७ एप्रिल २०२६ रोजी देहावसान झाले. प्रा. वि. म. दांडेकर यांनी स्थापन केलेल्या भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या नियामक मंडळामध्ये प्रा. चित्रे यांचा समावेश २००२ साली झाला. पुण्यातील जगविख्यात अशा गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्थेमधून निवृत्त झाल्यानंतर, म्हणजे, २००४ सालापासून प्रा. चित्रे यांनी भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या संचालकपदाची धुरा पेलली ती २०१२ सालापर्यंत. पुढील पाच वर्षे, म्हणजे, २०१७ सालापर्यंत प्रा. चित्रे भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत राहिले. आपल्या देशातील अर्थकारण, समाजकारण व राजकारणाशी संबंधित संशोधनपूत साहित्याच्या प्रकाशनाला वाहिलेल्या 'जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी,' या भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी प्रकाशित करत असलेल्या नियतकालिकाच्या संपादनाची जबाबदारीदेखील प्रा. चित्रे यांनी १४ वर्षे सांभाळली. प्रा. चित्रे यांचे व्यक्तिमत्वविशेष आणि कार्यकर्तृत्व यांच्या काही पैलूंना दिलेला हा उजाळा...*

प्रा. चित्रे यांच्या व्यक्तिमत्त्वात दोन मोठे विलक्षण लोभस विरोधाभास दडलेले होते. वस्तुतः, 'समग्रलक्षी अर्थशास्त्र' (मॅक्रोइकॉनॉमिक्स) हा प्रा. चित्रे यांच्या व्यावसायिक जीवनातील चिरंतन व्यासंगाचा, अध्यापनाचा व संशोधनाचा प्रांत. परंतु, त्या प्रांतातील एखाद्या पैलूबाबत संशोधन करत असताना आणि/अथवा तो विषय वर्गात विद्यार्थ्यांना शिकवत असताना त्याच्या

सूक्ष्मातिसूक्ष्म धाग्यांवरील प्रा. चित्रे यांची कसलेली नजर कधीही ढळत नसे, हा झाला त्यांतील पहिला विलोभनीय विरोधाभास. 'मॅक्रो' (स्थूल) आणि 'मायक्रो' (सूक्ष्म) या उभयतांच्यादरम्यान नांदणाऱ्या नात्याची प्रगल्भ जाण आणि प्रगाढ व्यासंगाने कमावलेली अंतर्दृष्टी या दोहोंचा समसमा संयोग प्रा. चित्रे यांच्या व्यक्तिमत्त्वात घडून आलेला होता. त्यांमुळे, समग्रलक्षी अर्थशास्त्राचे वर्गातील त्यांचे अध्यापन कमालीचे सकस आणि आशयसंपन्न असे. संबंधित अभ्यासघटकाच्या सूक्ष्म पैलूंकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधल्याखेरीज ते पुढील मुद्याकडे सरकत नसत. विलक्षण एकाग्रतेने परंतु संथ लयीत त्यांचे विवरण चालू असे. अभ्यासप्रांतावर प्रचंड पकड असल्यामुळे प्रत्येक तासाची कापीव–ठाशीव पुस्तकी तयारी करण्याची गरजच तिथे नव्हती. किंबहुना त्याचमुळे, अभ्यासघटकातील बारीकसारीक जागा विलक्षण नजाकतीने विद्यार्थ्यांना उलगडून दाखवत असताना, प्रा. चित्रे यांच्या अंतर्विश्वात तो विषय क्रमाक्रमाने फुलत प्रतिक्षणी उत्क्रांत होत असावा, याची जाणीव विद्यार्थ्यांना प्रा.चित्रे यांच्या चर्येवरून होत असे. विश्लेषणादरम्यान एकही –अगदी चिमूटभरदेखील – मुद्दा हातातून निसटू नये यांबद्दल ते इतके सजग व त्यांमुळे विवरणात इतके बुडलेले असत की, त्या बिंदूवर एखाद्या विद्यार्थ्याने शंका उपस्थित केली की प्रसंगवशात निर्माण होणाऱ्या तशा विक्षेपाची व्यथा त्यांच्या परिचर्येवरून लगोलग जाणवत असे. परंतु ते तेवढ्याचपुरते असे. त्या अभ्यासघटकाचा तो पैलू, त्यांच्या समाधानानुसार, व्यवस्थित प्रतिपादून झाला की मग त्या विद्यार्थ्याने उपस्थित केलेल्या शंकेचे ते समूळ निराकरण करत असत. त्यांमुळे, वर्गात शिकवण्यादरम्यान विषयाशी पूर्णत: समरस झालेल्या प्रा. चित्रे यांचे ते बहिर्दर्शन कमालीचे हृद्य भासत असे. आपण जो विषय प्रतिपादन करत आहोत त्याचे अंतरंग अचूकपणेच विद्यार्थ्यांच्या पुढ्यात उलगडले जावे, या असोशीपायी, शिकवण्यादरम्यान, एकाग्रता भंग पावल्याची व्यथा प्रा. चित्रे यांना त्या काही क्षणांपुरती अगदी असह्य होत असली पाहिजे.

समग्रलक्षी अर्थशास्त्र (मॅक्रोइकॉनॉमिक्स), पैशाचे अर्थशास्त्र (मॉनेटरी इकॉनॉमिक्स), गणितीय अर्थशास्त्र (मॅथमॅटिकल इकॉनॉमिक्स) आणि अर्थमिती (इकॉनॉमेट्रिक्स) अशा तुलनेने अतिशय गहनगंभीर विषयांत सतत काम करत असतानाही प्रा. चित्रे यांच्या ठायीची सूक्ष्म, तरल आणि टवटवीत विनोदबुद्धी कधीही लोपली नाही, हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विरोधाभासी दुसरा

लोभसवाणा अंश. पिंडप्रकृतीने प्रा. चित्रे तसे गंभीरच होते. परंतु, अगदी गहन व क्लिष्ट विषयावर उहापोह चालला असताना वातावरण कमालीचे तंग बनलेले असले तरी, अवचितच, प्रा. चित्रे असे काही तरी एखादे मार्मिक वाक्य बोलायचे की चर्चेदरम्यानचा सगळा ताणतणाव क्षणार्धात विरून जाऊन एका झटक्यात तिथे हास्याचे फवारे उमटू लागत. एरवी सतत विचारमग्न असणाऱ्या प्रा. चित्रे यांच्या चेहऱ्याचा नकाशादेखील अशा वेळी आमूलाग्र पार बदलून जात असे. मुळातच त्यांचा स्वभाव फारसा बोलका नव्हता. अगदी चर्चासत्रांमध्येदेखील ते संथ लयीत आणि सौम्य, बारीक आवाजात बोलत असत. त्यांमुळे, आपणच केलेल्या कोटीवर प्रसन्नपणे हसतानादेखील प्रा. चित्रे यांचे हसणे 'ऐकू' येत नसे तर 'दिसत' असे! 'आवाज चढला आहे,' असे प्रा. चित्रे यांच्याबाबतीत कधी तरी घडले असेल किंवा नाही, याचीही शंकाच येते. अतिशय तल्लख आणि सूक्ष्म विनोदबुद्धीचे लेणे लाभलेले असल्यामुळेच, अध्यापन-संशोधन-संपादन-व्यवस्थापन यांत सतत मग्न असूनदेखील प्रा. चित्रे कधीही तणावाने ग्रासलेले दिसत-भासत नसत.

सूक्ष्म आणि प्रगल्भ विनोदबुद्धी लाभलेले प्रा. चित्रे अध्यापन, संशोधन आणि संपादन या तीन क्षेत्रांमध्ये मात्र कमालीचे साक्षेपी, चिकित्सक आणि कर्तव्यकठोर भासत आणि बनतही. अचुकतेचा आग्रह आणि परिपूर्णतेचा ध्यास हे त्यांचे त्या तीन प्रांतांतील अढळ ध्रुव होते. तिथे कोणत्याही प्रकारची, कोणत्याही स्तरावर आणि कोणासाठीही तडजोड करण्याला त्यांची अणुमात्रही तयारी नसायची. त्यांमुळे, अगदी साधा जरी काही मजकूर त्यांना सहज नजरेखालून घालण्यासाठी म्हणून दिला तरी, संशोधकीय लेखनाच्या प्रकाशनाला वाहिलेल्या एखाद्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या नियतकालिकाकडे पाठविण्याचा शोधनिबंध ज्या काकदृष्टीने तपासावा तितक्या काळजीकाट्याने तो कागद प्रा. चित्रे वाचत असत. तिथे एकंदर तीन कसोट्या त्यांनी लावलेल्या आहेत याचा प्रत्यय, त्यांतील सुधारणा, तो मजकूर ज्याने लिहिलेला आहे त्याला समजावून सांगतेवेळी, संबंधित लेखकाला हमखास येत असे. आपल्याला जे म्हणायचे आहे ते व तेवढेच नेमके त्या मजकुरात शब्दांकित झालेले आहे ना, हे तपासणे ही असे प्रा. चित्रे यांच्या पोतडीतील पहिली कसोटी. जे वाक्य लिहिलेले आहे त्यांतून एक आणि एकच निश्चित अर्थ प्रसवतो आहे ना, हे बघणे ही असे दुसरी कसोटी. तर, लिहिलेल्या वाक्यातून एकच एक निश्चित

अर्थ ठामपणे प्रसृत व्हावा यासाठी नेमक्या शब्दाचीच योजना तिथे अचुकपणे केली गेलेली आहे ना, याची खात्री करणे ही असे त्यांची तिसरी कसोटी.

कधीही भेटले तरी, 'कसा आहेस?', असे कमालीच्या स्नेहाळ मुद्रेने आणि मृदु स्वरात विचारणारे प्रा. चित्रे, त्या तीन कसोट्या लावतेवेळी मात्र कोणत्याही प्रकारची दयामाया दाखवायला तयार नसत. संशोधनपर लेखनाला वाहिलेल्या 'जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' या भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या नियतकालिकामध्ये प्रकाशनासाठी संशोधकांनी व अभ्यासकांनी सादर केलेल्या शोधनिबंधांची झाडाझडती प्रा. चित्रे त्याच तीन कसोट्या वापरून निर्ममपणे करत असत. परिणामी, प्रत्येक शोधनिबंध त्यांच्या चाळणीतून तावूनसुलाखून सहीसलामत निघत प्रकाशनयोग्य बनण्यात भरपूर वेळ जात असे. प्रत्येक मसुदा काळजीपूर्वक वाचून, त्यांत आवश्यक वाटणाऱ्या सुधारणा/दुरुस्त्या/बदल व्यवस्थित लिहून प्रा. चित्रे संबंधित संशोधकाकडे पुन्हा पाठवत असत. प्रसंगी अशा सुधारणांच्या पाच ते सहा फेऱ्यादेखील होत असत. त्या उलटतपासणीपायी मेटाकुटीला आलेले काही कच्च्या दिलाचे होतकरू उमेदवार, अगदीच निभेनासे झाले की, त्यांचा शोधनिबंध मागेही घेत. परंतु, प्रा. चित्रे यांच्या त्या कसलेल्या नजरेखालून परिष्कृत होऊन नियतकालिकात प्रकाशित झालेल्या त्या शोधनिबंधाद्वारे संबंधित संशोधकाच्या ठायी आयुष्यभर पुरून उरेल इतकी लेखन-संशोधनक्षमता विकसित झालेली असे, हेदेखील तितकेच खरे.

संपादनाचे काम हे कित्येकांना, दुसऱ्याच्या मुलांना तीट-काजळ लावून गोमटे बनवण्यासारखे वाटते. परंतु, काटेकोर तपासणीद्वारे प्रकाशित केल्या जाणाऱ्या शोधनिबंधांच्या माध्यमातून आपण समाजाच्या संचित ज्ञानामध्ये भर घालतो आहोत, ही जबाबदारीची जाणीव मनीमानसी सतत तेवती ठेवणाऱ्या चिमुटभर संपादकांमध्ये प्रा. चित्रे यांची गणना होईल आणि करावीच लागेल. ज्ञाननिष्ठा अशी बावनकशी असल्यामुळे प्रकाशनासाठी सादर झालेल्या शोधनिबंधांमध्ये संबंधित संशोधकाने वापरलेली आकडेवारी प्रा. चित्रे मुळातून तपासून बघत असत. केवळ इतकेच नाही तर, शोधनिबंधाला संशोधकाने जोडलेल्या संदर्भांचीदेखील ते तितक्याच चिकित्सकपणे छाननी करत. विवरणादरम्यानची तर्कशुद्धता तर कोणीही सजग संपादक तपासतोच; परंतु, केवळ त्यावरच न थांबता, पुढ्यातील शोधनिबंधांत उपयोजिलेली संख्याशास्त्रीय

प्रणाली, अर्थमितीय समीकरणे, वेळप्रसंगी, संबंधित संशोधकाने वापरलेली आकडेवारीच वापरून, प्रा. चित्रे स्वत: तयार करून त्यांची बिनचुकता पडताळून घेत असत. शोधनिबंधातील ती समीकरणे अथवा/आणि संख्याशास्त्रीय प्रणाली तयार करतेवेळी,संशोधकाकडूनच, समजा, काही त्रुटी राहिल्या असतील तर, त्या संशोधकाची मूळ आकडेमोड, समीकरणे आणि आपण स्वत: तयार केलेली (सुधारित) समीकरणे प्रा. चित्रे संबंधित संशोधकाकडे अवलोकनार्थ धाडून देत असत. हे सगळे विलक्षण मेहनतीचे आणि तितिक्षेची चरमसीमा गाठणारे असेच काम असते. परंतु, संपादकीय जबाबदारी म्हणून प्रा. चित्रे ते सारे कष्ट एखादे व्रत स्वीकारल्याप्रमाणे उपसत. संगणकाच्या पडद्यावर एखाद्या शोधनिबंधाचे पान उघडलेले आहे, अथवा, संगणकाच्या पडद्यावर समीकरणांच्या रांगा पसरलेल्या आहेत आणि ध्यानस्थ ऋषीप्रमाणे, तळहातावर हनुवटी टेकवून, विचारांच्या डोहात जणू हरवल्यासारखे प्रा. चित्रे तो मजकूर वाचत आहेत, असे चित्र अगणित वेळा दिसत असे.

प्रा. चित्रे यांचा तोच कटाक्ष अगदी साध्या गोष्टींमध्येदेखील दृग्गोचर होत असे. एखाद्या सभेत, ती अगदी अनौपचारिक जरी असली तरी, आपल्याला जे बोलायचे आहे ते प्रा. चित्रे अगोदर चक्क लिहून काढत असत. 'आयत्या वेळी तिथे बोलू,' असा सवंग खाक्या त्यांच्या आंतरिक घडणीशीच मुळात विसंगत होता. औरसचौरस अभ्यास केल्याशिवाय कोणत्याही अकादमिक उपक्रमात सहभागी व्हायचे नाही, हा दंडक प्रा. चित्रे यांनी जिवापाड जपला. भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी दरवर्षी ज्या एका राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करते त्याच्या आरेखनादरम्यानही तोच दंडक प्रा. चित्रे यांनी जारी करावा, हे मग ओघानेच येते. भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे संस्थापक प्रा. वि. म. दांडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दोन दिवसांचे एक राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्याचा संस्थेचा परिपाठ राहिलेला आहे. दरवर्षीच्या जुलै महिन्यात पुण्यात आयोजित केल्या जाणाऱ्या त्या चर्चासत्राची पूर्वतयारी, त्यांच्या शिस्तीनुसार प्रा. चित्रे त्या कॅलेन्डर वर्षातील जानेवारी–फेब्रुवारी महिन्यापासूनच सुरू करत. या वार्षिक चर्चासत्रासाठी संस्थेने निश्चित केलेला आकृतिबंधदेखील मोठा वैशिष्ट्यपूर्ण होता व आहे.

समकालीन चर्चाविश्वात प्रकर्षाने उहापोह झडत असलेला एखादा सामाजिक/राजकीय/आर्थिक विषय प्रतिवर्षीच्या परिसंवादासाठीचे मध्यवर्ती सूत्र म्हणून निश्चित केला जात असे. त्या सूत्राला अनुसरून, त्याचे विविध पैलू प्रकाशमान

करणारे एक विश्लेषक टिपण मग प्रा. चित्रे साक्षेपपूर्वक तयार करत. चर्चासत्रासाठी ज्या निमंत्रित अभ्यागत अभ्यासकांची योजना केलेली असेल अशा अभ्यासकांकडे मग ते टिपण रवाना करण्यात येई. टिपणातील मुद्यांवर अभ्यागत अभ्यासकांनी त्यांची त्यांची टिप्पणी लिखित स्वरूपात संस्थेकडे पाठवण्याबाबतची विनंती त्यांना केलेली असे. निमंत्रितांकडून तशी टिपणे प्राप्त झाल्यानंतर प्रा. चित्रे ती अभ्यासून त्यांतील महत्त्वाची कथने वेचून काढत. आपण तयार केलेला मूळ मसुदा आणि निमंत्रित अभ्यागतांकडून प्राप्त झालेल्या कथनांचा गाभा यांची सुयोग्य सांगड घालत, प्रा. चित्रे त्या नंतर, परिसंवादाच्या दोन दिवसांदरम्यानच्या प्रत्येक सत्राचे अंतरंग निश्चित करत. चर्चासत्रासाठी निश्चित केलेल्या केंद्रवर्ती सूत्रासंदर्भातील मूळ टिपणात अंतर्भूत असलेले मुद्दे आणि अभ्यागतांकडून प्राप्त झालेली त्यांची त्या संदर्भातील कथने यांची मग 'सूत्ररूप चर्चामुद्दे' म्हणून सत्रनिहाय विभागणी केली जात असे. प्रत्येक सत्रादरम्यान, त्या त्या सत्राचे जे मुख्य उप-सूत्र असेल त्याच्याशी संबंधित आपल्या मूळ टिपणातील मुद्दे आणि अतिथी अभ्यागतांनी सादर केलेली कथने यांची तर्कसंगत क्रमवार रचना करून, प्रा. चित्रे, प्रत्येक सत्रादरम्यानच्या चर्चेचा आराखडा निर्धारित करत. असे हे भरगच्च टिपण, मग, चर्चासत्राच्या वेळी प्रत्येक निमंत्रिताच्या हाती देण्यात येत असे. दोन दिवसांच्या परिसंवादादरम्यान, प्रत्येक सत्रातील चर्चा, शक्यतो, त्या त्या सत्रासाठीच्या उप-सूत्राला अनुसरून व टिपणांतील सूत्ररूप चर्चामुद्यांना धरून घडत राहावी, असा प्रयत्न मग कसोशीने केला जाई.

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीची धुरा खांद्यावर होती तोवर प्रा. चित्रे अतीव निष्ठेने हा सारा कार्यव्याप निरलसपणे सांभाळत राहिले. या सगळ्यांत त्यांचे स्वत:चे संशोधन रेंगाळले, मागे पडले. त्यांबद्दल त्यांना प्रसंगी खंतही वाटत असे. परंतु त्याहीबद्दल त्यांनी कधी त्रागा केला नाही. ज्ञाननिर्मिती आणि ज्ञानप्रसार या दोन्ही प्रांतांत अध्ययन, अध्यापन, संशोधन, संपादन आणि व्यवस्थापन अशा पाचही अंगांनी प्रा. चित्रे उमरभर योगदान देत राहिले. ज्ञानाच्या पावित्र्याशी आणि ते पावित्र्य जपण्याच्या बांधिलकीशी तडजोड त्यांच्या परिसरातदेखील कधी फिरकली नाही. ज्ञानशुचिता जपण्याचा आपल्या विद्यार्थ्यांकडे त्यांनी सुपूर्त केलेला अजोड, अमोल वसा कोणता असेल तर तो हाच. जपण्यास-जोपासण्यास अतीव अवघड असाच!

# कल्पना-संकल्पना

## व्यापारवाद आणि वसाहतवाद

आपल्या देशात अवतरलेल्या एका महत्त्वाच्या स्थित्यंतराला येत्या जुलै महिन्यात पुरेपूर ३५ वर्षे पूर्ण होतील. २४ जुलै १९९१ या दिवशी लोकसभेमध्ये देशाचे तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाद्वारे भारतीय अर्थकारणात पुनर्रचना पर्वाचा पदन्यास झाला, असे म्हणले जाते. त्या घटनेचे वर्णन, त्या काळी, आर्थिक पुनर्रचना पर्वाचे वर्णन त्या प्रक्रियेला तात्विक-वैचारिक विरोध असणाऱ्या काही घटकांकडून, 'आर्थिक वसाहतवादाचे मागील दाराने आगमन,' अशा शेलक्या शब्दकळेनिशी केले गेले. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा अंगीकार केल्यानंतर, गेल्या साडेतीन दशकांमध्ये, भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये जी काही स्थित्यंतरे झाली त्यांची भरपूर चिकित्सा आजवर झालेली आहे. इथे आपल्याला उलगडा करून घ्यायचा आहे तो 'आर्थिक खुलेपणा' आणि 'आर्थिक वसाहतवाद' या दोन कल्पना-संकल्पनांची याद समाजमनाला त्या वेळी नेमकी कशामुळे झाली असावी, या कुतूहलाचा. त्या जिज्ञासेचे शमन करायचे तर, आपल्याला, अंमळ डोकवून बघावे लागते ते प्राचीन काळापासून अर्थविचाराच्या गतिमान राहिलेल्या उत्क्रांतीच्या अंतरंगात. पाश्चात्य अर्थविचाराच्या उत्क्रांतीचा जो दस्तऐवजीकरण झालेला तपशील आहे त्यांनुसार, साधारणपणे, इसवी सनाचे १५-१६ वे शतक ते १८वे शतक यांदरम्यान ज्या विचारव्यूहाचा प्रभाव तत्कालीन अर्थचिंतनविषयक विश्वावर जाणवताना दिसला त्याचा निर्देश 'व्यापारवाद' अशा संज्ञेने केला जातो.

मध्ययुगाच्या सांगताबिंदूपासून पुढे युरोपमध्ये आर्थिक विकासाच्या प्रक्रियेने जी गती पकडली तिच्या कुशीतूनच पुढे १८-१९व्या शतकात तिथे औद्योगिक

क्रांतीचा जन्म झाला. आर्थिक वाढविकासाच्या त्या भरधाव आगेकूचीचे वर्णन 'भांडवलशाहीचा उगम वा उत्कर्ष' अशा शब्दसंहतीद्वारे केले जाते. भांडवलशाही व्यवस्थेचा उगम नेमका केव्हा झाला यांबद्दल अभ्यासकांमध्ये मतमतांतरे आहेत. सामंतशाही व्यवस्था संपुष्टात आल्यानंतर, साधारणपणे १४-१५व्या शतकात, आगेमागे, युरोपातील बार्सेलोना, अथेन्स, व्हेनिस यांसारख्या शहरांमध्ये आद्य भांडवलशाही व्यवस्थेच्या पाउलखुणा दिसू लागतात, असे कार्ल मार्क्स यांचे प्रतिपादन सांगते. परंतु, आज आपल्याला परिचित असणाऱ्या भांडवलशाहीशी साधर्म्य सांगणारी व्यवस्था, साधारणपणे, १६व्या शतकापासून पुढे उत्क्रांत होत राहिली, असेच मार्क्स यांचेही विश्लेषण सांगते. मॅक्स वेबर यांच्यासारखे विश्लेषक मात्र भांडवलशाही व्यवस्थेच्या उत्पत्तीस युरोपातील 'रिफॉर्मेशन' चळवळीने जन्म दिलेल्या तात्विक व वैचारिक पाठबळाचे अधिष्ठान लाभल्याचे सांगतात. धनसंपदा आणि संपत्तीचे संचयन यांबद्दल मध्ययुगीन युरोपातील समाजमानसात, साधारणपणे, १५व्या शतकापर्यंत एक प्रकारची जी अवनत अथवा अ-प्रतिष्ठ भूमिका वा भावना वसत होती ती १६व्या शतकापासून निस्तेज बनू लागली. संपत्तीसंचयाकडे निकोप व सकारात्मक दृष्टीने बघण्याच्या त्या दृष्टिकोनाद्वारे भांडवलशाही विचारसरणीच्या परिपुष्टतेस अनुकूल अशी मनोभूमिका युरोपात सामाजिक विश्वात स्थिरावली, असा कार्यकारणभाव या स्पष्टीकरणाच्या मुळाशी आहे. परंतु, याचबरोबर भांडवलशाही व्यवस्थेच्या आगेकूचीस, मुख्यत: भूमध्य समुद्राद्वारे गतिमान बनलेल्या व्यापाराचा हातभार अतिशय मोठ्या प्रमाणावर लाभला, असेही एक प्रमेय आर्थिक इतिहासाचे काही अभ्यासक मांडतात. व्यापारवादाचा उगम त्या विचारसरणीमध्ये शोधावा लागतो.

साधारणपणे १६व्या शतकाच्या आरंभी युरोपातील व्यापारविश्वात भरभराटीचे पर्व अवतरले. ब्रिटन, फ्रान्स व हॉलंड यांसारखे देश आणि दुसरीकडे स्पेन व इटली या देशांदरम्यान व्यापारी स्पर्धेचा माहौल अवतरला. त्या दरम्यान एकंदरीनेच शास्त्रीय ज्ञानाचा परीघही विस्तारत होता. परिणामी, नौकाबांधणीच्या तंत्रात सुधारणा होऊ लागली. आकाराने मोठी व वेगवान जहाजे बांधण्याचे शास्त्र आकार घेऊ लागले. नवनवीन बंदरे विकसित होण्याची प्रक्रिया वेग पकडायला लागली. खगोलविषयक ज्ञानाचे संचित अधिकाधिक समृद्ध बनू लागले.

समुद्री प्रवाहांच्या चलनवलनासंदर्भातील अधिक तपशील हाताशी येऊ लागले. नकाशांचे तंत्र अधिक सुविहित बनले. बंदरांच्या परिसरात दीपगृहे उभी ठाकू लागली. त्यांतून युरोपातील देशादेशांदरम्यान समुद्रमार्गाने केल्या जाणाऱ्या व्यापाराचा व देवाणघेवाणीस पैस विस्तारायला लागला. त्या वाढत्या व्यापारी विस्ताराला, त्याच वेळी त्याला समांतर पद्धतीने विकसित होत असलेल्या अधिक सरस अशा वित्तीय व्यवस्थेने हातभारच लावला. बँका अस्तित्त्वात आल्या. कर्जांचे वाटप–वितरण वाढू लागले. याच सगळ्या प्रक्रियेने शहरांच्या निर्मितीस तसेच वाढविस्तारासही चालना पुरविली. मोठ्या प्रमाणावरील व संघटित उद्योगांचे युग अवतरण्यापूर्वी शहरीकरणाच्या प्रक्रियेला खतपाणी पुरविले ते व्यापाराच्या माध्यमातून संपत्तीसंचयन जारी राखणाऱ्या व्यापारी भांडवलदारांच्या समूहाने. या सगळ्या वाढत्या अर्थचक्राचे नियमन–व्यवस्थापन करणारी शासनसंस्था, त्याच वेळी, समांतर पद्धतीने उत्क्रांत होत राहिली. या सगळ्या घटकांचा १६व्या शतकादरम्यान आकार धारण केलेल्या व्यापारवादी व्यवस्थेच्या दृढीकरणास हातभार लागत होता. त्याच व्यापारवादी व्यवस्थेने साम्राज्यविस्ताराच्या ऊर्मीस यथावकाश ऊर्जा पुरविली.

परंतु, वास्तवात गंमत अशी आहे की, 'व्यापारवाद' या संकल्पनेची ठोस, सुस्पष्ट अशी व्याख्या कोणा एकाच्या खात्यावर अथवा नावावर जमा केली जात नाही अथवा करता येत नाही. 'व्यापारवाद' असे या संकल्पनेचे बारसे करण्याचा मान प्रदान केला जातो तो मात्र 'आधुनिक अर्थशास्त्राचे जनक' असे बिरूद ज्यांना सन्मानपूर्वक बहाल केले जाते त्या ॲडम स्मिथ यांना. पूर्वकाळी युरोपात अस्तित्त्वात असलेल्या अर्थव्यवहारांच्या एका विशिष्ट धोरणप्रणालीस ॲडम स्मिथ यांनी 'व्यापारी व्यवस्था' असे संबोधले. त्यांमुळे, कधी कोणे काळी 'व्यापारवादी व्यवस्था' असे बिरूद धारण केलेली काही एक सुविहित 'व्यवस्था अस्तित्त्वात होती अथवा नाही, यांबाबतही आर्थिक इतिहासाच्या अभ्यासकांमध्ये मतैक्य होण्यास तयार नाही. असे असले तरीही, 'व्यापारवादी प्रणाली' अथवा 'व्यापारवादी विचारसरणी' अशा शब्दसंहतीने ज्या व्यवस्थेचा आणि/अथवा धोरणदृष्टीचा निर्देश केला जातो तिचा रोख अर्थकारणातील संरचना आणि सत्ता यांचा संयोग घडवून आणण्यावर राहिला, या एका बाबतीत मात्र अभ्यासकांमध्ये दुमत आढळून येत नाही. ही संरचना नेमकी कोणती आणि तिच्याशी साहचर्य साधणाऱ्या सत्तेचे संस्थात्मक रंगरूप कोणते होते,

याचा उलगडा करून घेतला की, व्यापारवादाची संकल्पना स्पष्ट होते व होईल. त्यासाठी व्यापारवादाची पायाभूत विचारसूत्रे अथवा गृहीतके नेमकी काय राहिली, याचा परिचय प्रथम करून घेणे आवश्यक ठरते.

व्यापारवादी विचारप्रणालीचे वैश्विक अर्थव्यवस्थेच्या जडणघडणीसंदर्भातील आकलनदेखील वैशिष्ट्यपूर्ण असेच होते. वैश्विक स्तरावर संचयन झालेली संपत्ती मर्यादित मात्रेचीच आहे, ही त्यांतील पायाभूत धारणा. सीमित असणारी ती संपदाच निरनिराळ्या राष्ट्रांमध्ये विभागलेली आहे, हे गृहीतक मग त्या धारणेमधूनच आपसूक निष्पन्न होते. अशा परिस्थितीत, भरधाव अर्थविकासासाठी संपत्तीची गरज असल्यामुळे, एकंदरीनेच, मर्यादित मात्रेत उपलब्ध असणाऱ्या त्या संपत्तीचा अधिकाधिक वाटा आपल्या तिजोरीत ओढून घेण्याबाबत देशादेशांमध्ये स्पर्धाळू प्रेरणा बळकट होत राहाव्यात हेही ओघानेच येते. अशा ओढाताणीद्वारे, मग, उपलब्ध संपत्तीचे फेरवाटप घडत राहावे, हे तर्कनिष्ठ शाबीत होते. दुसऱ्या कोणाच्या तरी संपत्तीमध्ये घट घडून आल्याखेरीज माझ्या संपत्तीमध्ये भर पडणे अशक्य आहे, हे जाणून प्रत्येकच राष्ट्र स्वत:कडे संपत्तीचा अधिकाधिक वाटा वळवण्यासाठी आक्रमकपणे सक्रिय बनेल अथवा बनावे, यांतही अनैसर्गिक असे काहीच नाही.

...आणि, संपत्ती संकलनासाठी आंतरराष्ट्रीय व्यापारातील आधिक्य हे अनिवार्यच होय, ही व्यापारवादाची केंद्रवर्ती भूमिका याच कार्यकारणभावामधून निपजली आणि प्रस्थापित बनली. व्यापारवादी विचारसरणीचा, तिच्यावर बेतलेल्या विचारव्यूहाचा आणि या दोहोंच्या आधारावर आकार घेणाऱ्या धोरणदृष्टीचा सारा झोत निर्यातीवर एकवटावा, हे, यांमुळेच स्वाभाविक ठरते. आपल्या देशामधून केल्या जाणाऱ्या निर्यातीचे मूल्य हे अन्य देशांमधून आपल्या देशात केल्या जाणाऱ्या आयातीच्या मूल्यापेक्षा अधिकच असले पाहिजे, ही, मग या धोरणनीतीचा अवलंब करणाऱ्या अर्थकारणाची निकड बनते. सोन्या-चांदीसारख्या मूल्यवान धातूंपासून बनविलेले चलन हा, व्यापारवादावर बेतलेल्या अर्थकारणात, राष्ट्राच्या संपत्तीसंचयनाचा कणा गणला जातो. आंतरराष्ट्रीय व्यापारादरम्यानच्या आधिक्यद्वारे असे चलन देशाच्या तिजोरीकडे वाहू लागते. त्यांमुळे, निर्याती सतत भरभराट येत राहण, हे या व्यवस्थेत अपरिहार्यच ठरते. आता, अशी स्वामित्वांकित बाजारपेठ बाहेरच्या जगात सतत मिळत राहील याची हमी कशी द्यायची? या पेचावर व्यापारवादी अर्थकारणाचा पाठपुरावा

करणाऱ्या तत्कालीन ब्रिटन, फ्रान्स यांसारख्या देशांनी उपाय शोधून काढला तो निरनिराळ्या देशांत वसाहती निर्माण करण्याचा. आपल्या देशात तयार झालेला पक्का माल वसाहतींमध्ये विकायचा, वसाहतींमधील उत्पादने कच्चा माल म्हणून ओरबाडून घ्यायची आणि मुख्य म्हणजे वसाहतींमधील पक्क्या मालाच्या उत्पादनव्यवस्था लयाला जातील अशीच आयात-निर्यात मूल्यप्रणाली तिथे कठोरपणे राबवायची, ही कार्यपद्धती म्हणजे व्यापारवादाचा गाभाच जणू. व्यापारवाद आणि साम्राज्यशाहीजन्य वसाहवाद यांचे आतड्याचे नाते हे असे होते व आहे.

आजदेखील, बहुश:, अमेरिका आणि चीन या दोहोंदरम्यान १९८०सालापासून नांदत आलेल्या व्यापारी नातेसंबंधांचा पोत, एका प्रकारे, पूर्वकालीन व्यापारवादाचाच एक अवतार गणावा लागतो तो त्यांपायीच!

## 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकातील लेखांचे संदर्भ :


- आम्ही पाहिलेले फुले : संपादक - हरि नरके, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, द्वारा - उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, १९९३, पृ. क्र. ३-२३.
- A SIXTH OF HUMANITY - INDEPENDENT INDIA'S DEVELOPMENT ODYSSEY, Devesh Kapur and Arvind Subramaniyan, Harper Collins Publishers, India, Gurugram, Haryana, 2025, pp. 79-103.
- Mercantilism, Philipp Reinhold, Max Planck Institute for Comparative Public Law and International Law, August 2023.
- Higgins, Benjamin, ECONOMIC DEVELOPMENT : PRINCIPLES, PROBLEMS, AND POLICIES, Central Book Depot, Allahabad, 1963, pp. 217-238.
- https://www.gov.scot/publications/recorded-crime-scotland-2025-26/pages/total-recorded-crime/
- https://www.bbc.com/future/article/20260626-how-scotland-changed-the-way-it-tackled-violence
- https://www.nasa.gov/news-release/seven-us-companies-collaborate-with-nasa-to-advance-space-capabilities/
- https://www.sciencedirect.com/science/article/abs/pii/S0265964624000171
- https://bigdatachina.csis.org/unpacking-linkages-between-the-chinese-state-and-private-firms/
- https://www.inspace.gov.in/inspace

# पुरवणी

## बदलते जागतिक अर्थकारण व भारत

■ अभय टिळक

# उजळणी

## दांडगे वाचन करणारे तात्यासाहेब

■ गोविंद गणपत काळे

# पुरवणी

## बदलते जागतिक अर्थकारण व भारत

■ अभय टिळक

*छत्रपती शाहूमहाराजांच्या जयंतीनिमित्त कोल्हापूर येथील 'राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्ट' यांच्यावतीने दरवर्षी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. या व्याख्यानमालेमध्ये या वर्षी बुधवार तारीख २४ जून २०२६ रोजी 'अर्थबोधपत्रिके'चे संपादक अभय टिळक यांचे 'बदलते जागतिक अर्थकारण आणि भारत' या विषयावर व्याख्यान झाले. ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार हे त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. त्या व्याख्यानाचे हे शब्दरूप...*

ज्यांच्या नगरीत ही व्याख्यानमाला आयोजित करण्यात आलेली आहे त्या शाहूछत्रपतींच्या राजकाजविषयक दक्षतेचा वस्तुपाठ गिरविण्याची गरज आजही तितकीच प्रस्तुत आहे. संस्थानातील प्रजाजनांच्या कल्याणाबाबत राजर्षी शाहूमहाराज किती दक्ष असत याची एक विलक्षण बोलकी झलक ज्येष्ठ पत्रकार डॉ. अरूण टिकेकर यांच्या 'स्थल-काल' या ग्रंथात आपल्याला बघायला सापडते. 'स्थानीय इतिहास' हा डॉ. टिकेकर यांच्या जिव्हाळ्याचाच केवळ नव्हे तर संशोधनाचा आवडता विषय होता. विविध शहरांच्या स्थानीय इतिहासाचे काही कवडसे पुढ्यात मांडणाऱ्या आपल्या लेखांचे संकलन डॉ. टिकेकर यांनी त्या ग्रंथात केलेले आहे. कोल्हापुरसंदर्भात त्या ग्रंथात आहेत एकंदर सहा लेख. एक ब्रिटिश पत्रकार १९व्या शतकाच्या अखेरीस भारतामध्ये आले होते. कोल्हापूर संस्थानलादेखील त्यांनी भेट दिली होती. छत्रपती शाहूमहाराजांशी झालेल्या त्यांच्या एका भेटीचा तपशील डॉ. टिकेकर यांनी त्यांतील एका लेखात नमूद केलेला आहे. एफ. एच. एस. मिअरवेदर या

नावाचे ते पत्रकार दख्खनच्या दौऱ्यावर आले होते. हिंदुस्थानच्या काही भागांत १८९६–९७दरम्यान उद्भवलेल्या महादुष्काळासंदर्भातील वार्तापत्रे पाठविण्यासाठी 'रॉयटर' या जागतिक वृत्तसंस्थेने त्यांना पाठविले होते. त्या दौऱ्यादरम्यान कोल्हापूर संस्थानातही मिअरवेदर आले व संस्थानात फिरले. कोल्हापुरातील वास्तव्य आटोपते घेण्यापूर्वी त्यांनी शाहूमहाराजांच्या भेटीची इच्छा व्यक्त केली. एके दिवशी दरबार आटोपल्यानंतर शाहूमहाराजांनी मिअरवेदर यांना भेटीसाठी वेळ दिली. त्या भेटीचे वर्णन मिअरवेदर यांनी नमूद करून ठेवलेले आहे. दुष्काळग्रस्त अन्य प्रांतांत पाण्याच्या दुर्भीक्ष्यापायी जी परवड नजरेस पडली तिचा अनुभव कोल्हापूर संस्थानात कोठेही आला नाही याचे रहस्य काय, असा प्रश्न मिअरवेदर यांनी शाहूमहाराजांना विचारला. त्या वेळी त्यांच्याशी बोलताना शाहूमहाराज म्हणाले, ''तीनएक वर्षांनी काही भागात दुष्काळ पडणार हे आम्ही गृहीतच धरतो. म्हणून दुष्काळाशी सामना करायला तयारही असतो.'' छत्रपती शाहूमहाराजांची राज्यकारभारासंदर्भातील ती दूरदृष्टी आजही तितकीच प्रस्तुत आणि अनुकरणीयदेखील आहे, हे वास्तव आदरपूर्वक केवळ नमूदच नव्हे तर अधोरेखितही केलेच पाहिजे.

विचारविनिमयासाठी आपण निवडलेल्या आजच्या विषयासंदर्भातही तेच सूत्र लागू होते. जागतिक अर्थकारण गेल्या पाव शतकापासून विलक्षण बदललेले आहे. ती गतिमानता आजही कायमच आहे. अशा बदलत्या अर्थकारणाशी भारताचे, पर्यायाने, भारतीय अर्थव्यवस्थेचे नाते कशा प्रकारचे राहिलेले आहे हा आहे आपल्या आजच्या संवादाचा विषय. याला पार्श्वपीठिका लाभलेली आहे ती चालू वर्तमानाची. ते स्वाभाविकही आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी २०२४ साली अमेरिकी अध्यक्षपदाची सूत्रे दुसऱ्यांदा हाती घेतल्यानंतर ज्या प्रकारे जगावर एकतर्फी व्यापारयुद्ध लादले त्यांतून आजची परिस्थिती उद्भवलेली आहे, ही वस्तुस्थिती सर्वज्ञात अशीच आहे. ही परिस्थिती गेल्या वर्षी, म्हणजे, २०२५ सालातील फेब्रुवारी महिन्यापासून अवतरली. तिथून पुढे वैश्विक स्तरावरील व्यापाराची लयच पार विस्कटून गेली. त्या अरेरावीला चीनने प्रत्युत्तर दिले ते दुर्मीळ खनिजांचा पुरवठा रोखून. त्यांमुळे झाले इतकेच की, ट्रम्प यांनी उगारलेल्या 'आर्थिक राष्ट्रवादा'च्या (इकॉनॉमिक नॅशनॅलिझम) शस्त्राला चीनने प्रत्युत्तर दिले ते 'साधन राष्ट्रवादा'चे (रिसोर्स नॅशनॅलिझम) अस्त्र परजून!

ट्रम्प यांच्या तशा अतार्किक कारभारपद्धतीचा पुढील अध्याय उलगडला गेला तो २८ फेब्रुवारी २०२६ या दिवशी अमेरिका आणि इस्त्रायल या दोघांनी इराणवर केलेल्या आक्रमणाद्वारे. चीनच्या उदाहरणावरून बोध घेतलेल्या इराणेदेखील मग कित्ता गिरविला तो 'रिसोर्स नॅशनॅलिझम'चाच. होर्मुझच्या सामुद्रधुनीमधून होणारी जहाजांची ये-जा बाधित करून इराणने उभ्या जागतिक समुदायाचेच जणू प्राण कोंडले. होर्मुझच्या सामुद्रधुनीमधून केल्या जाणाऱ्या तेलवाहतुकीवर ज्या देशांची ऊर्जासुरक्षा निर्भर आहे व होती असे सगळेच देश त्यांपायी कोंडीत गवसले. भारतही त्याला अपवाद नव्हता आणि नाही. दरम्यान, तेलखरेदीसाठी भारताने रशियाबरोबर सौदा केल्याने इंधनांचा तुटवडा त्या मानाने फारसा जाणवला नाही. परंतु, स्वयंपाकाचा गॅस आणि खनिज तेलजन्य इंधने यांची दरवाढ मात्र सोसावी लागली. आजच्या आपल्या संवादाचा विषय, अगदी अलीकडील काळातील याच सगळ्या समकालीन घडामोडींशी निगडित आहे.

या विषयाचा वेध घेण्याचा अगदी सरळ व नैसर्गिक मार्ग म्हणजे, भारताच्या आयात-निर्यातीची कुंडली मांडणे, हा. भारताचा परदेशांशी असलेला व्यापार आज कसा दिसतो, या व्यापारात कोणते देश भारताचे मुख्य भागीदार आहेत, कोणत्या देशांना कोणते जिन्नस भारतामधून निर्यात होतात, कोणत्या देशांकडून भारत काय आयात करतो, देशाच्या परकीय व्यापाराचा ताळेबंद कसा दिसतो, त्यांत काय बदल आजवर होत आलेले आहेत, देशात परकीय चलनाचा साठा किती आहे... अशांसारख्या बाबींचा लेखाजोखा मांडणे हा या विवरणासंदर्भातील सरधोपट राजमार्ग ठरावा. परंतु, विवेचनादरम्यान आपण आज अंमळ वेगळी वाट पकडणार आहोत. जागतिक पातळीवरील अर्थकारण गेल्या जवळपास पाव शतकभर विलक्षण पद्धतीने बदलत आलेले आहे. अर्थकारणात जागतिक पातळीवर जे बदल घडून आले व येत आहेत त्यांवर प्रभाव पाडणारे घटक कोणकोणते आहेत त्यांची नोंद घेणे, आपल्या आजच्या विषयाच्या संदर्भात, कळीचे ठरते. बदलत्या जागतिक अर्थकारणाशी भारताचे नाते आज नेमके कसे आहे आणि त्या नात्याचा पोत आजवर कसकसा बदलत आलेला आहे, याचा मागोवा, त्या पार्श्वपटावर, इथे मांडणे अधिक उपकारक ठरावे.

इथे सगळ्यांत महत्त्वाचा मुद्दा ठरतो तो असा की, जागतिक अर्थव्यवस्थेशी व अर्थकारणाशी कोणत्याही देशाचे जे अनुबंध प्रस्थापित झालेले असतात ते, त्या देशाचे एकंदरच परराष्ट्रविषयक धोरण नेमके काय व कसे आहे, त्यांवर

निर्भर असते. म्हणजेच, कोणत्याही देशाचे परकीय व्यापारासंदर्भातील धोरण हे त्या देशाच्या सर्वंकष परराष्ट्रविषयक धोरणाचा एक अविभाज्य घटक असते. केवळ इतकेच नाही तर, काळाच्या निरनिराळ्या टप्प्यांवर तो तो देश अर्थविकासासाठी जी धोरणे अवलंबतो त्यांचा सांधा परकीय व्यापारविषयक धोरणनिर्णयाशी जुळलेला असतो. देशाच्या अर्थकारणाला दिशा देण्यासाठी वेळोवेळी अवलंबिली जाणारी धोरणे त्या त्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आकार घेत असतात. प्रसंगी असेही घडते की, देशात त्या त्या वेळी जी परिस्थिती निर्माण होईल त्या त्या परिस्थितीच्या मागणीनुसार अथवा गरजेनुसार काही धोरणे नव्याने राबवावी लागतात आणि/अथवा विद्यमान धोरणांमध्ये आवश्यक ते बदल घडवून आणावे लागतात. तिसरे म्हणजे, देशोदेशींच्या अर्थव्यवस्थेत जे बदल घडून येत आहेत त्यांचादेखील प्रभाव त्या त्या देशाची नाळ वैश्विक अर्थकारणाशी कशा प्रकारे जुळलेली आहे त्यांवर पडत असतो. आणि चौथे म्हणजे प्रत्येक देशाची परकीय व्यापारासंदर्भातील जी धोरणदृष्टी असेल तिचाही विचार करणे, या संदर्भात, क्रमप्राप्त ठरते. आज चर्चेसाठी आपण निवडलेल्या विषयांचा वेध घेतेवेळी आपण या चारही अंगांनी विचार करण्याचा प्रयत्न या ठिकाणी करणार आहोत. त्यासाठी आवश्यक तिथे व आवश्यक तेवढ्या इतिहासदृष्टीचा अवलंब करणेदेखील आपल्याला क्रमप्राप्त ठरते.

ब्रिटिशांच्या जोखडाखालून मुक्तता करून घेतलेल्या भारताने स्वातंत्र्यानंतर धोरण अवलंबले ते अलिप्ततावादाचे. अमेरिका आणि संयुक्त सोव्हिएत राष्ट्रसंघ अशा दोन बलवान तंबूंमध्ये त्या वेळी घडून आलेल्या जागतिक सत्ताव्यवस्थेच्या विभाजनादरम्यान, त्यापैकी कोणत्याच सत्तेच्या वळचणीला न जाता अलिप्ततावादी भूमिका धारण करणे, ही भारतासारख्या नवस्वतंत्र देशाची त्या वेळी गरजच होती. त्याच वेळी, नवस्वतंत्र भारताच्या पहिल्या पिढीतील नेतृत्वाच्या मनावर गुलामगिरीच्या पार्श्वभूमीचे गडद सावटदेखील होते. ‘ईस्ट इंडिया कंपनी’च्या कावेबाजपणाच्या स्मृती तिथवर फिकट झालेल्या नव्हत्या. परिणामी, खासगी उद्योग आणि परकीय गुंतवणूक यांच्याबाबत संशयाची भावना राष्ट्रीय नेतृत्त्वाच्या मनात खोलवर सघन रुजलेली होती. साहजिकच, नवस्वतंत्र देशाचा आर्थिक विकास साध्य करण्यासाठी कोणत्याही स्वरूपातील परकीय मदतीवर अवलंबून न राहता स्वयंपूर्णतेची कास धरण्याच्या धोरणदृष्टीचा अवलंब त्या टप्प्यावर आग्रहपूर्वक, हिरिरीने केला गेला. त्यांतच,

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेदरम्यान परकीय भांडवलासंदर्भात जे अंदाज बांधलेले होते ते पूर्ततेस न गेल्याने तर परकीय गुंतवणुकीसंदर्भातील साशंकता अधिकच गहिरी बनली.

राजकीय स्वातंत्र्य आणि आर्थिक स्वातंत्र्य यांचे आतड्याचे नाते असते, ही धारणा, ब्रिटिश राजवटीपायी, त्या काळातील जनमानसात पक्की ठाण मांडून बसलेली होती. 'व्यापारासाठी आले आणि अल्पावकाशातच तागडी फेकून तलवार घेते झाले व राज्यकर्ते बनले,' ही ब्रिटिशांसंदर्भातील प्रतिमा दृढावलेली असल्यामुळे, राजकीय स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी आर्थिक स्वातंत्र्याची जपणूक अत्यावश्यकच ठरते, अशी खूणगाठ लोकमानसात स्थिरावलेली होती. स्वतंत्र भारतातील राजकीय धुरिणांच्या पहिल्या पिढीची ती दृढ धारणा म्हणजे वासाहतिक पूर्वसंचिताचे स्मृतीमध्ये रेंगाळलेले अवशेषच जणू! साहजिकच, वैश्विक व्यवस्थेबरोबर अत्यावश्यक तेवढेच साहचर्य प्रस्थापित करण्याची भूमिका– तीदेखील संशय व अविश्वासावर बेतलेली– त्या सगळ्या पर्वादरम्यान चिरेबंदी राहिली. जी काही निर्यात केली जात असे तीदेखील मुख्यत: शेतमालाची – कापूस, ताग, चहा, तेलबिया अशा जिनसांची. आयात मुख्यत: असे ती इंधने व अन्नधान्यांची. तीदेखील गरजेपुरतीच.

त्याला कारणही तितकेच सबळ होते. नवस्वतंत्र देशाची अर्थव्यवस्था प्रदीर्घ काळ परकीय सत्तेच्या जोखडाखाली कुपोषित राहिलेली होती. स्वातंत्र्याची पहाटदेखील फाळणीचे रक्तरंजित व्रण अंगावर वागवतच फटफटलेली होती. ब्रिटिश अंमलाखाली निर्माण झालेले रेल्वेचे मोठे जाळे आणि सिंचित क्षेत्र नवनिर्मित पाकिस्तानात गेले. पहिल्या पंचवार्षिक योजनेचा भर शेतीवर राहिला. परंतु, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत प्राधान्य दिले गेले ते पायाभूत व अवजड उद्योगधंद्यांच्या विस्ताराला. १९६०च्या दशकात दोन युद्धे आणि अवर्षणाला तोंड द्यावे लागले. परिणामी, अमेरिकेहून धान्य आयात करण्याची दु:सह परिस्थिती ओढवलेली होती. त्यांमुळे, निर्यातीसंदर्भात, तत्कालीन धोरणाचा भर हा, प्रथम देशांतर्गत मागणीची पूर्तता करायची व त्या नंतर जे काही वाढीव शिल्लक राहील ते निर्यात करायचे, या कार्यपद्धतीवर स्थिर राहिला. दुसरे म्हणजे, जी अनिवार्य आयात आहे तिच्या पूर्ततेसाठी जेवढे परकीय चलन अत्यावश्यक आहे ते जमा करण्यासाठी अनिवार्य असलेल्या निर्यातीवर भर द्यायचा, हा त्याच धोरणाचा दुसरा भाग राहिला. तिसरे म्हणजे, आयातीपोटी

खर्ची पडणारे परकीय चलन वाचविण्याच्या दृष्टीने आयात कराव्या लागणाऱ्या अधिकाधिक/शक्य तेवढ्या बाबी देशांतर्गत निर्माण करण्याची नीती अवलंबिली गेली. त्यांमुळे, परकीय चलनात बचत होईल, ही भूमिका त्या मागे होती. यालाच 'आयात-पर्यायी' धोरण असे म्हणले जाते. हीच भूमिका देशी उद्योगांना चालना देण्यामागे होती. अन्य देशांमधून आयात केल्या जाणाऱ्या जिनसांच्या निर्मितीमध्ये जे देशी उद्योगधंदे सक्रिय बनतील त्यांच्या वाढविस्तारास पूरक ठरतील अशा विविध प्रकारच्या सोयीसवलती उपलब्ध करून दिल्या जात. यालाच 'आयात-पर्यायी औद्योगीकरण' असे त्या काळात संबोधले गेले व जात असे.

आयात-पर्यायी औद्योगीकरणाच्या धोरणनीतीचा पाठपुरावा केला जाण्यामागे आणखी एक कारणही होते. ब्रिटिश अंमलाखालून मुक्तता करून घेतलेल्या नवस्वतंत्र देशातील शेती कुपोषित राहिलेली होती. तर, परकीय राजवटीपायी देशी उत्पादनव्यवस्थचे पूर्णत: खच्चीकरण झालेले होते. मोठी लोकसंख्या, उपजीविकेसाठी मुख्यत: शेतीवर असणारे घाऊक अवलंबन, प्रगट व प्रच्छन्न बेरोजगारी... अशांसारख्या जटिल समस्यांचे अवघड आव्हान पुढ्यात होते. वेगवान विकास आणि रोजगारनिर्मिती यासाठी देशी उद्योगधंद्यांना चालना देणे त्या टप्प्यावर अतिशय अगत्याचे होते. शेतीवरील अतिरिक्त मनुष्यबळाचा भार उतरविण्याचे आव्हान सर्वांत किचकट होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९१८ सालीच प्रकाशित केलेल्या निबंधात मांडलेल्या विश्लेषणानुसार शेतीवर अवलंबून असणाऱ्या मोठ्या मनुष्यबळाच्या तुलनेत भांडवल कमी असल्यामुळे शेतीची दर एकक सरासरी उत्पादकता दुर्बळ राहिलेली होती. तशा परिस्थितीत, अर्थकारणाला गती देण्यासाठी बिगर शेतीक्षेत्रांत रोजगारनिर्मितीस भरघोस चालना मिळणे अतिशय गरजेचे होते. ते उद्दिष्ट साध्य करायचे तर मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण होणे निकडीचे होते. ते गाठायचे तर, जे काही उद्योगधंदे देशात कार्यरत होते त्यांना संरक्षण पुरवणे अनिवार्य ठरले. तुलनेने मागास देशातील उद्योगधंद्यांची स्पर्धा प्रगत व ताकदवान अशा परदेशी उद्योगांबरोबर होणे देशी उद्योगांच्या मुळावर येणारे शाबीत झाले असते. सर्वार्थाने अधिक कार्यक्षम असणाऱ्या ताकदवर अशा परदेशी उद्योगांकडून निर्माण होणाऱ्या तगड्या स्पर्धेपासून देशी उद्योगांना संरक्षक कवच पुरविण्याला, मग, साहजिकच अग्रक्रम दिला गेला. त्या दृष्टीने आयातीवर नाना प्रकारचे निर्बंध जारी केले

गेले. केवळ अनिवार्य व अति-गरजेच्या जिनसांचीच काय ती आयात केली जावी, अनावश्यक आयातीला पायबंद बसावा यासाठी जबर दराने आयात शुल्कांची आकारणी केली जाणे, आयात आवश्यक असणाऱ्या जिनसांसाठी 'कोटा' प्रणालीचा (ठरावीक मात्रेनेच जिनसा आयात करण्याची अनुमती) अशा पर्यायांचा अवलंब मग करण्यात आला.

आयात-पर्यायी औद्योगीकरणाच्या धोरणाची तामिली करण्यासाठी अवलंबलेल्या उपायांचे अपेक्षित परिणाम दोन प्रकारचे असतात. एक म्हणजे, परदेशातून आणल्या जाणाऱ्या जिनसांवर आयातशुल्कांची आकारणी केल्याने आयात वस्तू देशी बाजारपेठांमध्ये महाग बनतात. परिणामी, त्यांना असणारी मागणी ओसरते. देशी बाजारपेठेतील त्यांचा खप कमी होतो आणि साहजिकच परकीय चलनाची बचत होते. दुसरे म्हणजे, आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंना देशी बाजारपेठेत असणारी मागणी लक्षात घेऊन देशी उद्योग तशा जिनसांच्या देशांतर्गत उत्पादनाकडे वळतात. म्हणजेच, देशांतर्गत औद्योगीकरणाला गती यावी, हा आयात-पर्यायी औद्योगीकरणाच्या धोरणाचा एक महत्त्वाचा अपेक्षित परिणाम होय. स्वातंत्र्योत्तर काळात अवलंबण्यात आलेल्या आयात-पर्यायी औद्योगीकरणाच्या धोरणामागील तर्कशास्त्र काळाच्या त्या टप्प्यावर प्रस्तुत होतेच. परंतु, एक गोष्ट मात्र त्या काळात अशी घडली की, त्या कालखंडादरम्यान मुख्य भर राहिला तो आयातीवर मर्यादा आणण्यावर. परंतु, त्याच वेळी, दुसरीकडून निर्यातीला चालना देण्याबाबतचे ठोस प्रयत्न मात्र लंगडे पडले.

राज्यशास्त्राचे आणि राजकीय अर्थशास्त्राचे अभ्यासक देवेश कपूर व विख्यात अर्थतज्ज्ञ अरविंद सुब्रह्मण्यम यांनी त्यांच्या अगदी अलीकडेच प्रकाशित झालेल्या ग्रंथात विश्लेषित केल्यानुसार, आयात-पर्यायी औद्योगीकरणाचे धोरण अवलंबूनदेखील त्याची अपेक्षित परिणती भारतामध्ये दिसून आली नाही. त्याची कारणे त्रिपदरी दिसतात. पहिले म्हणजे, आयातीवर जारी असलेली जबर बंधने निर्यातोन्मुख उद्योगांच्या उभारणीला लगाम लावणारी शाबीत होत राहिली. दुसरे म्हणजे, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून मोठ्या व पायाभूत उद्योगधंद्यांची उभारणी करण्यावर नियोजनाचा भर राहिला परंतु असे उद्योग मुख्यत: सार्वजनिक क्षेत्रात उभारण्याचे प्रारूप अवलंबले गेले. परिणामी, खासगी कॉर्पोरेट क्षेत्राच्या तुलनेत अकार्यक्षम ठरणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या निर्मितीवर भर राहिला. इथेही, खासगी उद्योगक्षेत्राबाबत तत्कालीन राजकीय

नेतृत्त्वाला पूर्वापार वाटणारा अविश्वास आणि सोव्हिएत राष्ट्रसंघाने अंगीकारलेल्या विकासदृष्टीबाबतचे आकर्षण या दोन घटकांचा प्रभाव बलशाली राहिला. त्याच वेळी, महात्मा गांधी यांच्या विकेंद्रित विकासाच्या धोरणदृष्टीलादेखील सामावून घेण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून खूप मोठ्या प्रमाणावरील जिनसांचे उत्पादन केवळ लघुउद्योग क्षेत्रासाठीच राखीव ठेवण्याचे धोरणही हिरिरीने अंगीकारले गेले. म्हणजेच, उद्योगांच्या खासगी क्षेत्राचे हातपाय आखडून ठेवण्याचाच धोरणात्मक पवित्रा, त्या पर्वादरम्यान व्यवहारात राबता राहिला. या चारही धोरणदृष्टींची पाळेमुळे, या ना त्या स्वरूपात, वासाहतिक भूतकाळातच रुजलेली होती. आयातीद्वारे परकीय सत्तेवरील अवलंबन दृढ बनत राहण्याची भीती, खासगी क्षेत्रातील मोठ्या उद्योगांद्वारे आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणाची संभाव्य शक्यता, समाजवादी आर्थिक धोरणदृष्टीचा अवलंब करून झपाट्याने आर्थिक उन्नती साध्य केलेल्या सोव्हिएत राष्ट्रसंघाच्या प्रयोगाचे गारूड आणि गांधीवादी विचारप्रणाली व आर्थिक विकासाची नेहरूप्रणित नवदृष्टी यांची सांगड घालण्यासाठी लघुउद्योगांवर भर आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या स्मृतींपायी एकंदरच खासगी क्षेत्राबद्दल वाटणारा अविश्वास, या पंचकोनात ती सारी धोरणदृष्टी फिरत होती. या सगळ्याचा प्रभाव भारताचे वैश्विक समुदायाशी त्या पर्वादरम्यान जे नातेसंबंध राहिले त्यांवर पडत राहावा, हे स्वाभाविकच ठरते. किंबहुना, ते अपरिहार्यच होते.

परंतु, वास्तव हे बहुआयामी असते आणि गतिमानही. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेदरम्यान मुख्य भर राहिला तो भांडवलसघन अशा मोठ्या व पायाभूत उद्योगांच्या उभारणीवर. त्यामुळे मग अशा उद्योगांच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या आयातीबाबत उदार भूमिका अवलंबण्यात आली. दुसरीकडे, निर्यातीच्या आघाडीवरील परिस्थितीत काहीच बदल नव्हता. त्यांमुळे, देशाच्या परकीय व्यापाराचे संतुलन विस्कटीत बनले. ती परिस्थिती सावरण्यासाठी, मग, १९६२ साली निर्यातीला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने अनुदानांची योजना अंमलात आणण्यात आली. हे असे असले तरी, सर्वसाधारणपणे पाहता, आयात-पर्यायी औद्योगीकरणाचा पाठपुरावा करणाऱ्या नीतीचाच पाठपुरावा नियोजनप्रधान आर्थिक धोरणांच्या माध्यमातून चालू राहिला. १९६०च्या दशकात त्याचे अनिष्ट परिणाम अधिक प्रकर्षाने जाणवू लागले. एक तर, चीनबरोबर १९६२ साली आणि पुढे १९६५ साली पाकिस्तानबरोबर अशी दोन युद्धे त्या

काळात झाली. ते पुरेसे नव्हते म्हणून की काय, १९६५ ते १९६७ या काळात अवर्षणाला तोंड द्यावे लागले. परिणामी, अन्नधान्याची आयात अपरिहार्य बनली. अन्नधान्याच्या तुटवड्यापायी महागाईचा माहौल अवतरला. त्यांपायी निर्यात बाधित झाली. मुळात, परकीय व्यापारावरील बंधनांपायी देशी उद्योगांना स्पर्धेचे भय नव्हते. त्यांमुळे, बाजारभाव आणि गुणवत्ता या दोन्ही आघाड्यांवर देशी वस्तू जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक ठरत नव्हत्या. या सगळ्याची परिणती निर्यात खचून परकीय चलनाची चणचण निर्माण होण्यात घडून आली. ती कोंडी फोडण्यासाठी भारतीय रुपयाचे अवमूल्यन घडवून आणण्याचे पाऊल १९६६ साली उचलले गेले. भारतीय चलनाचे अवमूल्यन घडवून आणण्याने देशी जिनसा (परकीय खरेदीदारांच्या लेखी) स्वस्त बनून निर्यातीला बढावा मिळेल अथवा मिळावा, अशी धारणा त्या निर्णयामागे होती. त्या पावलाचा अपेक्षित परिणाम जाणवला परंतु तो टिकाऊ ठरला नाही. कारण, भारतीय अर्थव्यवस्थेत त्या काळात महागाईचा तेवर ऐन भरात होता.

अमेरिका, पाकिस्तान आणि चीन यांच्या एकत्रित प्रभावाला तोंड देण्याच्या हेतूने, १९७१ साली, भारताने संयुक्त सोव्हिएत राष्ट्रसंघाबरोबर शांती व सहकार्याचा करार केला. पूर्व पाकिस्तानातील अस्थिरतेपायी अगणित स्थलांतरित भारतीय सरहद्दीमध्ये आश्रयासाठी येऊ लागले. ते वर्ष होते १९७१. परिणामी, निर्वासितांच्या व्यवस्थापनापायी भारतीय अर्थकारणावर ताण पडू लागला. त्या सगळ्याची परिणती १९७१ सालातील डिसेंबर महिन्यात पाकिस्तानबरोबर दुसरे युद्ध होण्यात घडून आली. त्या नंतरचे १९७२ हे वर्ष अवर्षणाचे ठरले. १९७३ साली तेल निर्यातदार देशांच्या संघटनेने वैश्विक समुदायावर कच्च्या खनिज तेलाच्या दरवाढीचे अरिष्ट लादले. या सगळ्यांपायी महागाई तापत राहिली. तिचा फटका सतत बसत राहिला तो निर्यातीला. त्यांतच, १९७४ साली भारताने अणुबॉम्बची पहिली यशस्वी चाचणी केली. एकंदरीने पाहता, १९७०च्या दशकाचा पूर्वार्ध अस्थिरतामयच शाबीत झाला. १९७६ सालापासून देशात राजकीय आघाडीवर अशांतता व अस्थिरता नांदती बनली. इराणमधील उठावापायी १९७९ साली पुन्हा एकवार कच्च्या खनिज तेलाच्या वैश्विक स्तरावरील पुरवठासाखळ्या विस्कळीत बनल्या. या सगळ्यांपायी भारताने पुन्हा एकवार धोरणाचा नूर बदलला. एक तर, कच्च्या खनिज तेलाच्या बाजारभावांतील वाढीपायी परकीय चलनाच्या साठ्यावर ताण आलेला होता.

महाग तेल आयात होत असल्याने देशी अर्थव्यवस्थेत महागाईचा माहौल अवतरला. त्याचा फटका बसू लागला निर्यातीला. परिणामी, परकीय चलनाची गंगाजळी दोलायमान बनली. पुन्हा एकवार आयातीवर मर्यादा आणणे भाग पडले.

आपल्या देशाची ऊर्जासुरक्षा कमालीची परावलंबी आहे. कच्च्या खनिज तेलजन्य इंधनांची देशांतर्गत जी एकंदर मागणी आहे तिच्यातील जवळपास ८० टक्के मागणी आपल्याला आयातीद्वारे भागवावी लागते.१९७३ मध्ये प्रथम व नंतर १९७९ साली तेलाच्या दरांमध्ये वाढ घडून आल्याने १९७०च्या दशकात उभ्या जागतिक अर्थव्यवस्थेलाच जे दोन धक्के (ऑइल शॉक्स) बसले त्यांपायी परराष्ट्रीय संबंधांच्या गोफाची काही अंशी फेररचना गतिमान बनली. परकीय तंत्रज्ञान तसेच भांडवलासाठी अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाबरोबर सौहार्दाचे संबंध राखणे भारताला प्रथमपासूनच भाग होते. तर, चीन व पाकिस्तानच्या जोड सामर्थ्याचा प्रतिवाद करण्यासाठी लष्करी सहकार्यासंदर्भात, भौगोलिकदृष्ट्या निकट असणाऱ्या, सोव्हिएत संघराज्याशी मैत्रीसंबंध टिकवून धरणे भारताला क्रमप्राप्तच होते. त्याच्या जोडीनेच ऊर्जा सुरक्षेची आघाडी स्थिर राखण्याच्या दृष्टीने आखाती देशांबरोबरील राजनैतिक तसेच व्यापारी संबंध दृढ करण्यावर १९७०च्या दशकानंतर भारताने भर स्थिर ठेवला.

दुसरीकडे, त्याच दरम्यान, तेलाच्या दरवाढीद्वारे आखातातील तेलसंपन्न राष्ट्रांच्या आर्थिक भरभराटीला झळाळी आली. मोठ्या प्रमाणावर तिथे बांधकाम क्षेत्रासह अन्य आर्थिक घडामोडींना गतिमानता लाभली. त्या बदलांद्वारे तिथे निर्माण होऊ लागलेल्या कुशल, अर्धकुशल तसेच अकुशल रोजगार संधींचा लाभ केरळसारख्या भारताच्या दक्षिणी राज्याने मोठ्या प्रमाणावर उठवला. दक्षिण भारतातील राज्यांमधून अगणित श्रमिक रोजगाराच्या निमित्ताने आखाती देशांमध्ये स्थलांतर करते झाले. हे श्रमिक त्यांच्या कुटुंबियांसाठी तिकडून जे पैसे पाठवितात त्यांच्या रूपाने परकीय चलनाचा एक सशक्त स्त्रोत भारताला उपलब्ध होत आलेला आहे. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी इराणवर अमेरिका व इस्त्रायलने आक्रमण केल्यानंतर आखातातील अस्थिरतेची झळ आपल्या पुंजीला लागू नये या हेतूने आखातात स्थलांतर केलेल्या भारतीय श्रमिकांनी त्यांची बचत एकदम मोठ्या प्रमाणावर भारतीय बँकांमधील त्यांच्या खात्यांकडे वळविली. परकीय चलनाची भारताची गंगाजळी सुस्थितीत राखण्यामध्ये या स्त्रोताचे योगदान आजवर सतत महत्त्वपूर्ण राहिलेले आहे. एकंदरीनेच, १९७०च्या

दशतकातील विविध घडामोडींपायी परकीय व्यापारासंदर्भात भारताचे धोरण अधिककरून निर्बंधांत्मकच राहिले. धोरणांचा तो नूर जवळपास १९८०च्या दशकाच्या मध्यापर्यंत कायमच राहिला.

त्यांत बदल होण्यास सुरुवात झाली ती १९८५ साली राजीव गांधी यांच्या नेतृत्त्वाखालील सरकार केंद्रात सत्तेवर आल्यानंतर. या सगळ्या विवरणावरून एक बाब स्पष्ट होते ती अशी की, स्वातंत्र्यानंतर, १९८०च्या दशकापर्यंत वरकड जागतिक अर्थकारणाबरोबर भारतीय अर्थव्यवस्थेच्या जुळलेल्या संबंधांचा पोत हा मुख्यत: देशांतर्गत आर्थिक आव्हाने आणि जागतिक व्यवस्थेमध्ये घडत राहिलेले बदल यांच्यावरच ठरत आला. आयात-पर्यायी धोरणाचा जाणीवपूर्वक केलेला अंगीकार व त्यांत टिकवलेले सातत्य आणि महागाई या दोन देशांतर्गत घटकांचा प्रभाव देशाच्या आयात-निर्यातीवर आणि पर्यायाने भारतीय अर्थव्यवस्थेच्या जागतिक अर्थकारणाशी येत राहिलेल्या संबंधांवर या काळात सतत राहिला. मुख्यत:, जागतिक समूहाबरोबर भारताचे संबंध प्रस्थापित करण्याबाबत, राजकीय बाबतींत अलिप्ततावादी पवित्रा तर आर्थिक बाबतींत आयात-पर्यायी औद्योगीकरणाचे धोरण या दोन घटकांनुसार त्या संबंधांची व्यापकता व सघनता निश्चित होत राहिली. निर्यातीच्या संदर्भात, या काळात व पुढेही, देशांतर्गत मागणी भागवून जो वाढावा शिल्लक राहील त्याची निर्यात करायची, या दिशेवरच निर्यातधोरणाचा झोत स्थिर राहिला. आयातीच्याबाबतीत लवचीकता आणण्यास भारताला फारसा वाव कधीच नव्हता व आजही त्या चित्रात फारसा फरक पडलेला नाही.

जागतिक पातळीवर मोठे संरचनात्मक बदल घडून येण्याच्या प्रक्रियेस १९८०च्या दशकाच्या आगेमागे आकार येऊ लागला. दुसऱ्या महायुद्धानंतर संपूर्ण जगभरातच स्थिरावलेल्या शासनसंस्थाप्रणित आर्थिक विकासाची विचारसरणी व व्यवस्था हळूहळू बाजारपेठेच्या नियमांनुसार चलनवलन करणाऱ्या अर्थव्यवहारांच्या व्यवस्थेकडे तेव्हापासून क्रमाने संक्रमण करू लागली. आशिया खंडात त्या बदलांची पहिली पावले उमटली ती श्रीलंकेत १९७७ साली. त्या नंतर अवघ्या काही अंतरानेच आर्थिक पुनर्रचनेला हात घातला तो चीनने १९७८ साली. आर्थिक उदारीकरणाचे वारे जगभरातच गतिमान बनू लागले. शासनसंस्थाप्रणित आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील धोरणात्मक जरठपणा, धोरणांच्या अंमलबजावणीदरम्यानच्या त्रुटी, निर्णयप्रक्रियेतील विलंब...

अशांसारख्या संरचनात्मक (स्ट्रक्चरल) बाबींचा अर्थविकासाची दिशा आणि वेग यांवर पडणारा अनिष्ट प्रभाव १९७०च्या दशकाच्या मध्यानंतर विविध देशांमध्ये प्रकर्षाने जाणवू लागला. त्यांतूनच, आर्थिक पुनर्रचनेची गरज देशोदेशींच्या धोरणकर्त्यांना सघनतेने जाणवू लागली. बदललेल्या आर्थिक पर्यावरणापायी, अर्थविकासाच्या प्रक्रियेत सक्रिय असणाऱ्या 'शासनसंस्था' आणि 'बाजारपेठ' या दोन भागीदारांच्या कार्यकक्षांची फेरआखणी निकडीची ठरू लागली. देशादेशांदरम्यान खुल्या व मुक्त व्यापाराची व्यवस्था नांदावी या दिशेने अर्थविषयक चिंतनाचा भर वाढू लागला. त्याच्या जोडीनेच, परकीय भांडवल व परकीय गुंतवणूक यांच्या संदर्भातील भूमिका अधिक स्वागतशील बनावी, ही विचारसरणीदेखील सखोल रुजू लागली. भांडवलाच्या आंतरराष्ट्रीय स्थलांतराने वेग पकडला. परकीय थेट गुंतवणूक व परकीय संस्थात्मक गुंतवणूक आपापल्या अर्थव्यवस्थांकडे आकर्षित करण्याच्या दिशेने देशोदेशींचे धोरणकर्ते उचित पावले उचलू लागले. भांडवल, तंत्रशास्त्र व श्रमशक्ती हे उत्पादन घटक क्रमाक्रमाने अधिकाधिक चल् व गतिमान बनू लागले. १९९०च्या दशकामध्ये ही प्रक्रिया जगातील अनेक देशांमध्ये वेग पकडती झाली. भारतही त्या प्रवाहात १९९१पासून सहभागी बनला.

या बदललेल्या अर्थकारणाचा लाभ उठवत सिंगापूर, हाँगकाँग, थायलंड, दक्षिण कोरिया या देशांनी निर्यातप्रधान आर्थिक विकासाचे धोरण अवलंबले. निर्यातप्रधान आर्थिक विकासाच्या धोरणाचा नेटाने पाठपुरावा करून जागतिक अर्थकारणात झपाट्याने आगेकूच केलेल्या या देशांचे वर्णन, १९९०च्या दशकात, 'आशियाई वाघ' अशा शब्दांत केले जात असे. चीननेदेखील तोच पंथ पकडला. परंतु, ज्या कारणांपायी आशियाई वाघांनी आणि चीनने निर्यातप्रधान आर्थिक विकासाच्या धोरणाची कास पकडली ती मात्र वेगवेगळी होती. सिंगापूर-हाँगकाँग आदी देशांचा आकारच चिमुकला असल्याने त्यांना देशांतर्गत बाजारपेठ मोजकीच उपलब्ध होती. त्यांमुळे, भरधाव आर्थिक विकासासाठी त्यांना देशाबाहेरील मागणीच्या टेकूची गरज होती. तर, सांस्कृतिक क्रांतीच्या पर्वादरम्यान वरकड जगापासून पूर्णत: अलग पडलेल्या चीनला निकड होती ती पाश्चिमात्य राष्ट्रांनी विकसित केलेल्या अत्याधुनिक तंत्रशास्त्राची. चिनी कम्युनिस्ट पक्षाची चिरेबंद पकड असणाऱ्या राजकीय व्यवस्थेमध्ये शिरकाव करण्यास खुल्या बाजारपेठीय व्यवस्थेला सरावलेले पश्चिमी उद्योग आणि कॉर्पोरेट विश्व साहजिकच

उत्सुक नव्हते. परकीय तंत्रज्ञान व उद्योग आकर्षित करायचे तर देशी व्यवस्थेमध्ये अनुरूप बदल घडवून आणणे अनिवार्य ठरणारे होते. चीनला तर कम्युनिस्ट पक्षाची वज्रमूठ सैल करण्याची इच्छा नव्हती. ही कोंडी फोडण्यासाठी जो मध्यम मार्ग चीनने अनुसरला त्यातूनच 'विशेष आर्थिक क्षेत्रां'चे (स्पेशल इकॉनॉमिक झोन्स - SEZs) प्रारूप अवतरले. देशाच्या मुख्यत: किनारी भागांत, खास परकीय उद्योग आकर्षित करण्यासाठी चीनने आरक्षित भूभाग निर्माण केले. अत्याधुनिक पायाभूत सेवासुविधांची तिथे व्यवस्था केली. अन्य देशी उद्योगांना लागू होणाऱ्या विविध कायदेकानूंमधून (खास करून कामगारविषयक कायदे) त्या विशेष आर्थिक क्षेत्रांमध्ये सक्रिय बनणाऱ्या परदेशी उद्योगांना सूट देण्यात आली. चीनपाशी उपलब्ध होते मुबलक मनुष्यबळ. तेव्हा, परकीय भांडवल व तंत्रज्ञान आणि तुलनेने स्वस्त चिनी मनुष्यबळ यांची सांगड घालत चीनने १९७९–८० सालापासून पुढील तीन दशके दरसाल सरासरी १० टक्के इतक्या वास्तव वेगाने अर्थव्यवस्थेची प्रगती साध्य केली.

तैवान–सिंगापूर–दक्षिण कोरिया–मलेशिया यांसारखे 'आशियाई वाघ' आणि चीन या दोघांनीही भरधाव आर्थिक विकासासाठी 'मॉडेल' अवलंबले ते निर्यातप्रधान विकासाचे. साहजिकच, ज्या बाजारपेठांमध्ये माल पाठवायचा तिथे कोणत्या जिनसांना व सेवांना मागणी आहे त्याचा मागोवा घेत राहणे या देशांना क्रमप्राप्त ठरले. परिणामी, पाश्चिमात्य राष्ट्रांमधील मुख्यत: उच्च तंत्रज्ञानाधारित उद्योगांना लागणारे सुटे भाग, कच्चा माल, प्रक्रियायुक्त उपकरणे यांसारख्या वस्तूंच्या निर्मितीवर 'आशियाई वाघां'नी आणि चीनने लक्ष केंद्रित केले. उभ्या जगात त्या वेळी युग अवतरत होते ते संगणकांचे आणि एकंदरीनेच अंकीय तंत्रशास्त्राच्या प्रचार–प्रसाराचे. त्यांमुळे या उद्योगक्षेत्राला गरजेच्या असणाऱ्या वस्तू व सेवांच्या निर्मितीवर निर्यातोन्मुख विकासाची कास धरणाऱ्या आशियाई उद्योगांनी झोत स्थिर केला. हे देश होते श्रमबहुल. त्यांमुळे तयार कपडे, खेळणी, प्लॅस्टिकच्या जिनसा, पादत्राणे यांसारख्या श्रमबहुल जिनसांच्या निर्मितीवर व निर्यातीवर या देशांनी प्रथम भर दिला. त्यांद्वारे परदेशी बाजारपेठांमध्ये चंचूप्रवेश करून तिथे लोटाभांडे स्थिर केल्यानंतर, क्रमाक्रमाने, अधिक उच्च तंत्रज्ञानाधारित वस्तूंच्या उत्पादनाकडे व निर्यातीकडे या देशांनी त्यांचा मोहरा वळवला. रंगीत दूरचित्रवाणी संच, 'कॅसेट रेकॉर्डर्स', 'रेडिओ', 'मिक्सर' व 'अव्हन'सारखी स्वयंपाकघरात वापरायची उपकरणे इथपासून सुरुवात करून

पुढे मोटरगाड्या तसेच नाना प्रकारची यंत्रसामग्री व यंत्रांचे सुटे भाग निर्माण करून त्यांची निर्यात करण्यापर्यंत या देशांनी झेप घेतली. पुढे अंकीय तंत्रज्ञानाचे पर्व अवतरल्यानंतर संगणक, संगणकांचे सुटे भाग, 'मायक्रोचिप्स्', 'सेमिकंडक्टर्स,' तसेच या दोहोंच्या उत्पादनासाठी आवश्यक असणारे अन्य उत्पादन घटक, रसायने, खनिजे... अशांसारख्या अधिक उच्च तंत्रज्ञानसघन वस्तूंच्या उत्पादनास व निर्यातीस या देशांनी भरघोस प्राधान्य देऊन वैश्विक बाजारपेठेत स्वत:चा केवळ जमच बसवला इतकेच नाही तर दबदबादेखील निर्माण केला.

अर्थविकासाच्या निर्यातप्रधान प्रारूपाचा अंगीकार 'आशियाई वाघ' आणि चीन या दोघांनी त्यांच्या त्यांच्या आर्थिक पुनर्रचना पर्वारंभी केला, ही बाब सत्यच असली तरी, त्या दोघांनी त्या पर्यायाचा अंगीकार करून पुढे जी वाटचाल केली तिच्यात गुणात्मक असा महत्त्वाचा फरक दिसतो. देशी बाजारपेठ चिमूटभर असल्यामुळे, दमदार अर्थविकासाचे हुकूमी उपकरण म्हणून तैवान, सिंगापूर, दक्षिण कोरिया, थायलंड या देशांनी निर्यातप्रधान विकासाचे 'मॉडेल' अंगीकारत पश्चिमी बाजारपेठांवर लक्ष केंद्रित केले. परंतु, चीनची उडी त्याच्या किती तरी पलीकडे जाणारी होती. 'वस्तुनिर्माण उद्योगाचे वैश्विक केंद्र' म्हणून जागतिक पटलावर स्वत:ची पक्की ओळख निर्माण करण्याच्या ईर्षेने चीन झपाटलेला होता व आजही आहेच. मुबलक प्रमाणात उपलब्ध असणारे (व तुलनेने स्वस्त) चिनी मनुष्यबळ आणि पश्चिमी भांडवल व तंत्रज्ञान यांची सांगड साधत चीनने १९८०च्या दशकापासून वस्तुनिर्माण उद्योगाच्या वैश्विक नकाशावर जबरदस्त मुसंडी मारली. त्या प्रक्रियेद्वारे, जागतिक स्तरावर, जणू एक नवीनच श्रमविभागणी साकारली. पश्चिमेतील उद्योगांनी – यांत मुख्यत: सहभाग होता तो अमेरिकी उद्योगांचा – चिनी भूमी आणि मनुष्यबळ यांचा वापर करून राक्षसी प्रमाणावर अनंत वस्तूंची निर्मिती करावयाची व त्यांची विक्री पश्चिमी राष्ट्रांच्या बाजारपेठांमध्ये करायची, हा आंतरराष्ट्रीय स्तरावरील देवाणघेवाणीचा नवीन आकृतिबंध त्या कार्यप्रणालीद्वारे क्रमाने उत्क्रांत होत राहिला. दुसऱ्या भाषेत सांगायचे तर, चीन बनला वस्तुनिर्माण उद्योगाचे वैश्विक उत्पादन केंद्र तर, पश्चिमी राष्ट्रे ठरली उपभोग अथवा ग्राहक केंद्रे. ही श्रमविभागणी याच धर्तीवर १९८०च्या दशकापासून नांदती राहिली. ती अबाधित राहावी यासाठी चीनने सगळ्या प्रकारच्या क्लृप्त्या आजवर अवलंबल्या. चिनी चलन आणि अमेरिकी डॉलर यांचा परस्परांशी असणारा विनिमय दर, सततच,

चीनमधून अमेरिकेला केल्या जाणाऱ्या निर्यातीस अनुकूल राहावा या दृष्टीने त्याचे नियमन करणे, चिनी जिनसांचा उत्पादन खर्च आटोक्यात राहावा यासाठी भांडवल, ऊर्जा, श्रमशक्ती यांसारख्या उत्पादन घटकांचे मूल्य निम्न स्तरावर राखणे, निर्यातोन्मुख उद्योगांना व खास करून विशेष आर्थिक क्षेत्रांत कारभार थाटलेल्या उद्योगांना सर्व प्रकारच्या कामगारविषयक नियमनांमधून सूट व सवलती देणे... अशांसारख्या तरतुदींची योजना चिनी शासनकर्ते आजवर करत राहिले. परिणामी, अमेरिकेबरोबरील आंतरराष्ट्रीय व्यापारात चीनच्या चालू खात्यावर सततच भरघोस आधिक्य खेळते राहिले. चीनकडे, साहजिकच, अमेरिकी डॉलरची प्रचंड अशी गंगाजळी जमा होत राहिली. आजही हे चित्र बव्हंशी तसेच कायम आहे.

या व्यवस्थेच्या विरोधात प्रथम आवाज उठवला गेला तो २०१६ साली सत्तेवर पहिल्यांदा आलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून. डोनाल्ड ट्रम्प यांनी एकंदरच खुल्या व्यापाराची व्यवस्था जणू काही मोडीत काढण्यासाठी त्यांच्या सध्याच्या दुसऱ्या कारकिर्दीदरम्यानही कंबर कसलेलीच आहे. फरक इतकाच झाला की, अमेरिकेबरोबर व्यापारी संबंध असणाऱ्या विविध देशांवर वाढीव आयात शुल्कांचा बोजा लादण्याचा जो खाक्या ट्रम्प यांनी २०२५ सालातील एप्रिल महिन्यापासून जारी केलेला आहे त्याला तितकाच मूँहतोड जबाब चीनने दिला तो दुर्मिळ खनिज घटकांची अमेरिकेला केली जाणारी निर्यात रोखण्याची धूर्त चाल खेळत! तिसरीकडे, येत्या काळातील सगळाच आर्थिक विकास स्वरूपत: ऊर्जासघन राहणार आहे, हे अचूक हेरलेल्या चीनने, आफ्रिका खंडातील विविध देशांबरोबर व्यावसायिक अनुबंध जवळपास गेली दोन ते अडीच दशके क्रमाने विकसित करत, त्या त्या देशांतील ऊर्जासाधनांवर तसेच खनिजसंपत्तीवर स्वामित्व हक्क पद्धतशीरपणे प्रस्थापित केलेले आहेत. हा राजकीय धूर्तपणा न दाखविलेल्या अमेरिकेने, त्याऐवजी लष्करी बळाचा वापर करून व्हेनेझुएलाच्या अध्यक्षांना ताब्यात घेऊन तिथे सत्तांतर घडवून आणले व तेथील तेलसाठ्यांवर कबजा बसविला. तशाच राक्षसी लष्करी बलाचा बडगा उचलून, तेच ट्रम्प, इराणमधील तेलसाठ्यांवर नियंत्रण करण्यासाठी चालू कॅलेन्डर वर्षातील फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या तारखेपासून धडपडत आहेत. परंतु, चीनचा कित्ता गिरवत, इराणने त्याच अमेरिकेला प्रतिशह दिला तो होर्मुझच्या सामुद्रधुनीमधून केल्या जाणाऱ्या तेलाच्या वाहतुकीचा गळा आवळून.

आजचे वैश्विक वास्तव हे असे आहे. आता, या सगळ्यांत भारत कोठे आहे असा प्रश्न विचारला तर त्याचे वास्तवातील (परंतु करूण) उत्तर असे आहे की तो सगळीकडे आहे पण कोणत्याही देशाबरोबर स्वत:च्या अटीशर्तींवर आपल्याला पाहिजे तसे व पाहिजे ते व्यापारी करारमदार करण्याची क्षमता आजमितीस भारताकडे नाही. ते व्यापारी अथवा आर्थिक सामर्थ्य, उदारीकरणानंतर आज जवळपास साडेतीन दशके उलटून चालली तरी भारताच्या गाठीला नाही, ही वस्तुस्थिती मान्य करण्यावाचून गत्यंतर नाही. वैश्विक समुदायाचे घटक असणाऱ्या अन्य देशांबरोबर व्यापारी/आर्थिक/इंधनविषयक करारमदार करतेवेळी तशी 'पोझिशन ऑफ स्ट्रेन्थ' भारताला आजही निर्माण करता आलेली नाही. अलिप्ततावादाच्या धोरणाकडून भारत आजमितीस जगभरातील विविध देशांबरोबरील संबंधांदरम्यान 'व्यूहात्मक स्वायत्तते'चे धोरण अंगीकारण्याच्या धोरणध्रुवाकडे स्थित्यंतर करता झालेला आहे, ही, गेल्या ३०-३५ वर्षांतील एक महत्त्वाची बाब होय. १९९१ सालानंतर भारताने अंगीकारलेले आर्थिक पुनर्रचनेचे धोरणच त्याला कारणभूत आहे. परंतु, चीन अथवा 'आशियाई वाघां'नी ज्या प्रमाणे, आर्थिक पुनर्रचनेद्वारे, वैश्विक नकाशावर स्वत:चे एक समर्थ प्यादे बळकटपणे प्रस्थापित केले तशी काही कामगिरी भारताला आजही जमलेली नाही. प्रचंड लोकसंख्या असणारा, येती किमान एक ते दीड दशक तरी 'डेमोग्राफिक डिव्हिडंड'चा लाभ पदरी असलेला, विपुल वैविध्यता असूनही लोकसत्ताक राज्यव्यवस्था जपणारा मोठा देश म्हणून वैश्विक स्तरावर भारताचा दबदबा आज आहे व येत्या काळातही तो टिकून राहील. परंतु, व्यापारी-आर्थिक-सामरिक-वित्तीय-तांत्रिक स्वरूपाचे वैश्विक सत्तातोल प्रभावित करण्याची क्षमता भारत येत्या काळात कितपत विकसित करू शकेल, याची शंका वाटावी असेच आजचे तरी चित्र आहे.

भारतीय अर्थकारण आणि वैश्विक अर्थकारण यांच्या परस्परसंबंधांचा बाज आणि पोत, निदान आजमितीस तरी, असा दिसतो. काळाची बदलती पावले उचलत, त्या प्रवाहांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी, स्वत:मध्ये आवश्यक अशा क्षमता वर्धिष्णू राखण्याची दूरदृष्टी विकसित करणे, अनेकानेक कारणांपायी, भारताला आजही शक्य बनलेले नाही. या बाबतीत, आजच्या भारताला, छत्रपती शाहू महाराजांकडून अजून बरेच काही शिकणे बाकी आहे. केवळ बाकीच नव्हे तर, आवश्यकही! ■■

# उजळणी

## दांडगे वाचन करणारे तात्यासाहेब

■ गोविंद गणपत काळे

महात्मा जोतीराव फुले निवर्तल्यावर सन १८९१ च्या जानेवारी महिन्यांत कै. सौ. सावित्रीबाई फुले यांच्या सूचनेप्रमाणे मी महात्मा जोतीरावांचे एक अल्पचरित्र लिहून तयार केले होते. व ते चरित्र त्यावेळी सार्वजनिक सत्य धर्म पुस्तकात यशवंतराव फुले यांच्या नावाने प्रसिद्ध झाले आहे. त्यानंतर या महात्म्याचे एक सविस्तर चरित्र लिहिण्याचा कै. यशवंतराव जोतीराव फुले यांचा इरादा त्यांनी एक दोन वेळा बोलून दाखविला होता. परंतु काळाने त्यांचेवर लवकरच घाला घातला. त्यामुळे त्यांचे हातून हे काम पार पडू शकले नाही. या महात्म्याचे सार्थ चरित्र लिहिण्याचे काम अवघड व मोठे वाटल्यामुळे माझ्या हातून ते होवू शकले नाही. महात्मा जोतीरावांचे चरित्र लहानसे का होईना पण आपण लिहावे असे फार पूर्वी माझ्या मनात आले होते. परंतु वरील कारणामुळे ते विचार मनातल्या मनातच जिरले. महात्मा जोतीराव यांच्या वेळची काही थोडी टिपणे माझेजवळ माझ्या आठवणीसाठी मी लिहिलेली होती त्यावरून व मला आज जी आठवण आहे त्यावरून आजचा हा लेख मी लिहून पाठवित आहे.

माझा जन्म हडपसर येथे इ. स. १८७१ मध्ये झाला. माझे वडील गणपतराव काळे हे हडपसर येथील रहिवाशी होते. वयाच्या बारा वर्षेपर्यंत मी प्रथम हडपसर येथे व नंतर पुणे येथे मराठी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतले. मी १० वर्षाचा असतानाच माझे वडील निवर्तल्यामुळे माझ्या शिक्षणात अनेक अडथळे आले. त्यामुळे पुढील शिक्षण घेणे मला दुरापास्त झाले. महात्मा फुले यांच्या मांजरी येथील शेती शेजारीच माझ्या वडिलांची शेती होती. त्यामुळे माझ्या वडिलांचा महात्मा जोतीरावांशी पूर्वीपासूनच मोठा लोभ जडला

होता. म्हणूनच माझ्या आईने माझे वडील निवर्तल्यावर मला महात्मा जोतीराव फुले यांचे हाताखाली लिहिण्याचे कामावर नोकरीस ठेविले. पुण्यास शिकत असताना मी महात्मा जोतीराव फुले यांचे घरीच राहात असे. मला कळू लागल्यापासून म्हणजे मी वयाच्या सातव्या वर्षापासून माझे वडिलांबरोबर जोतीरावांचे मांजरी येथील मळ्यात व पुणे येथे त्यांचे घरी नेहमी जात येत असे. लहान मुले पाहून त्यांना नेहमी प्रेम वाटत असे. ते लहान मुलांना उचलून घेऊन गोंजारीत असत व काही तरी खाऊ देत असत. त्यांचा खाऊ मला काही वेळा मिळाला होता. मी पुढे मोठा झाल्यावरही मी असे पाहिले आहे की, लहान मुलांशी बोलण्यात त्यांना मोठी करमणूक व आनंद वाटत असे. ते अशा लहान मुलांना नेहमी काही ना काही खाऊ देतच असत व शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना पाट्या, पेन्सिली व कागद वाटीत असत. पाट्या पेन्सिलींचा एक लहानसा साठा त्यांचे घरी नेहमीच असे. आणि त्याचा विनियोग ते लहान मुलांशी थोडे बोलून करमणूक झाल्यानंतर त्यांना खैरात वाटण्यात करीत असत. त्यामुळे त्यांकडे कधीकधी लहान मुलांचा घोळकाच जमत असे. महात्मा जोतीरावांकडे सन १८८१ ते १८८४ पर्यंत विद्यार्थी या नात्याने मी रहात होतो. त्यानंतर म्हणजे १८८४ ते १८९१ पर्यंत कारकून ह्या नात्याने नोकरीस असताना माझे जेवण व राहणे त्यांचेकडेच नेहमी करीत असे. महात्मा जोतीराव निवर्तल्यावर थोडे दिवसानंतर त्यांचेकडील नोकरी सोडून मी हडपसर येथे माझी शेती व कामधंदा पाहू लागलो. काही दिवसानंतर सार्वजनिक कामात मी थोडे लक्ष घालू लागलो.

हडपसर येथे मी एक को-ऑपरेटिव्ह सोसायटी काढली. ही सोसायटी फार मोठ्या नावारुपास आली. त्यामुळे मुंबईचे गव्हर्नर जे पुढे हिंदुस्थानचे व्हाईसरॉय झाले त्यांनी या सोसायटीस भेट दिली व हिंदुस्थानचे व्हाईसरॉय लॉर्ड डफरीन यांनी या सोसायटीस भेट देऊन सोसायटीबद्दल प्रशंसोद्गार काढले आणि याच सार्वजनिक कार्याबद्दल सरकारने मला 'रावसाहेब' हा किताब दिला आहे. माझे वय आज ६९ वर्षांचे असून, ईश्वरकृपेने अजून माझी प्रकृती चांगली आहे. संसारातील नित्याचा उद्योग व कामधंदा मी रोज नियमितपणे करीत आहे. माझ्या संबंधी मी जो वर मजकूर लिहिला आहे यात फक्त घडलेली वस्तुस्थिती तेवढीच संक्षेपाने नमूद केली आहे. आता मी जे काही थोडे सार्वजनिक कार्य केले आहे. त्याचे श्रेय महात्मा जोतीराव फुले

यांच्या शिकवणुकीस दिले पाहिजे. माझा महात्मा जोतीरावांशी त्यांच्या शेवटच्या आयुष्यात सुमारे ९-१० वर्षेपर्यंत संबंध आला त्यावेळी माझे विचार पक्वदशेला पोहचलेले नव्हते. त्यांच्या हाताखाली रहावे व त्यांनी सांगितलेले काम करावे एवढेच मी माझे कर्तव्य समजत होतो. आपला मुलगा जोतीरावांच्या हाताखाली राहून जमाखर्च लिहिण्याच्या कामात हुशार होईल, त्याला तेथे मोठमोठे लोक पहावयास मिळतील व दिवसेंदिवस जोतीराव त्याचा पगार वाढवितील या व्यावहारीक फायद्याच्या आशेने माझ्या आईने मला महात्मा जोतीरावांकडे ठेविले होते. यावेळी मी माझ्या बुद्धीच्या कमकुवतपणामुळे महात्मा जोतीराव फुले यांच्या अंगी असलेल्या अनेक सद्‌गुणांची, त्यांच्या थोरपणाची पारख पूर्णपणे मला होवू शकली नाही याबद्दल मला नेहमीच वाईट वाटत असते.

आता महात्मा जोतीरावांच्या बद्दल काही माहीती लिहितो. यापैकी काही माहीती मी त्यांचे घरी असताना जी ऐकिली होती त्यावरून व काही माहीती मी प्रत्यक्ष पाहिल्यावरून देत आहे.

जोतीरावांचा जन्म सन १८२७ साली पुणे येथे झाला. पुणे येथील शनवार वाड्यास ज्या दिवशी आग लागली, त्या दिवशी सकाळी सूर्योदय समयी


मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी
यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत २१ व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणाऱ्या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक : नरेन्द्र चपळगावकर**
**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

त्यांचा जन्म झाला. त्यांच्या शिक्षणात बरेच अडथळे आले होते पण ते निवारले जाऊन इंग्रजी सातव्या इयत्तेपर्यंत त्यांचे शिक्षण झालेले होते. सार्वजनिक काम करण्याची प्रवृति त्यांच्यात कशी उत्पन्न झाली, त्यांनी पुण्यात मुलींच्या शाळा, महार मांगांच्या शाळा, विधवा-विवाह, अनाथ बालकाश्रम वगैरे जी अलौकिक कामगिरी त्यांनी आपल्या तरुण वयात केली तिचे वर्णन महात्मा जोतीरावांच्या चरित्रात आलेले असल्यामुळे तीबद्दल येथे लिहिण्याची जरुरी नाही. ता. २४ सप्टेंबर १८७३ रोजी त्यांनी सत्यशोधक समाज स्थापन केला. त्या समाजाच्या प्रसाराचे काम ते गावोगाव फिरून नेहमी करीत असत.

सन १८७७ साली दक्षिण प्रांतात मोठा दुष्काळ पडला होता. त्यावेळी लहान मुले व आंधळेपांगळे यांच्या बचावासाठी महात्मा जोतीरावांनी 'धनकवडी' येथे एक अन्नसत्र उघडले होते. तेथे रोज दुपारी व संध्याकाळी दोन हजार भाकरी नियमितपणे वाटल्या जात असत, व ह्या भाकरी तेथेच बसून खाव्या असा त्यांनी निर्बंध घातला होता. मुलांनी भाकरी बाहेर नेल्यास त्यांची भाकरी कोणी जबरीने नेईल अथवा मुलांचे आईबाप स्वत:च खातील या भीतीमुळे ते तेथुन भाकरी बाहेर नेऊ देत नसत. या दुष्काळातील काही गोष्टी मला आठवतात. आमच्या गावातील काही लोक आपल्या मुलांना या अन्नसत्रात जेवायला नेत असत. मी या अन्नसत्रात बरेच दिवस गेलो होतो. मला अर्धी भाकर देत असत, तेवढ्यात माझे होत असे.

याच सुमारास जोतीरावांची जी जमीन आमच्या शेतास लागून होती त्यात त्यांनी बागाईत केले होते. हा बाग पुढे पुष्कळ दिवसपर्यंत होता. दुष्काळानंतरच्या पुढच्या गोष्टी मला चांगल्या प्रकारे आठवतात. मी माझ्या वडिलांबरोबर व वडील वारल्यावर आईबरोबर माझ्या शेतात गेलो म्हणजे हटकून त्यांच्या बागात जात असे. त्या बागात माझा जाण्याचा उद्देश नेहमी स्वार्थीपणाचा असे. बागांतील पपया, केळी, ऊस अथवा इतर फळे खाण्याची मला आशा असे व ती आशा अर्थातच तेथे नेहमी पुरी होत असे. शेजाऱ्याच्या शेतकऱ्याचा मुलगा म्हणून मला बागात असलेली फळे खाऊ देण्याबद्दल जोतीरावांनी पूर्ण मुभा दिली होती. व त्यांनी तशी ताकीद आपल्या नोकरांना देऊन ठेवली होती. माझ्या वडिलांचा व जोतीरावांचा चांगला घरोबा आहे हे नोकरांना कळून आल्यावर व पुढे मी जोतीरावांकडे राहू लागल्यावर बगिच्यातील लहानशी मुखत्यारी मी स्वत:च पैदा करून घेतली होती. पुण्यातील महादू वाघुले यांचे

वडील सहादू हे जोतीरावांच्या शेतीवरील मुखत्यार होते. या शेतीची सर्व देखरेख व मालाची विक्री हे सहादू वाघुले करीत असत. मांजरीच्या शिवारातील सर्वे नं. ११४ व त्याच्या आसपासचे काही नंबर जोतीरावांकडे होते. शेतीतील जनावरे, माणसे व मालाचे कोठार हे सर्वे नं. ११४ मध्ये असे. ही सर्व जमीन सुमारे ६० एकर असावी. या जमिनीत कामासाठी १५–१९ बैल, २–३ गाई व १०–१२ माणसे कायमची असत व लागतील तसे अधिक मजूर वेळोवेळी लावीत असत. यामुळे तेथील देखावा म्हणजे एक मोठे लटांबरच भासत असे. या शेतीत त्यांना दरमहा शेकडो रुपयांचे उत्पन्न येत असे, जोतीराव कोठे बाहेर गेले नसले म्हणजे या बागात रोज एक फेरी घालीत असत. ते पुण्यावरून कधीकधी घोड्यावर बसून येत; तर कधीकधी घोड्याच्या गाडीत बसून येत असत. घोड्याची गाडी ते स्वत:च हाकलीत असत. गाडीत बरोबर कोणी मंडळी असली तरी ते गाडी दुसऱ्यास हाकू देत नसत. स्वत: गाडी हाकण्याचा त्यांना मोठा शौक होता. कधी कधी त्यांची गाडी आमच्या हडपसरास थांबत असे. त्यावेळी ते आल्याबद्दलची वर्दी लागताच आमचे गावातील लोक त्यांचे जवळ भराभर गोळा होत असत. आमच्या गावातील ससाणे त्यांचे नातेवाईक होते व या ससाण्यापैकी ग्यानबा कृष्णाजी ससाणे यांच्याकडून त्यांनी आमच्या गावात एक प्राथमिक मराठी शाळा उघडली होती. त्यामुळे आमच्या गावातील लोकांत जोतीरावांचा मोठा मान वाढला होता. माझे प्राथमिक शिक्षण ससाण्यांच्या त्याच शाळेत झाले.

मुळामुठाचे धरण बांधून झाले त्यासाली प्रथमप्रथम पाटाचे पाणी घेण्याबद्दल अज्ञानपणामुळे शेतकरी लोकांत मोठा गैरसमज वाढला होता. लोकांची शेती सरकार घेणार आहे म्हणून सरकारने हे धरण बांधले आहे, जोतीराव सरकारला मिळाले आहेत व ते आपली शेती बुडविणार अशी लोकांची दिशाभूल झालेली होती. हे पाणी कोणी घेईना. फक्त पुण्यातील सुशिक्षितांपैकी ज्यांच्या जमिनी बाहेरगावी होत्या अशा काही लोकांनी हे पाणी प्रथम घेतले. हा गैरसमज दूर व्हावा व शेतकऱ्यांनी या पाण्याचा फायदा घ्यावा म्हणून जोतीरावांनी गावोगावी फिरून शेतकऱ्यांना उपदेश केला. पण पहिली एकदोन वर्षे त्याचा काहीच उपयोग झाला नाही. शेतकऱ्यांपैकी पहिल्याने जोतीरावांनी हे पाणी घेतले व त्या शेतीवर त्यांनी आपला सुंदर बाग उठवला. या पाण्याने चांगले पीक येते व अधिक फायदा होतो ही गोष्ट जोतीरावांच्या शेतीतील पिके पाहून लोकांच्या

चांगली अनुभवास आल्यानंतर पुढे इतर शेतकरी लोक ते पाणी आपल्या शेतीस घेवू लागले. जोतीरावांच्या शेताजवळून एक नळी त्यांनी मुद्दाम खोदवून घेतली होती. ती अजून चालू आहे. तिला त्या दिवसापासून आजतागायत लोक फुल्यांची नळी असे म्हणतात. या बागात जोतीरावांनी अनेक प्रकारची पिके काढली. विदेशी भाजीपाला, फुले व फळे त्यावेळी लोक लावत नसत. ती प्रथमच जोतीरावांनी लाविली. विदेशी भाज्या, फुले, फळे लावण्याबाबत त्यावेळच्या लोकात तसाच गैरसमज होता. परंतु त्यावर जेव्हा जोतीरावांना चांगला पैसा मिळू लागला तेव्हा तो गैरसमज नाहीसा होऊन लोक ती पिके काढू लागली. कोबी, फुलकोबी, टोम्याटी, मोसंबी, अंजीर, डाळिंबे, लिंबू, जांब, केळी, वांगी ऊस इत्यादि अनेक पिके जोतीरावांच्या बागांत असत. आणि काही देशी, विलायती फुलांची झाडे असत. या पाटाच्या पाण्यापासून चांगला ऊस येऊन त्याचा गुळ करता येईल ही कल्पना त्यांना सुचून त्यांनी सुमारे पंचवीस एकर ऊस लावला होता व दरवर्षी या ऊसावर गुन्हाळ लावून हजारो रुपयांचा गुळ जोतीरावांनी विकला. ते पाहिल्यावर लोकही ऊस लावून गुळ काढू लागले. आज मांजरी येथे ऊसाचे रान वाढून जे गुळाचे अथवा साखरेचे एक लहानसे नंदनवन झालेले दिसते त्याचे सर्वस्वी श्रेय जोतीरावांच्या कल्पनेसच आहे यात शंका नाही. पुढे अडचणी येऊन जोतीरावांनी आपली ही शेती सन १८८६-८७ च्या सुमारास विकली.

जोतीरावांनी आपल्या या बागेत एक गवताचा बंगला बांधला होता. त्या बंगल्याभोवती देशी व विदेशी फुलांची झाडे लाविली होती. त्यामुळे ते एक मोठे रमणीयं स्थान झाले होते. कैलासवासी सावित्रीबाई व यशवंत ही दोघे बहुतेक येथे दर रविवारी येत असत. मीही त्यांचेबरोबर कधीकधी येत असे. त्या दिवशी घरच्या भाकरी आणून येथे खाण्याची आमची मेजवानी झडत असे. त्यात जोतीराव उर्फ तात्या असले म्हणजे गोष्टींची मोठी बहार उडत असे. तो दिवस सुट्टीचा असे. त्यामुळे जेवण्याची, फळे खाण्याची व गोष्टी सांगण्याची नुसती चंगळ चालत असे. या मजेत एखादे वेळी संध्याकाळ केव्हा होई याचे भान मंडळीस राहत नसे. संध्याकाळ झाली म्हणजे जोतीरावांना त्या दिवशी करावयाच्या कामाची आठवण होई किंवा कोणी मंडळी पुण्यास भेटावयास येणार असल्यास त्यांची आठवण होई व ते मग मोठ्या लगबगीने गाडी जोडून घोड्यास खूप पळवून लवकर घरी आणीत असत. पण असे प्रसंग जोतीरावांच्या

आयुष्यात फार गेले नाहीत. संध्याकाळपर्यंत आनंदात दिवस गेल्याचे ते अवघे तीन अथवा चार प्रसंगच गेले असावेत, अशी माझी पक्की आठवण आहे.

जोतीराव नेहमी उद्योगात गुंतलेले असत. त्यांच्यामागे नेहमी अनेक कामे असत व ती सर्व कामे ते संथपणे पार पाडीत असत. बागातील त्या रमणीय झोपडीत बसून त्यांनी 'शेतकऱ्याचा असूड' या नावाने निबंध लिहिले होते. या निबंधाचे त्यांनी चार भाग पाडले होते व त्या भागांचे इंग्रजीत तर्जुमे करून त्यांनी ते त्यावेळचे व्हाईसराय लॉर्ड लिटन यांचेकडे पाठविले होते. ही गोष्ट सन १८८२ मध्ये घडली. या निबंधाचा चौथा भाग इंग्रजी राज्यकारभाराविरूद्ध धगधगीत जळत्या अंत:करणाने लिहिला होता. सदर भाग सरकारच्या अतिशय विरूद्ध असल्यामुळे गव्हर्नर जनरलकडे पाठवू नये अशी त्यांच्या अनेक मित्रांनी जोतीरावांना धोक्याची व निकडीची सूचना दिली होती परंतु जोतीरावांनी आपल्या मित्रांच्या त्या प्रेमळ सुचनेचा अव्हेर करून मोठ्या धैर्याने तो भाग लॉर्ड साहेबाकडे पाठविला. त्यांच्या आयुष्यात त्यांना कोणाचीही भीती वाटत नसे. आज सरकारच्या विरुद्ध सभेतील व्यासपीठावरून पुष्कळ लोक बोलून लोकांकडून टाळ्या फुलांचे हार अथवा निवडणुकीतील मानाच्या जागा मिळवतात. परंतु तो काळ असा नव्हता. त्या आशेने त्यांनी ते केले नव्हते. त्या काळात सरकारची मोठी जरब होती. इंग्रजी राज्यकारभाराबद्दल खरमरीत व सडेतोड टीका आपल्या देशात प्रथम जोतीरावांनीच केली. सरकारचे गोरे अंमलदार मोठाले पगार घेऊन शिकारी खेळण्यात, ब्रॅण्डी पिण्यात व ऐशारामात आपला बहुतेक वेळ खर्च करतात. शेतकऱ्यांची दीन स्थिती निवारण्याकडे अथवा त्यांना शिक्षण देऊन सुज्ञ करण्याकडे खर्च करीत नाहीत, म्हणून ते आपल्या लेखातून व व्याख्यानातून मोठी जहाल टीका करीत असत. एवढी कडक टीका त्यावेळी कोणी करीत नसे. त्यामुळे जोतीरावांचे पूर्वकाळचे दोस्त असलेले बरेच युरोपियन अधिकारी त्यांचा राग करू लागले होते. त्यामुळे युरोपियन अधिकाऱ्यांकडे भेटीस जाण्याचे जोतीरावांनी बहुतेक सोडून दिलेले होते.

मांजरी येथील शेतीशिवाय जोतीरावांचे धनोत्पादनाचे मुख्य धंदे म्हटले म्हणजे बांधकामाची कंत्राटे, सुशी विकण्याचे दुकान व भाजीपाला विकण्याची पेढ़ी ही होत. पुणे सातारा रोडवरील कात्रजचा बोगदा खोदण्याचे काम माझ्या जन्माच्या थोड्या अगोदर झाले होते. त्या कामाचे पोट कंत्राट जोतीरावांनी घेतले होते. त्याशिवाय मुळा-मुठाचे धरण, येरवड्याचा मोठा पूल या कामाला

दगड, चुना व खडी पुरविण्याचे पोट कंत्राट त्यांनी घेतले होते. सोल्जरांच्या दोन मोठ्या बराकीचे बांधकाम त्यांनी स्वत: केले तसेच मुळामुठाच्या धरणाखालील नळ्या खोदण्याचे व त्यावर लहान लहान पूल बांधण्याचे कंत्राट कामे त्यांनी केली. तसेच दगडाची फाडी, चुना, विटा, गिट्टी यांचा मोठा साठा ते तयार करून नेहमी विक्रीसाठी ठेवीत असत. या संकटाच्या कामात त्यांना हजारो रुपयांचा फायदा झाला. मुंबई येथील कैलासवासी वासुदेवराव नवरंगे यांच्या मुशीचे ते पुणे येथील एजंट होते. त्यावेळी पुण्यास विलायती मुसा विकण्याचे जोतीरावांचे हे एकटेच दुकान होते. या दुकानावर विक्रीसाठी दोन नोकर असत. या दुकानाची विक्री दररोज कमीत कमी ५० ते १०० रुपये पर्यंत असे. या धंद्यात देखील त्यांना हजारो रुपयांचा फायदा झाला तसेच पुण्यातील मंडईत भाजी व फळे ठोक भावाने विकण्यासाठी व तो माल मुंबईस पाठविण्यासाठी जोतीरावांनी एक पेढी काढली होती. त्या पेढीचे काम कैलासवासी ग्यानबा कृष्णाजी ससाणे यांचेकडे सोपविले होते. परंतु या धंद्यात त्याना विशेष फायदा झाला नाही. जोतीरावांना कामाचा इतका उरक होता की, ते या सर्व धंद्याकडे आपला रोजच फारसा वेळ देत नसत, तरी थोड्या वेळात ते या कामाची व्यवस्था व देखरेख मोठ्या कुशलतेने करून उरलेला फार मोठा वेळ नानाविध सार्वजनिक कार्यात खर्ची घालत असत. सार्वजनिक कार्यातही त्यांना मोठा उरक होता. एकाच वेळी अनेक कामांची व्यवस्था ते नीट रीतीने करीत असत. हा त्यांच्या आयुष्यातील विशेष होय. मुंबई, बडोदा, कोकण, नगर, सोलापूर, सातारा, जुन्नर इत्यादि भागात सत्यशोधक समाजाच्या प्रसारासाठी ते दौरे काढीत असत. सन १८८३ ते ८६ पर्यंत जुन्नर भागात त्यांनी फार लोकजागृती केली. व त्यावेळी त्या भागात सावकारांविरुद्ध शेतकरी कुळाचा एक मोठा संप घडवून आणला. ब्राह्मण व मारवाडी सावकारांच्या हजारो एकर जमिनी शेतकऱ्यांनी पडित पाडल्या व सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापून लोक धर्मविधी स्वहस्ते करू लागले आणि मुलांमुलीच्या शिक्षणासाठी गावोगाव शेकडो नवीन शाळा उघडल्या. सरकारी नोकरीत सर्व जातीचे प्रमाण त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात असावे अशी मोठी चळवळ केली. जंगलखात्यापासून शेतकऱ्यांना होणारा त्रास कमी करावा, शेतकऱ्यांवरचे वाढलेले कराचे ओझे हलके व्हावे, शेतकऱ्यांना शेती सुधारण्यासाठी सरकारने सर्व प्रकारे मदत करावी, कालवे बांधावे व प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक होण्यासाठी सक्तीचा

कायदा करावा, वरिष्ठ शिक्षण मिळण्यासाठी शेतकऱ्यांच्या मुलांना सरकारने सवलती द्याव्यात, गिरण्या, खदानी व इतर सर्व कारख्यान्यातील मजूर कामगारांना जो त्रास आहे तो दूर होऊन त्यांना माणुसकीने जगता येईल अशा प्रकारच्या सर्व सवलती मिळाव्यात वगैरे अशा प्रकारच्या नानाविध चळवळी जोतीरावांनी आपल्या आयुष्यभर केल्या आहेत. मुंबई येथील त्यांचे मित्र कै. रावबहादूर नारायणराव मेघाजी लोखंडे यांच्याकरवी त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांचे मोठे संघटन केले होते. जुन्नर भागात कै. भाऊ कोंडाजी पाटील डुंबरे यांच्या मदतीने त्यांनी प्रचंड चळवळ करून लोक जागृती घडवून आणली होती.

पुढे पुणे शहर म्युनिसिपालिटीचे ते सुमारे ८-१० वर्षे सभासद होते. त्यावेळी पुणे शहराच्या सुधारणेसाठी म्यु. कौन्सिल मार्फत त्यांनी बरेच प्रयत्न केले. परंतु पुढे कामाच्या व्यापामुळे त्यांनी ते सोडून दिले. पुण्याचे कलेक्टर मिस्टर प्लॅन्किट यांनी जोतीरावांना सरकारतर्फे म्यु. कौन्सिल वर सभासद होण्याचा दोन तीन वेळा आग्रह धरला असताही त्यांनी ते नाकारले.

जोतीरावांनी पूर्वी मुलीच्या व महारमांगांच्या शाळा काढून त्यात स्वत: शिक्षकाचे काम केले होते. शिक्षकांना तात्या पंतोजी म्हणण्याची पूर्वकाली वहिवाट होती. त्या वहिवाटीला अनुसरून सर्व लोक त्यांना शेवटपर्यंत व्यवहारात तात्या नावानेच संबोधित असत. म्हणून माझ्या या लेखात त्यांच्या नावाचे जागी तात्या या शब्दाचा उपयोग मी करीत आहे. तात्यांचे काही युरोपियन लोक मित्र असत. त्यापैकी पुण्याचे सिटी मॅजिस्ट्रेट मि. प्लॅन्किटसाहेब हे त्यांचे एक स्नेही होते. फॉरेस्ट खात्यातही एक युरोपियन साहेब त्यांचा मित्र होता. हे दोन साहेब नेहमी तात्यांचे घरी त्यांचेशी बोलण्यासाठी येत असत. त्यातून प्लॅन्कट साहेब हा मोठा दयाळू व सज्जन गृहस्थ होता. जंगल खात्यातील त्या इंग्रज अधिकाऱ्याचे नाव मला बरोबर आठवत नाही. म्हणून मी येथे लिहू शकत नाही. ते दरवर्षी गव्हर्नर साहेबांच्या बंगल्यावर लेव्ही साठी जात असत. व गव्हर्नर साहेब जेव्हा पुण्यास आम दरबार भरवीत असत त्यावेळी त्या दरबाराचे आमंत्रण घेऊन घोडेस्वार तात्यांकडे येत असे. युरोपियन अधिकाऱ्याप्रमाणेच काही मोठमोठाले एतद्देशीय सरकारी अधिकारी तात्यांचे भेटीत येत असत. न्यायमूर्ती रानडे हे त्यांचेकडे पुष्कळ वेळा आलेले मी पाहिलेले आहेत. जे युरोपियन अथवा देशी अधिकारी त्यांचेकडे येत असत त्या अधिकाऱ्यांकडे तात्याही भेटीस जात असत.

तात्यांचा स्वभाव मोठा गोड असे. ते कधी फारसे कुणावर रागावत नसत. नोकराकडून अथवा हाताखालच्या माणसाकडून फारमोठे नुकसान झाले तर त्यांना लहानसा राग येत असे पण तो फार वेळ टिकत नसे. रागावून फार वेळ होत नाही तोच ते त्या माणसाला अशी चुकी पुन: न करण्याबद्दल शांतपणाने गोड शब्दात समजावून सांगत असत. अशा प्रकारचे त्यांचे गोड उपदेश ऐकण्याचे ३-४ प्रसंग मलाही लाभले होते.

आता त्यांच्या दिनचर्येचे थोडे वर्णन करतो. ते रोज सकाळी चार वाजता उठत असत. शौचमुखमार्जन आटोपून सकाळी पाच वाजता पर्वतीच्या रस्त्याने रोज फिरावयास जात असत. घरून निघाल्यावर मार्गात त्यांना त्यांचे फिरावयास जाणारे नेहमीचे दोस्त येऊन मिळत असत. फिरून आल्यावर ताबडतोब स्नान करून ते पावशेर दुधात बाजरीची शिळी भाकरी भाजून ती त्यात मोडून खात असत. हा त्यांचा रोजचा सकाळचा खुराक होता. हे सर्व आटोपून ते सकाळी सात वाजता रोजच्या कामास नियमितपणे तयार असत. बाहेरगावी गेले नसले म्हणजे ते दिवसभर आपल्याकडे आलेल्या मंडळीस भेटणे, दुसरीकडे कोठे भेटावयास जाणे, नेहमी पुस्तके वाचणे व लेख लिहिणे यात आपला सारा दिवस घालवित असत. पुणे येथील जुनागंज पेठेत त्यांचे घर होते. त्या घरात हल्ली 'सावतामाळी फ्री बोर्डिंग' ही संस्था चालू आहे. हल्ली असलेली इमारत तात्यांनीच बांधलेली आहे. या घराला एक मोठा दिवाणखाना आणि बाजूला स्वयंपाक घर, माजघर, सामानाची कोठी इत्यादि तीन चार खोल्या आहेत. दिवानखान्यात एक बिछाईत केलेली असे व तीन चार खुर्च्या व एक लहान मेज असे. त्यांचे दिवाणखान्यात आलेल्या मंडळीशी ते बोलत आणि आतील व्हरांड्यात आडोसा करून त्यांनी एक लहान खोली काढली होती. तिच्यात ते लिहिण्याचे व वाचण्याचे काम करीत असत. त्यात एक कपाट, लहान मेज व एक खुर्ची असे. कपाटात त्यांची एक लहानशी लायब्ररीच होती. त्या लायब्ररीत काही इंग्रजी व मराठी पुस्तके असत. आणि एका कोपऱ्यात रोजची येणारी वर्तमानपत्रे ठेवीत असंत. लिहिण्याच्या भरात असले म्हणजे ते कधी कधी जेवण उशीरा करीत. परंतु नेहमीचे त्यांचे दुपारचे जेवण बारा वाजता व संध्याकाळचे जेवण सात वाजता होत असे. आणि रात्री १० वाजता ते झोपत असत. एखादे वेळी काही मंडळी येऊन बसली अथवा ते लिहिण्याच्या अथवा वाचण्याच्या भरात असले तर तें खूप रात्रीपर्यंत जागत असत. तथापि

अशांही वेळी ते सकाळी नियमाने चार वाजता उठत असत. एखादेवेळी ते सकाळची फिरण्याची सफर घोड्यावरून मारीत असत. त्यांचेजवळ एक मध्यमप्रतीचा चांगला घोडा असे. त्यांची राहणी अगदी साधी होती ते पागोटे बांधीत असत, पूर्वी त्यांचा रंग तांबडा असे. परंतु म्हातारपणी ते पांढरेच पागोटे बांधत असत. त्यांच्या अंगावर एक साधे उपरणे असे. ते कधी लांब घोळ अंगरखा तर कधी लांब कोट घालीत असत. त्याचाही रंग पांढराच असे त्यांचे कपडे ते पुण्यातील त्यांना आवडत असलेल्या काही खास मोमिणाकडून विणवून घेत असत. व तेच कपडे अंगावर घालत. त्यांच्या हातात एक काठी असे. त्यांचा जोडा देशी चांभाराकडून बनविलेला असा साधा असे. त्यांना अंग रगडून घेण्याची सवय असे व ते बहुतेक रोज संध्याकाळी आपले अंग रगडून घेत असत.

बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड याशी तात्यांचे मोठे प्रेम असे, ते वर्षातून एकदा तरी बडोद्यास जात असत व तेथे १०-१५ दिवस राहत असत. एका वर्षी त्यांचा महाराजांकडे जवळ जवळ तीन महिने मुक्काम झाला होता. महाराज पुण्यास आले म्हणजे जोतीरावांकडे आपली घोडागाडी पाठवून त्यांना भेटीस बोलावत असत. महाराजांनी मागासलेल्या बहुजन समाजाच्या समाज सुधारणेकडे लक्ष पुरवावे म्हणून जोतीरावांनी प्रथम प्रथम चांगले प्रयत्न केले व त्यात त्यांना यश येऊन महाराज जेव्हा बहुजन समाजाच्या सुधारणेकडे लक्ष देऊ लागले तेव्हा तात्यांना मोठा आनंद झाला होता. श्रीमंत सयाजीराव गायकवाड, भाऊ कोंडाजी पाटील, भालेकर, नारायणराव मेघाजी लोखंडे, डॉ. रामजी संतुजी लाड, डॉ. विश्राम रामजी घोले, स्वामी रामय्या व्यंकय्या अय्यावारू, पंडित धोंडुराम नामदेव, देवराव ठोसर इत्यादि अनेक मंडळी बहुजन समाजाच्या सुधारणेसाठी खटपट करीत असलेली पाहून तात्यांना मोठा आनंद वाटत असे व ''आता माझे काम झाले, मी हाती घेतलेले काम आता बंद पडू शकत नाही. आता माझ्या कामाला कळकळ असलेली व मेहनत घेणारी मोठमोठी मंडळी लागली आहेत. पुढील थोड्या काळात बहुजन समाजात प्रचंड जागृती उत्पन्न होऊन समाजोन्नति होईल आणि हे दृष्य मी जरी पाहू शकलो नाही तरी सर्व जग पाहील'' असे ते कधी कधी मोठ्या आनंदाने आपल्या पत्नीजवळ बोलत असत. वरील मंडळीपैकी कोणीही त्यांचेकडे आले तर त्यांचे मन आनंदाने भरून जात असे.

त्यांनी १८८५ च्या गुढी पाडव्यास पुण्यात समाजाच्या झेंड्याची मोठी मिरवणूक काढली होती. त्यांच्याकडे रोज कोणती ना कोणती मंडळी येत असत. आलेल्या मंडळीचा ते मोठा बहुमान करीत असत. त्यांना पानसुपारी अथवा बिडी यापैकी कशाचेही व्यसन नव्हते. त्यामुळे भेटीस आलेल्या मंडळीस वरीलपैकी काहीच मिळत नसे. म्हणून निघते वेळी ते प्रत्येकास फुलांचा लहानसा गुच्छ देत असत. कामानिमित्ताने त्यांचेकडे काही ब्राह्मण गृहस्थ येत असत. त्यांचा ते विशेष आदर सत्कार करीत असत. त्यामुळे भेटीत आलेल्या कोणत्याही ब्राह्मण गृहस्थाचे मत त्यांचेविषयी चांगले होई. खाजगी भेटीत ते ब्राह्मणांवर कधीच रागावत नसत. ब्राह्मण समाजावरचा राग ते आपल्या लेखातून, पुस्तकातून व व्याख्यानातून काढीत असत. बाहेरून आलेली कोणी ना कोणी मंडळी रोज त्यांच्या पंक्तिस असत. त्यांचे एक महार जातीचे अनुयायी कै. गोपाळ बुवा वलंगकर हे त्यांचेकडे असले म्हणजे भोजनास असलेल्या सर्व मंडळीना सहभोजनाचा लाभ होत असे. विटाळ अथवा शिवाशिव त्यांचे घरी चुलीपर्यंत मुळीच नसे. विटाळ पाळणाऱ्या माणसाचा त्यांना मोठा तिटकारा वाटत असे. त्यामुळे बाहेरून आलेल्या काही अगांतुक सोवळ्या मंडळीस निमूटपणे वलंगकराच्या पंक्तिस निरूपायाने बसावे लागे.

पुण्यातील गोसावी मंडळीपैकी कै. भोलागीर, नागेश्वरगीर इ. गृहस्थ त्यांचे मित्र होते. हे लोक मोठे श्रीमंत होते. यापैकी भोलागीर बुवांची मुलगी त्यांनी हरी रावजी चिपळूणकर या नावाच्या एका हुशार पण गरीब स्थितीतील तरुणास देवविली होती. हे लग्न तात्यांनी घडवून आणले होते. हे हरि रावजी पुढे मोठ्या योग्यतेस चढले होते व ते अखेरपर्यंत तात्यांचे एकनिष्ठ भक्त होते.

मुंबईतील काही मित्रांच्या आग्रहावरून मागासलेल्या जातीतील विद्यार्थ्यांसाठी तात्यांनी आपल्या घराशेजारी एक बोर्डिंग उघडले होते. या बोर्डिंगात मुंबई, ठाणे व जुन्नर वगैरे बाहेरगावचे २५ – ३० विद्यार्थी असत. त्यातून श्रीमंताची मुले खर्च देत असत व गरीबांच्या मुलांना मोफत ठेवीत असत. बोर्डिंगातील सुमारे १५ विद्यार्थी मोफत ठेविलेले असत व त्यांचा सर्व खर्च तात्या आपले घरून लावीत असत. जोतीरावांनी आपल्या आयुष्यात विद्यादानाचें महत्कार्य केले आहे. कुठल्याही गरीब विद्यार्थ्यास ते सढळ हाताने मदत करीत असत. पाट्या, पेन्सिली, पुस्तके व फी साठी ते पैसा अनेक विद्यार्थ्यांना सारखा वाटीत असत. त्यांचे घर म्हणजे विद्यादानाचे सत्र होते. त्यांनी मिळविलेल्या

संपत्तीपैकी मोठा हिस्सा या कामी खर्ची घातला आहे. शिक्षण घेतल्याशिवाय आपल्या देशातील लोकांना कोणत्याही सुधारणा करवून घेता येणार नाहीत असे त्यांचे वाक्य असे. म्हणून ते त्यांच्याकडे मदत मागण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना काही तरी दिल्यावाचून चुकून देखील वापस पाठवत नसत. तात्यासाहेबांनी हे उघडलेले बोर्डिंग त्यांच्या मरणानंतर सावित्रीबाईनी व यशवंताने काही दिवस चालविले होते. परंतु अखेरीस गरीबी आल्यामुळे ते त्यांना बंद करावे लागले.

जोतीराव पट्टीचे वक्ते होते. आपले म्हणणे दुसऱ्यास पटवून देण्याची शैली त्यांना उत्तम साधली होती. त्यांचेशी बोलू लागणाऱ्या माणसावर त्यांची छाप पडत असे. ते मोठे स्पष्टवक्ते होते. त्यामुळे काही लोक त्यांना फटकळ समजत असत. सत्य गोष्टी ते कधीही लपवून ठेवीत नसत. सत्याचे ते वाली होते. खरी गोष्ट सांगणे, खरे वर्तन करणे व सत्य बोलणे यांचे ते मूर्तिमंत पुतळे होते, असे जर मी लिहिले तर त्यात मुळीच अतिशयोक्ति होणार नाही. कारण ते खरोखरच सत्याचे मोठे वाली होते. असत्य बोलणे त्यांना मुळीच आवडत नसे. किती मोठा मनुष्य असला तरी त्याच्या तोंडावर भीती अगर भीड न बाळगता ते निर्भिडपणाने सत्य व स्पष्ट बोलत असत, पण त्यांचा हा स्वभाव त्यावेळी पुष्कळ लोकांना आवडत नसे.

त्यांचे वाचन दांडगे होते आणि त्यांचे लेखन तर त्यापेक्षा दांडगे होते. ते इंग्रजी व मराठी पुस्तके वाचीत असत आणि वाचलेल्या पुष्कळ ठिकाणी पेन्सिलीनें खुणा करीत असत. 'राईटस ऑफ मॅन' हे टॉमस पेन याने लिहिलेले पुस्तक त्यांचे आवडीचे होते. टॉमस पेनची आणखी दुसरी पुस्तकेही तात्यांजवळ होती. याशिवाय अनेक इंग्रजी ग्रंथ ते वाचीत असत. ख्रिस्ती धर्मातील 'देव आणि मनुष्य' यांच्यातील येशुची मध्यस्थी त्यांना मुळीच पसंत नव्हती. आणि अशा प्रकारचा वाद ते बैठकीत मोठमोठ्या युरोपियन मिशनरीबरोबर घालीत असत. तथापि ख्रिस्ती, महंमदी, बौद्ध इत्यादि धर्मात असलेली सामाजिक समता हिंदू धर्मापेक्षा फार वरच्या दर्जाची आहे, असे ते थोर मनाने कबूल करीत असत. हिंदू धर्मातील सामाजिक विषमतेवर त्यांचा मोठा कटाक्ष होता. प्रत्येक मनुष्याला जगात सर्व क्षेत्रात समान हक्क असले पाहिजेत असे ते मुख्यत्वेकरून जाहीर रीतीने बोलत व लिहित असत. त्यांनी त्यांच्या आयुष्यात काही पुस्तके लिहिली परंतु त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने त्यांनी सर्व

विषयांवर आपले लहान लहान लेख लिहिले होते. त्यावेळच्या 'दीनबंधू' पत्रातून प्रत्येक अंकात त्यांचा एक मोठा लेख येत असे. त्या पत्राच्या फायली आज असत्या तर त्यांच्या त्या लेख संग्रहाची मराठी वाङ्मयात फार मोठी भर पडली असती. ते कडक लेखणीचे लेखक होते. लिहिताना ते कोणाच्या नाराजीची तमा बाळगीत नसत. ते टेबलावर बसले म्हणजे भराभर लिहित असत. लेख लिहून पुरा झाला म्हणजे तपासून पाहताना पुष्कळ ठिकाणी नेहमी खाडाखोड केलेली असे. त्यांनी लिहिलेल्या कच्च्या लेखांचे पक्के काम मीच करीत असे आणि या एका कामाकरिताच मी त्यांच्याकडे नोकरीस होतो. त्यांनी लिहिलेल्या अनेक लेखांचे 'शेतकऱ्याचा असूड', 'इशारा', 'सत्सार' या लहान चोपड्यांचे आणि 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तकाचे कच्च्या टाचणावरून पक्के लिहिण्याचे काम मी केले आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' लिहिण्याचे कामी हाताखाली त्यांनी एक दुसरा मदतनीस कारकून दिला होता. या पुस्तकात त्यांनी जगातील अनेक धर्मावर प्रकाश पाडला असून मानवी धर्माचा म्हणजेच सत्य धर्माचा पुरस्कार केलेला आहे.

आर्यभट लोकांनी या देशावर स्वारी करून येथील मूळच्या रहिवाशी राजे लोकांचा पाडाव केल्यावर आपले वर्चस्व कायम टिकविण्यासाठी त्यांनी या देशातील मूळच्या रहिवाशात कृत्रिम जातिभेद उत्पन्न केला. त्यापूर्वी या देशातील सर्वच लोकांची एकच जात होती व तिला क्षत्रिय म्हणत असत, असे जोतीरावांचे म्हणणे होते. ब्राह्मणाखेरीज सर्व जातीचे लोक या देशाचे मूळ क्षत्रिय आहेत असे प्रतिपादन ते करीत असत. या क्षत्रिय लोकांबद्दल त्यांना मोठा अभिमान वाटे. क्षत्रियांपैकी छत्रपति शिवाजीमहाराजांच्या चरित्रावर त्यांनी फार वर्षापूर्वी एक पोवाडा लिहिला होता. रायगडास असलेली श्री शिवाजी महाराजांची समाधी त्यांनी सन १८८५ साली पाहिली व तिची पडझड झाली असून ती दुरूस्त करण्याची जरूरी असल्याबद्दलचा लेख प्रथम दीनबंधू या पत्रात लिहिला. थोड्याच दिवसानंतर चाफळकर स्वामीच्या अध्यक्षतेखाली शिवाजी स्मारकासंबंधाने पुणे येथे एक सभा जोतीरावांनी भरविली यावरून शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे आपल्या देशातील ते पहिले पुरस्कर्ते होऊन गेले हे कोणासही दिसून येईल. या सभेत वरील कामासाठी एक कमिटी नेमली होती, पण त्या कमिटीचे पुढे काय झाले ते काहीच ऐकू आले नाही.

सत्यशोधक समाजाच्या सभासद नोंदणीचे तात्यांनी एक पुस्तक ठेविले होते. सभासदाकडून देखील प्रत्येकी चार आणे वर्गणी येई. सत्यशोधक समाजाचे जमाखर्च लिहिण्याचे काम प्रथम तात्या ठेवत असत. पण पुढे ते माझ्यावर सोपविण्यात आले होते. याशिवाय सन १८८७ पासूनच त्यांचा खासगी जमाखर्च लिहिण्याचे काम त्यांनी माझ्याकडे सोपविले होते व ते मी करीत होतो. घरखर्चासाठी लागणाऱ्या ठोक रकमा सावित्रीबाईंकडे देण्यात येत असत व त्यांचा जमाखर्च त्या ठेवीत असत. सत्यशोधक समाजाची इतर पुस्तके व कागदपत्रे यांची व्यवस्था तात्यासाहेबांच्या देखरेखीखाली मी लावीत असे. दर रविवारी रात्री कै. भाऊ मनसाराम ढवारे नाईक यांचे दिवाणखान्यात सत्यशोधक समाजाच्या सभासदांची आठवडी सभा भरत असे. व वर्षातून एकदा सप्टेंबर महिन्याच्या २४ तारखेस समाजाचा वार्षिक उत्सव होत असे. समाजाचा नवीन सभासद होणाऱ्या गृहस्थास बेलभंडार व तळी उचलून समाजाची तत्त्वे मी पाळीन अशी प्रतिज्ञा करावी लागत असे. परंतु पुढे पुढे बेलभंडाराची चाल त्यांनी बंद केली असावी. त्याचे कारण मला कळले नाही.

आता पुढे कै. सावित्रीबाई व यशवंता यांचे विषयी थोडे लिहितो. जोतीरावांनी विधवा स्त्रियांनी गर्भपात करू नयेत म्हणून त्यांच्या गुप्त बाळंपणासाठी आपल्या घरी जे अर्भकालय उघडले होते त्यातील एका ब्राह्मण विधवेच्या पोटी यशवंतरावाचा जन्म झाला होता. या अर्भकालयात बरीच लहान मुले होती पण ती लहानपणीच वारली. यशवंताखेरीज त्यापैकी मी कोणासच पाहिले नाही. सावित्रीबाईंना मूलबाळ झाले नाही. त्यांनी व जोतीरावांनी पोटच्या मुलांप्रमाणे यशवंताचा सांभाळ केला. यशवंता फार सच्छिल व शांत स्वभावाचा मुलगा होता. तो माझ्यापेक्षा काही वर्षांनी लहान होता. तात्या व सावित्रीबाई या दोघांच्याही मनांत खरे पुत्रप्रेम वास करीत होते. त्याला देखील त्यांच्याशिवाय आपली मातापितरे दुसरी असल्याचे वाटत नव्हते. जोतीराव वारले त्यावेळी तो शाळेत शिकत होता. नंतर पुढे तो डॉक्टरीची परीक्षा उत्तीर्ण होऊन मिलिटरी खात्यातील डॉक्टरची परीक्षा दिल्यावर एकदा कोल्हापूरचे तरुण महाराज छत्रपती श्री शाहू महाराज यांच्यापुढे सामाजिक विषयावर पुणे येथे त्यांच्या बंगल्यावर जावून निबंध वाचला. तो निबंध महाराजांना इतका आवडला की त्यांनी यशवंतास आपल्या पदरी नोकरी राहण्याचा आग्रह धरला. तथापि यशवंताने ती गोष्ट नाकारली. संस्थानाची नोकरी त्याच्या स्वभावास पसंत पडली नाही.

हे पुत्ररत्न जोतीराव व सावित्रीबाई यांच्या तालमीत वाढले होते. तात्यासाहेब आजारी असताना सावित्रीबाईंनी कष्ट घेतल्यास मोठे आश्चर्य नाही. परंतु यशवंतानेही पितृभक्तीने आपल्या वडिलांची सेवा केली.

आता सावित्रीबाई संबंधाने लिहावयाचे म्हणजे त्या माऊलीचे एखाद्या लेखकाने स्वतंत्रच चरित्र लिहिले पाहिजे. जोतीराव जे एवढ्या मोठ्या योग्यतेस चढले त्याचे बरेच मोठे श्रेय त्यांच्या या सुपत्नीस दिले पाहिजे. राग म्हणून काय चीज आहे ती या बाईच्या गावीच नव्हती. ती नेहमी हसतमुख असे. तिचे हसू गालावर तेवढे दिसून येईल इतकेच ते मर्यादित असे. सावित्रीबाईला सर्व लोक ‘काकू’ म्हणत असत. पाहुणे मंडळी घरी आली म्हणजे तिला मोठा आनंद वाटत असे व त्यांच्या करिता ती मोठ्या आवडीने गोड जेवण तयार करीत असे. ती फार ममताळू तशीच दयाळू होती. तिने जन्मास आल्यावर विद्यादानाचे काम तर केलेच परंतु तितकेच तिने अन्नदानही केले. तात्यांना भेटण्यास आलेल्या मंडळीस आग्रहाने जेवावयास लावणे हे जणु तिचे मुख्य काम होते. जोतीराव सावित्रीबाईस मोठा मान देत असत. तिला ते बोलताना ‘आहो, जाहो’ या बहुमानार्थक शब्दांनी हाका मारीत असत. सावित्रीबाई तात्यांना ‘शेटजी’ या नावाने हाक मारीत असे. या दोघात पतीपत्नीत्वाचे खरे प्रेम भरले होते. सावित्रीबाईंनी नको म्हटलेले काम तात्या कधी करत नसत. ती फार सुविचारी व दूरदृष्टीची होती. जोतीरावांचे लग्न झाले तेव्हा त्यांचे वय ११ वर्षाचे व सावित्रीबाईचे वय सात वर्षाचे होते. सवित्रीबाईचे माहेर पुण्याजवळील झगड्याची वाडी हे होय. तिचे वडील त्या गावचे पाटील असून मोठे श्रीमंत होते. त्यांनी आपले लग्न मोठ्याच थाटाने केले होते. या झगडे पाटलांनी आपल्या मुलीच्या व जावयांच्या वरातीसाठी एक हत्ती आणविला होता व त्यांची वरातीची मिरवणूक हत्तीवर बसवून काढली होती. सावित्रीबाई स्वरुपवान होत्या. त्यांच्याविषयी आप्तजनात मोठा आदर होता. जोतीरावांनी काढलेल्या मुलींच्या शाळांतून शिक्षकिणीचे काम केलेले असल्यामुळे स्त्री शिक्षणाचा विस्तार झाल्यानंतर सुशिक्षित बायांत सावित्रीबाईसंबंधी पूज्यभाव वाढलेला दिसत होता. तिच्याकडे आलेल्या मुलींना व स्त्रियांना ती नेहमी सदुपदेश करीत असे. पुण्यातील काही मोठमोठ्या सुशिक्षित बाया कधी कधी तिच्या भेटीस येत असत.

एक मिशनरीबाई, पुण्यास राहत असे. तिचा भाऊ हिंदुस्थानचा व्हाईसराय होऊन गेला आहे. ही मडम पुष्कळ वेळा सावित्रीबाईकडे बोलण्यासाठी येत असे. तिला मराठी चांगले बोलता येत असे. पंडिता रमाबाई व डॉ. आनंदीबाई जोशी ह्या दोन तीन वेळा सावित्रीबाईचे भेटीस आल्या होत्या. याशिवाय आणखी काही बाया येत असत.

जोतीरावांचे एक बालमित्र कै. मोरो विठ्ठल वाळवेकर हे नेहमी तात्यांकडे यावयाचे त्यावेळी स्त्री-सुधारणेवर नेहमी बोलणे होत असे. स्त्रियाविषयी एक स्वतंत्र मासिक काढण्याबद्दल सावित्रीबाईंनी सुचविल्यावरून वाळवेकरांनी 'गृहिणी' या नावाचे एक मासिक काढले होते. या मासिकात स्त्री-शिक्षण व त्यांचा सामाजिक समान दर्जा यावर लेख येत असत. या मासिकाच्या अंकाची काकू दर महिन्याला वाट पाहात असत व ते आले म्हणजे त्या मोठ्या आवडीने वाचत असत. त्यात देण्यासाठी काकू लहान लहान लेख लिहीत असत. परंतु या बाईस आपले स्वत:चे नाव प्रसिद्ध करणे मुळी आवडत नसे. त्यामुळे टोपण नावाने अथवा दुसऱ्या एखाद्या मैत्रिणीच्या नावाने त्या लेख प्रसिद्ध करीत असत. आपली कीर्ती दुसऱ्याचे तोंडून ऐकण्याचा त्या बाईला कंटाळा वाटत असे. जोतीरावांनी अनेक वेळा आग्रह धरला असतांनाही तिने आपला फोटो काढू दिला नाही. विद्यार्थिनींची तिला फार आवड असे व त्यांना ती शाळेची पुस्तके बक्षीस म्हणून वाटीत असे. तात्यांचे काही चुलतभाऊ व पुतणे त्यांच्याविरूद्ध वागत असत. परंतु सावित्रीबाईचे कोणाशीच वाकडे नसे. त्या दयाळू असल्यामुळे सणावाराचे दिवशी ती त्यांना आपले घरी बोलावून जेवू घालीत असे पण ही गोष्ट कधी कधी तात्यांना आवडत नसे. ते पाहून तात्या दौऱ्यावर गेले असताना तिने चांगला स्वयंपाक करावा व खूप मोठी पंगत उठवावी. ही गोष्ट तात्यांना कळली म्हणजे थोडे रागावून म्हणावे की हे काय ? अशा लोकाकरिता इतका मोठा खर्च तुम्ही का केला? त्यावर काकूंनी हसून उत्तर द्यावे की, त्यांच्या वडिलांची कमाई ते खातात. हे उत्तर ऐकले म्हणजे तात्यांना हसू येई व हसण्यातंच त्यांचा राग वितळून जाई. सावित्रीबाईचा पोशाख तात्याप्रमाणेच अगदी साधा असे. तिच्या अंगावर अलंकार नसत. तिच्या गळ्यात एक पोत व एक मंगळसूत्र असे. आणि कपाळावर भले मोठे कुंकू लावलेले असे. ती रोज सकाळी सूर्योदयापूर्वी सौच्यमुखमार्जन करून सडा समार्जन उरकून घेई. तिचे घर स्वच्छ असे.

त्यांच्या घरात स्वच्छता हे एक वैशिष्ट्य होते. त्यांच्या दिवाणखान्यात थोडाही केर अथवा धूळ पडलेली त्यांना खपत नसे. काकूंचे घरातील भांडी व इतर सामान स्वच्छ असून टापटिपीने ठेवलेले असे. सावित्रीबाईच्या हाताखाली घरातील कामासाठी एक बाई व एक गडी नेहमी असे. स्वयंपाक स्वत: करीत असत. इतक्या तत्पर असत की काही कामानिमित्त तात्यांनी हाक मारली आणि त्यावेळी जेवत असल्या तरी हात धुवून तिकडे जात असत. ही गोष्ट जर तात्यांच्या लक्षात आली तर त्यांना वाईट वाटून म्हणावे की तुम्हाला जेवण सोडून कोणी यावयास सांगितले? मला काय माहीत तुम्ही जेवत होता? काकूने उत्तर द्यावे की, तुम्ही बोलावले म्हणून मी आले. असे प्रसंग मी पाहिले आहेत. तात्यांच्या खाण्याची व प्रकृतीची ती फार काळजी घेत असे. तात्या सन १८८८ च्या सुमारास जेव्हा पक्ष घाताने आजारी पडले तेव्हा या माऊलीने त्यांची अत्यंत मोठी सेवा केली. तिच्या कष्टामुळेच ते त्या आजारातून जगू शकले, असे म्हणणे मोठ्या धारिष्ट्याचे होणार नाही.

सार्वजनिक कामात सर्व ऐवज खर्ची घातल्यामुळे त्यांना शेवटच्या दिवसात आर्थिक अडचण उत्पन्न झाली होती. या आजारांच्या प्रसंगी डॉ. विश्राम रामजी घोले यांनी तात्यांना जी औषध योजना केली तिची किंमत पैशाने करता येणार नाही. हे त्या काळी पुण्यात एक मोठे नामांकित डॉक्टर होते. त्यांनी तात्यांपासून औषधाचा अथवा मेहनतीचा एक पैसादेखील घेतला नाही. त्यांच्या आजाराची व आर्थिक अडचणींची वार्ता श्रीमंत सयाजीराव महाराज यांना कळताच त्यांनी एक हजार रुपये तात्यांकडे खर्चासाठी पाठविले. तशीच काही रक्कम वर लिहिल्याप्रमाणे गोसावी मित्राचा पैसा सत्यशोधक समाजाच्या फंडात जमा केला. कारण त्या पैशाचे काम आजारात पडले नाही या आजारात उजवा हात गेल्यामुळे तात्यांनी आपले लिखाण डाव्या हातानी सुरू केले होते. यावरून त्यांचा दीर्घोद्योग सहज लक्षात येईल. सत्यधर्म पुस्तक आजारातून उठल्यावर त्यांनी आपल्या डाव्या हाताने लिहिले. अडीच वर्षांनी फिरून त्यांची तब्येत त्याच रोगाने बिघडली. मरणापूर्वी दोन महिन्यापासून ते आजारी पडले होते. तथापि त्यांना थोडे चांगले वाटले म्हणजे घराबाहेरील पटांगणात बिच्छाईत घालून व टेकावयास घेऊन थोडा वेळ बसत असत. पण शेवटचे तीन चार दिवस ते घराबाहेर पडले नाहीत. त्यापूर्वी त्या दोन महिन्यात आजारात दुपारी थोडी पोळी व रात्री भात जेवत होते. पण शेवटच्या तीन दिवसात ते

साबुदाण्याची पेज व दूध घेत होते. त्यांचा आजार पूर्वीपेक्षा थोडा वाढला होता. त्यांना आपल्या मृत्यूचे भविष्य कळले असावे. पण तसे त्यांनी बोलून दाखविले नाही. त्यांनी आपल्या जेवणात बदल केल्यामुळे सर्व मंडळी संशयात होती.

शेवटच्या दोन तीन दिवसापूर्वी त्यांनी बाहेरगावच्या मित्रांना तारा व निरोप देऊन भेटीस बोलविले होते. व तसेच निरोप पुण्यातील आपल्या मंडळींना पाठविले होते. त्या दोन महिन्यात त्यांच्या आजाराची बातमी लागल्यावरून कैलासवासी मामा परमानंद, सर रामकृष्ण भांडारकर, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, श्रीमती पंडिता रमाबाई, हरी रावजी चिपळूणकर, नागेश्वर गीर, भाऊ कोंडाजी पाटील इत्यादि मोठ मोठी मंडळी त्यांना भेटून गेली होती. परंतु त्यांच्या तारेवरून व निरोपावरून ता. २७ नोव्हेंबर १८९० रोजी दुपारी मुंबईहून कै. नारायणराव लोखंडे, रामय्या व्यंकय्या, मोरोपंत वाळवेकर व आणखी मुंबईची १०- १५ मंडळी आली. ठाण्याचे डॉ. लाड हे देखील त्यादिवशी सकाळी सकाळी येऊन पोहचले. मंडळीच्या जेवणाची व्यवस्था झाली. नंतर तात्यांच्या सूचनेवरून पुण्यातील डॉ. विश्राम, मारुतराव नवले, पंडित धोंडूराम, हडपसरचे ग्यानबा ससाणे, कृष्णाजी पांडुरंग भालेकर इत्यादि मंडळीस निरोप दिल्यावरून सर्व मंडळी त्या दिवशी तिसरे प्रहरी एकत्र झाली. त्यावेळी सर्व मंडळीस भेटीस बोलविण्याचे कारण आता माझा काळ जवळ आला आहे असे सर्वांना त्यांनी सांगितले व सावित्रीबाई व यशवंतराव यांना मंडळीचे हवाली करून ते म्हणाले ‘मित्रहो! या दोघास तुम्ही सांभाळा, तुमचेवाचून त्यांना या जगात कोणी उरले नाही. मला दोन तीन दिवसापासून अशक्तता वाटते.’ सर्वांचे डोळे अश्रूंनी भरून आले. त्यावेळी त्यांनी जमलेल्या मंडळीस तेव्हा मोठा सदुपदेश केला.

‘‘माझ्या शेवटच्या वेळी तुमचे सर्वांचे दर्शन झाले आणि तुम्ही सर्व मी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे कार्य चालवीत आहात हे पाहून मला मृत्यू आला तरी मी मोठ्या आनंदाने त्याच्या स्वाधीन होईन. आपला बहुजन समाज अवनतीच्या फार खोलात उतरला आहे. त्याला वर काढून जगात उन्नतीला आणणे तुमच्या प्रयत्नावर अवलंबून आहे आणि ते प्रयत्न तुम्ही कराल याबद्दल मला बिलकुल शंका नाही. माझ्या आयुष्यात मला जे करावयाचे होते ते मी यथाशक्ती केले व त्यात मला थोडे यश आले. परंतु थोड्या यशाने माझे समाधान झालेले नाही. ते काम तुम्ही पूर्ण करावे. तुमच्या कामात अनेक

विघ्न येतील त्यावेळी डगमगू नका. सत्यावर पूर्ण विश्वास ठेवा आणि प्रयत्न करीत राहा म्हणजे ईश्वर तुम्हास खात्रीने यश देईल. मी जरी जगातून गेलो तरी माझा आत्मा याच लोकी राहून तुम्हाला मदत करील. या कामी या काळाशी झगडेन. तुम्ही जगाच्या घटनेकडे लक्ष देऊन मी गेलो तरी दुःख मानू नये.'' अशा प्रकारे बोधामृत पाजून त्यांचे सांत्वन केले.

हे बोलणे चालले असताना मंडळीत गंभीर शांतता पसरली होती. पण त्या वेळेतही काही मंडळीच्या डोळ्यातून अश्रूंची टिपे गळत होती. सावित्रीबाईंच्या डोळ्यातून तर जणू अश्रूंची नदीच वाहात होती. सावित्रीबाईंनी आता धीर सोडला होता. तात्यांबद्दलची आशा सर्वांनी सोडली होती. परंतु ते आज उद्या न मरता ४/८ दिवस जगतील इतकी सर्वांना खात्री वाटत होती. संध्याकाळपर्यंत सर्व मंडळी बसली होती परंतु मुंबईची लोखंडे व त्यांचेबरोबरची एक दोन मंडळी सोडून बाकी सर्व संध्याकाळी आपापल्या गावाकडे व घराकडे गेले.

रात्री ओतुरचे भाऊ कोंडाजी पाटील येऊन पोहचले. त्यांच्याशी तात्या अगदीच थोडे बोलले. त्यांना तात्यांनी सावित्रीबाई व यशवंता यांचेकडें माझ्यामागे लक्ष ठेवण्याबद्दल सांगितले. त्या दिवशी घरातील मंडळींनी जेवण करून झोपणे अशी रात्री तात्यांनी आठ साडेआठ वाजता सूचना देऊन थोडी घाई केली. त्यामुळे काकूना अधिकच संशय आला. ते रोजच्याप्रमाणे न झोपता आमच्याकडे पहात पडले होते. त्यांना झोप नव्हती व ते बोलतही नव्हते. आम्ही सर्व जागत बसलो. अर्धी रात्र टळून गेल्यावर त्यांनी उशाशी बसलेल्या सावित्रीबाईंचा हात धरला व म्हणाले, ''तुम्हांला काही सांगावयाचे आहे काय.'' काकू रडू लागल्या. त्यांनी काकूंशी व यशवंताशी चार दोन शब्द काढले. अखेर देवा एवढे म्हटले आणि आम्हास 'देवाचे' भजन सुरू करा असे सांगितले. पण आम्ही सर्वांनी दुसरेच भजन सुरू केले. आम्हाला न रडण्याबद्दल त्यांनी आपल्याच डोळ्याला बोट लावून खुणेने सांगितले. त्यांच्या तोंडातून काही शब्द निघत नव्हता. पुढे ते स्वस्थ पडले. देवा! देवा!! असे स्पष्ट केव्हा अस्पष्ट शब्द त्यांच्या मुखातून एकू येत. पण पुढे तेही बंद झाले. ते कधी डोळे उघडीत तर कधी लावून घेत. दिवाणखान्यातील घड्याळ्यात रात्रीचे दोन वाजून वीस मिनीटे झाली तेव्हा त्यांनी एक लहानसा उसासा टाकला आणि त्याचवेळी त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

तात्या जेव्हा अखेरचे शब्द कांकूशी व यशवंतरावाशी बोलले व आमची रडारड सुरू झाली त्यावेळीच डॉ. विश्राम यांचेकडे बोलविण्यासाठी माणसे पाठविली होती तात्यांचे प्राणोत्क्रमण होवून ५/१० मिनिटे झाली नाही तोच डॉक्टर आले. परंतु त्यांच्या येण्याचा आता काय उपयोग होता? तात्यांच्या शवाकडे पाहून डॉक्टर विश्रामनी मोठा हंबरडा फोडला. सर्वांच्या रडण्याचा एकच मोठा कल्लोळ उडाला होता.

त्यांच्या मृत्यूची बातमी शहरभर पसरली. लोकांचे थवेच्या थवे तात्यांच्या घराकडे लोटू लागले. सकाळी पटांगणात लोक मावेनात. हडपसर, खडकी, घोरपडी, झगड्यांची वाडी इ. ठिकाणी निरोप पाठवून त्यांच्या मृत्यूची बातमी कळविली. खेड्याचेही लोक येवू लागले. परंतु त्यांची मृत काया कोठे पुरावी व त्यांचे शव कोणी उचलावे याबद्दल मोठा घोळ पडला. घोळ पडण्याचे कारण त्यांनी आपल्या वाड्यातील आवारात आपले शव पुरविण्यासाठी एक समाधि बांधली होती तिच्यात मला पुरावें व माझे जे भाऊबंद ब्राह्मणांच्या पायाचे पाणी तीर्थ म्हणून पितात त्यांचा माझ्या शवाला स्पर्श होऊ देवू नये ह्या दोन गोष्टी त्यांनी आगाऊ डॉ. विश्राम व इतर सर्व मंडळीस सांगून ठेविल्या होत्या.

समाधीच्या जागी शव पुरण्याची परवानगी मिळविण्याबद्दल. डॉ. विश्रामनी सरकारी अधिकाऱ्याकडे जाऊन प्रयत्न केले पण त्यात त्यांना यश आले नाही म्हणून त्यांचे शव शहराबाहेर नेण्याचे ठरले. तथापि शव उचलताना तात्यांचे भाऊबंद आडवे आले. बाबा फुले व महादबा फुले हे म्हणू लागले की जोतीराव आमचे भाऊबंद होते, आमचे वडील होते, त्यांच्या शवास खांदा आम्ही देऊ व शवापुढील टिटवे आम्ही धरू. सावित्रीबाईनी व समाजाच्या मंडळींनी हे नाकारले. यशवंता आमचा नाही, आम्ही त्याला टिटवी धरू देणार नाही असाही फुले मंडळींनी आग्रह धरला. तात्यांचे सख्खे पुतणे पुण्यास नव्हते ते नोकरीसाठी बाहेरगावी राहत असत. पण गणपतरावांचा मुलगा यावेळी हजर होता. परंतु त्यालाही हे टिटवे भाऊबंद उचलू देईनात. गजानन फार मोठा नव्हता. त्यामुळे टिटवे धरण्याचा त्याने फार आग्रह धरला नाही. डॉ. विश्रामने पोलिसाला आणवून या भाऊबंद मंडळीस तेथून घालवून दिले.

त्यांच्या शवास निरनिराळ्या जातीच्या व मोठ्या पदवीस पोहोचलेल्या मंडळींनी खांदा देवून त्यांचे प्रेत स्मशान भूमीवर नेले. ‘टिटवे’ (गाडगे) सावित्रीबाईंनी धरले होते व त्यांच्या हातास हात लावून यशवंता व गजानन हे

दोघे दोन्हीकडून चालत होते. शहरातून तात्यांची प्रेतयात्रा चालू असताना लोकांत हाहाकार उडाला होता. सर्व लोकांना दु:ख झाले होते. काही महारमांग तर मोठ्याने रडत होते. स्मशान भूमीवर प्रेत ठेवले तेव्हा २-२।। हजार समुदाय होता. तेथेच अग्नी देण्यापूर्वी डॉ. विश्राम, भाऊ कोंडाजी पाटील, कृष्णराव भालेकर, यशवंत इत्यादिंची शोकपर भाषणे झाली व दुपारी एक वाजता त्यांच्या प्रेतांस अग्नी दिला.

तिसऱ्या दिवशी त्यांच्या अस्थी वाजतगाजत, दांडपट्टा, लेझीम वगैरे मर्दानी खेळ खेळत मिरवणूक काढून मोठ्या थाटाने घरी आणल्या. तात्यांच्या प्रेतावर फुले उधळण्यात आली होती. तशीच लोकांनी त्यांच्या अस्थीवरही उधळली आणि अस्थी त्यांच्या बांधलेल्या समाधीत ठेवून देण्यात आल्या. त्यांची दशक्रिया व तेरावे केले परंतु या प्रसंगी, केस देणे, भाताचे पिंड पाडून कावळ्यापुढे टाकणे अशा खुळ्या रूढीस फाटा दिला होता. अशा प्रकारे या महात्म्याचे चरित्र आटोपले.

जोतीराव हे खरोखर मोठे महात्मे होऊन गेले आहेत. त्यांनी मानव जातीच्या उद्धारासाठी जन्मास येऊन मोठे कार्य केले आहे, असेच मी म्हणतो. त्यांचे कार्य कोणत्याही एका जातीकरिता नव्हते तर ते अखिल मानव जातीकरिता होते. म्हणूनच त्यांना महात्मा म्हटले पाहिजे. श्रीमंत सयाजीराव गायकवाड हे त्यांना महात्मा म्हणत असत व त्यांच्या सुचनेवरूनच मुंबई येथील लोकांनी जोतीरावांच्या मरणापूर्वी सुमारे तीन वर्षे अगोदर एक सभा भरवून त्या सभेत त्यांना महात्मा हा किताब दिला होता. यावरून सयाजीराव महाराजांसारख्या मोठ्या विद्वानांनी त्यांचा जो गौरव केला तो योग्य होता यात संशय नाही. त्यांच्या हयातीत त्यांना 'महात्मा' या शब्दाने कोणी फारसे संबोधत नव्हते. परंतु उमलणाऱ्या फुलाप्रमाणे त्यांच्या कार्याचा व कीर्तीचा परिमल आता सर्व देशभर पसरू लागला आहे. हे दृश्य पाहून माझ्यासारख्या वृद्धास नेहमी आनंदाचे भरते येणे हे साहजिकच आहे. येथे वर त्यांच्या चरित्राचे थोडक्यात वर्णन केले. आता त्यांच्याविषयी काही आठवणी मी पुढे लिहितो -

१) माझ्या लहानपणाची गोष्ट. मी सुमारे ९-१० वर्षांचा असेन तेव्हा माझे वडील वारले. रीतीप्रमाणे त्यांचा दिवस झाला. त्या दिवशी तीन चारशे लोकांची पंगत घरासमोरील गल्लीत बसली. जेवणासाठी वरण-भात पोळी होती. पंगतीची जागा झाडलोट केलेली होती. आणि खेड्यातील पंगतीचे अन्न कसे असते हे

सर्वांना माहीती असतेच. तात्या त्या पंगतीत बसून सर्वांबरोबर जेवले. यावरून त्यांचे अंगी किती मोठेपणा होता हे आज आपणास दिसून येते.

२) मी एके दिवशी सकाळी ९ वाजता तात्यांच्या मांजरी येथील बागेत गेलो असता तेथे मजूर मंडळींची न्याहारीची एक लहानशी पंगत बसली होती. जवळ जाऊन पाहतो तो तात्या त्याच पंगतीत बसले होते. सर्वांच्या भाकरी एके ठिकाणी करून गोपाळकाला चालू होता. पंगतीला मळ्यातील गाजरे, मूळे, कांदे, लसूण, मुळ्याच्या शेंगा इ. ताजामेवा भाकरीबरोबर तोंडी लावण्यास ठेविला होता. ते पाहून माझ्या तोंडास पाणी सुटल्यास नवल नाही. तात्यांनी मला जवळ बोलावून घेतले व पंक्तीत सामील करून घेतले. मलाही तेच पाहिजे होते. जेवण मोठ्या बहारीचे होते. कधी कधी तात्या या मजूर मंडळीबरोबर अशा प्रकारे न्याहरीच्या मेजवान्या झोडीत असत.

३) एकदा महात्मा जोतीराव हे श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड भेटीस गेले असता आपल्या दिवाणखान्यात ठेवण्यासाठी महाराजांनी आपला एक फोटो मजकडे पाठवून द्यावा, अशी त्यांनी महाराजांना सूचना केली. थोड्याच दिवसात चांगला फोटो घेऊन पाठवितो असे महाराजांनी सांगितले. ४/८ दिवसांनी महाराजांचा एक मनुष्य फोटो घेऊन आला. फोटोत महाराजांच्या अंगावर अलंकार चढविलेले होते. तात्यांनी तो फोटो परत केला व त्या मनुष्याबरोबर महाराजांना पत्र लिहून पाठविले की, तुमचा राजेशाही श्रीमंती फोटो मला नको ! साध्या कपड्यात अलंकार न घालता फोटो घेऊन तो माझ्याकडे पाठवावा. नंतर काही दिवसांनी महाराजांनी आपला दुसरा एक फोटो पाठवला. त्यात महाराजांचा पोषाखं साधां होता. अंगावर एकही अलंकार घातलेला नव्हता. महाराज घोड्यावर बसलेले होते. त्यांच्या कमरेला एक लटकती तलवार होती. घोड्याचा लगाम दोन्ही हातानी धरलेला होता. हा फोटो तात्यांना फार आवडला व तसे पत्र महाराजांना लिहून त्यांनी कळविले. महाराजांचा हा फोटो तात्यांनी आपल्या दिवाणखान्यात मुख्य दरवाज्यावर लावून ठेवला होता.

४) तात्यांनी महार मांगांच्या शाळा घातल्या होत्या. त्यावेळी त्यांचा प्राण घेण्यासाठी जे दोन मारेकरी गेले होते. त्यातील एक धोंडीराम नामदेव हा होता. तो पुढे तात्यांचा शिष्य झाला. तात्याच्या सूचनेवरून तो काशीत जावून शिकला – व पंडित झाला. हा पंडित अहोरात्र तात्यांचे देखरेखीखाली सत्यशोधक

समाजाचे प्रचारकार्य करीत असे. हा पंडित संस्कृत ग्रंथातील दाखले देऊन ब्राह्मणांचे कपट लोकांना व्याख्यानाद्वारे सांगत असे. एके दिवशी पुण्यात शनवारवाड्यापुढे संध्याकाळी ६ वाजता त्यांचे व्याख्यान झाले. सभेत एक ब्राह्मण पोलीस इन्स्पेक्टर आला होता. पंडितचे व्याख्यान ऐकून त्याला फार चीड आली व त्याने दुसऱ्या पोलिसाच्या मदतीने पंडितास पोलीस ठाण्यावर नेऊन हवालदारीमध्ये बंद केले. तात्या घरी होते. त्यांच्या कानी वार्ता पडताच ते पोलीस ठाण्यावर गेले, त्यांना पाहून तो ब्राह्मण पोलीस इन्स्पेक्टर घाबरला. आणि तात्या बोलू लागताच त्याने तात्यांची माफी मागितली. तात्यांनी त्याला क्षमा केली व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना आपण याबद्दल लिहिणार नाहीं याबद्दल कबूल केले. पंडितास मी बरोबर घेऊन घरी आलो.

५) चांदण्या रात्रीच्या दिवसात कधी कधी यशवंताकडे त्याचे मित्र येऊन अंगणात गोष्टीगप्पा चालत असत. त्यात तात्या झोपले आहेत अशी सगळ्यांची समजूत झाली म्हणजे आमच्या त्या बैठकीतील गोष्टींना चांगला रंग चढत असे. एखादे वेळी तात्यांनी न झोपताच मुद्दाम त्या गोष्टी ऐकाव्यात आणि मग ऐन रंगात आमच्यात येऊन बसावे व त्यांनीही गंमतीच्या गोष्टी सांगून या बैठकीला चांगला रंग चढवावा. लहान मुलांच्या करमणुकीत सामील होणे त्यांना फार आवडत असे. अशा वेळी रात्री फार जागणे बरे नाही अशी शेवटी ते मुलांना सूचना करीत असतं.

६) ब्राह्मण जातीचे लोक इतर जातीच्या लोकांना हलके मानून आपल्या घरातील सारवण, सडा घालणे, भांडी घासणे, कपडे धुणे इ. हलकी कामे इतर जातीच्या स्त्रियांकडून करवितात, परंतु इतर जातीच्या श्रीमंत लोकांकडे ती कामे गरीब स्थितीतील ब्राह्मण स्त्रियांना करू देत नसत. ही गोष्ट जोतीरावांच्या मनाला टोचत असे. त्यामुळे मुद्दाम त्यांनी एका ब्राह्मण जातीच्या वृद्ध बाईस आपल्याकडे घरातील हलकी कामे करण्यासाठी मोठा पगार देऊन नोकरीस ठेविले होते. त्या बाईचे नाव गंगूबाई असे होते. ती घरातील सडा, सारवण, झाडलोट, भांडी घासणे, कधी कधी स्वयंपाक करणे ही कामे करीत असे. ब्राह्मणांना हिणवण्यासाठी मुद्दाम तात्यांनी नोकरीस ठेविले होते. परंतु तिला ते मानाने वागवीत असत. घरातील मंडळी व तात्या तिला बहुमानने 'माई' या शब्दाने हाक मारीत असत. त्यांचे हे कृत्य जेव्हा काही ब्राह्मणांना कळले तेव्हा त्यांना ते फार झोंबले. या बाईला मूलबाळ नव्हते. तिची स्थिती गरीबीची

होती. ती सुमारे १।। वर्षे तात्यांकडे नोकरीस होती. नंतर पुण्याच्या काही ब्राह्मणांच्या कारवाईवरून बाहेरगावचा तिचा एक नातेवाईक तिला आपल्या घरी पाहुणी म्हणून नेण्यासाठी आला व ती तात्यांकडून १५ दिवसांची रजा घेऊन आपल्या नातलगाकडे गेली. त्या नातलगाने तिला पुन्हा पुण्यास येऊ दिले नाही. ब्राह्मण व ब्राह्मणेतरातील स्त्रियांत हा जो विषमभाव होता त्यावर 'कुळंबीण' या नावाखाली तात्यांनी तेरा अखंड रचून ते अखंड त्या वेळच्या दीनबंधू पत्रातून प्रसिद्ध केले होते.

७) इ. स. १८८८ च्या मार्च महिन्याच्या दोन तारखेची गोष्ट. कै. हरी रावजी चिपळूणकर यांनी पुणे येथे महाराणी व्हिक्टोरियांचा मुलगा ड्युक ऑफ कॅनाट, जो दक्षिण हिंदुस्थानातील फौजेचा मुख्य अधिकारी होता त्याला मोठी मेजवानी दिली. जोतीरावांना या मेजवानीचे आमंत्रण होते. ते त्या वेळी मेजवाणीसाठी गेले तेव्हा घरून निघताना त्यांनी आपल्या डोक्यावर एक जुने पागोटे बांधले होते. अंगात अंगरखा न घालता एक घोंगडी खांद्यावर घेतली होती. एक टोंगळ्याबरोबर येईल इतके आखूड धोतर ते नेसले होते. हातात एक काठी घेतली होती आणि पायात एक फाटका जोडा घातला होता. तो जोडा दोरीने बांधून दुरुस्त केला होता. अशा प्रकारे शेतीत काम करणाऱ्या शेतकऱ्याप्रमाणे शुद्ध शेतकऱ्यांचे कपडे अंगावर घालून कमरेला एक विळा खोचला होता. अशा थाटाने शेतकरी बनून ते मेजवानीसाठी गेले. अशा या जंगली मनुष्यास मेजवानीच्या जागी फाटकावरील सोल्जर लोक आत जाऊ देत नव्हते. ही गोष्ट हरी रावजी यांना कळली तेव्हा त्यांनी सोल्जराची समजूत घालून तात्यांना आत नेले.

ड्यूक ऑफ कॅनाट आले व आपल्या खूर्चीवर बसले तेव्हा त्यांना हे जंगली मनुष्य जोतीराव मेजवानीस बसलेले दिसले. त्यांना पाहून ड्यूक ऑफ कॅनाटला कौतुक वाटले व तो मधून मधून तात्यांकडे सारखा पहात असे. त्याला तात्यांची ओळख नव्हती. खाना झाल्यानंतर तात्यांनी हरी रावजीच्या सुचनेवरून एक लहानसे भाषण केले. हा जंगली मनुष्य काही बोलणार व तो इंग्रजीतून बोलणार ही गोष्ट हरी रावजींनी राणीच्या पुत्राला सांगितली. त्यावेळी त्याला मोठे नवल वाटले. तात्यांचे ते भाषण त्याने मोठे लक्षपूर्वक ऐकले. तात्या ड्यूक ऑफ कॅनाटला उद्देशून म्हणाले की, 'महाराज! आपणास मेजवानी देणारे व त्याप्रसंगी मेजवानीस येणारे प्रसंग पाहून अथवा आपल्या सारख्या

मोठ्या लोकांच्या भेटीसाठी कधीकाळी येणारे मोठेमोठे ऐतद्देशीय लोक पाहून या देशातील लोकांच्या स्थितीबद्दल आपण जी कल्पना करून घेतली असेल ती सोडून द्यावी. आपणास दिसणारी ह्या एतद्देशीय लोकांची संख्या या देशात फार मोठी नाही. ती अगदीच लहान आहे. या देशात राहणाऱ्या लोकांचा फार मोठा वर्ग खेड्यातून राहतो आणि त्यांचा मुख्य धंदा शेतीचा आहे. या शेतकऱ्यांची संख्या बळिस्थानातील (हिंदुस्थानाला ते नेहमी बळिस्थान म्हणत असत. या देशास भरत राजावरून जसे भारत म्हणतात तसे बळिराजावरून जोतीराव हिंदुस्थानास बळिस्थान असे म्हणत असत.) एकंदर लोकसंख्येत शेकडा ८० इतकी मोठी आहे. या देशातील लोकांचा मुख्य धंदा शेतकीच आहे. जगात सुधारलेल्या या इंग्रजांच्या राज्यात तरी शेतकऱ्यांची सर्वांगीण सुधारणा होईल अशी शेतकऱ्यांना फार आशा वाटत होती. परंतु या लोकांची स्थिति कशी आहे हे आमच्या दयाळू राणीला बरोबर कळले नसल्यामुळे अजून शेतकऱ्यांच्या खऱ्या सुधारणेचे कार्य तिच्या या देशातील सरकारकडून पाहिजे तसे होत नाही. या देशातील २० कोटी शेतकऱ्यांची कशी हीन दशा आहे हे आपल्या लक्षात यावे म्हणून मी खऱ्या शेतकऱ्याच्या पोषाखात आपल्यासमोर उभा आहे. अशा दीन स्थितीत या देशातील २० कोटी शेतकरी दिवस कंठीत आहेत. आपण विलायतेला जाल तेव्हा महाराज, आपण आपल्या दयाळू आईला भेटून तिच्या कानावर आमच्या एकंदर २० कोटी शेतकऱ्यांच्या दुःस्थितीची कहाणी घाला. आणि या शेतकऱ्यांचा एकच पण अति महत्वाचा संदेश तिच्या कानावर घाला की, तुझ्या त्या दुःस्थितीत पडलेल्या खऱ्या प्रजेला प्राथमिक शिक्षण सक्तीने मोफत दे आणि त्यांच्या सर्वांगीण सुधारणेचा प्रयत्न तुझ्या हिंदुस्थानातील सरकारकडून जलदीने कर. म्हणजे हा बळिस्थान उन्नतीच्या उच्च शिखराला पोहचेल आणि त्याबरोबरच तुझी आणि विलायतेच्या लोकांची कीर्ती अजरामर होईल. बळिस्थानातील एकंदर सर्व शेतकऱ्यांच्यातर्फे मी सांगितलेला हा संदेश आमच्या कृपाळू महाराणीला आपण जरूर सांगावा अशी मी एकच विनंती आपल्याला आग्रहपूर्वक करतो.'

इतके भाषण केल्यावर जोतीरावांनी ड्युक ऑफ कॅनाट साहेबांचे मेजवानीस आल्याबद्दल आभार मानले. त्यावर राणीच्या पुत्राने मेजवानी देवून गौरव केल्याबद्दल हरी रावजी व इतर उपस्थित मंडळीचे आभार मानले. आणि जोतीरावांनी शेतकऱ्यांचा दिलेला निरोप भेटी अंती मी आपल्या आईच्या

कानावर घालीन असे सांगितले. यावरून वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या कानावर शेतकरी लोकांची दाद पोहचविण्याचे काम तात्या कसे कळकळीने करीत असत हे कोणासही दिसून येईल. मेजवानीत उडालेली ती मौज तात्यांनी घरी परत आल्यावर काकूंना सांगितली त्यावेळी काकूंना व आम्हा सर्वाना मोठा आनंद वाटला. या मेजवानीची व त्या प्रसंगी तात्यांनी केलेल्या भाषणाची हकिकत दीनबंधू पत्रात प्रसिद्धीसाठी पाठविली होती व त्यात छापली गेली होती.

८) जोतीरावांचे काही ब्राह्मण मित्र होते, त्यात मोरो विठ्ठल वाळवेकर हे त्याचे फार जिवलग स्नेही होते. वाळवेकर मुंबईवरून पुण्यास आले म्हणजे बहुतेक वेळा तात्यांकडे उतरत असत. त्यांच्या व वाळवेकरांच्या मौजेच्या गोष्टी चालल्या म्हणजे ऐकणाऱ्यास बहार वाटे. ते एकमेकांची थट्टा करीत असत. वाळवेकरांनी तात्यास म्हणावे, तू नुसता भाजी विक्या आहेस. यावर तात्यांनी म्हणावे की, अरे मोरबा, तू काही मुळचा ब्राह्मण नव्हे. जेव्हा इराणी आर्यभट्ट बळीस्थानावर चाल करून आले व त्यांनी हा देश जिंकला तेव्हा त्यांचा अंमल बसविण्यासाठी त्यांनी येथील मूळच्या क्षत्रियांपैकी ज्या लोकांना बाटवत ब्राह्मण करून घेतले व या बाट्या ब्राह्मणांना देशावर गावजोशी व कुलकर्णी बनविले त्यापैकी तू बाटून झालेला ब्राह्मण आहेस, तुझे रक्त आमच्या क्षत्रियांचे आहे. 'तात्यांनी इतके म्हटले की वाळवेकरांनी मोठ्याने हसावे व काकूंना म्हणावे, काकू पाहिलेस हा जोतीबा कसा टारगट आहे तो! ह्यावर सर्वांनीच हसावे.'

**संदर्भ :**


- आम्ही पाहिलेले फुले : संपादक – हरि नरके, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, द्वारा – उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, १९९३, पृ. क्र. ३–२३.


*(टीप : शुद्धलेखन मूळ लेखाबरहुकूम)*

## वाचनीय पुस्तके

**रानडे, गांधी आणि जीना : १९४३ सालच्या इंग्रजी भाषणाचं नवीन मराठी भाषांतर विवरणात्मक टिपांसह, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, भाषांतर व टिपा– अवधूत डोंगरे, साधना प्रकाशन, पुणे, २०२६, पृष्ठे – २१३, किंमत – रुपये – ३००/–.**

'प्रबोधनपुरूष' अशा सार्थ उपाधीने ज्यांचा गौरव केला जातो त्या न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा १८ जानेवारी १८४२ हा जन्मदिवस. न्यायमूर्ती रानडे यांच्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनात अतीव आदर वसत असे. तेव्हा, न्यायमूर्ती रानडे यांच्या१०१व्या जन्मदिवसाचे औचित्य साधून तारीख १८ जानेवारी १९४३ या दिवशी बाबासाहेबांचे व्याख्यान पुण्यातील गोखले हॉलमध्ये आयोजित करण्यात आले. न्यायमूर्ती रानडे यांच्या विविधांगी कार्यकर्तृत्वाचे विलक्षण विश्लेषक विवेचन बाबासाहेबांनी त्या व्याख्यानादरम्यान केले. रानडे यांनीच स्थापन केलेल्या डेक्कन सभेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या त्या प्रसंगी बाबासाहेबांनी इंग्रजीमधून केलेले ते व्याख्यान थॅकर ॲन्ड कंपनीने १९४३ सालातील एप्रिल महिन्यात छापील स्वरूपात प्रकाशित केले. आता, त्याच संहितेचा 'रानडे, गांधी आणि जीना' या शीर्षकाचा, प्रसिद्ध अनुवादक अवधूत डोंगरे यांनी अक्षरबद्ध केलेला सटीप मराठी अनुवाद, 'साधना प्रकाशन' या संस्थेने प्रकाशित केला आहे. न्यायमूर्ती रानडे यांच्या कार्यकलापाचे अ–साधारणत्व प्रगल्भपणे विवरत असतानाच, रानडे यांच्या संदर्भात, त्या काळात प्रचलीत असणाऱ्या अ–यथार्थ धारणांचे बाबासाहेबांनी केलेले विलक्षण तर्कशुद्ध व धारदार निराकरण केवळ अजोड असेच आहे. न्यायमूर्तींचे लोकोत्तरत्व अधोरेखित करतेवेळी, बाबासाहेबांनी त्यांच्या भाषणादरम्यान, इतिहास आणि इतिहास घडवण्यामध्ये योगदान देणाऱ्या लोकाग्रणींच्या ठायी कोणती गुणसंपदा नांदती असणे अनिवार्य ठरते यांबाबत मांडलेले विश्लेषण कमालीचे उद्‌बोधक ठरते. अतीताचा अंश बनलेल्या समाजपुरूषांच्या कार्यकर्तृत्वाचे सादर मूल्यमापन किती सघनपणे करता येते, याचा आदर्श वस्तुपाठ म्हणजे बाबासाहेबांचे हे भाषण होय. विलक्षण वाचनीय आणि विचारप्रक्रियेला गती बहाल करणारा असाच हा छोटेखानी परंतु आशयबहुल दस्तऐवज आहे.■■

**RNI Regn. No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model colony Post Office Pune,**
**On 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग-व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राकिय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११ ०३०. येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**

## INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY

## OTHER PUBLICATIONS

*Marathi Monthly:*
*ARTHABODH-PATRIKĀ*,
(Subscription Rs. 100/- per year)

*Books and Booklets:*

1. *Bhāratāteel Lok-Sankhyā Wādhichā Prashna: Santati-Niyamanāchee Jaruree Wa Tyāteel Yash,* (The Problem of Population Growth in India: The Need for Family Planning and its Success) (in Marathi) by Kumudini Dandekar, Pp. 60, Rs. 30/-.

2. *Compulsory Primary Education - Opportunities and Challenges,* Second Edition, (in English and Marathi), by Jayakumar Anagol, Pp. 54 and 61, Rs. 30/-.

3. *Shodh Ghetay Tay Shikshan,* (To Searches is Education), (in Marathi), by Ramesh Panse, Pp. 67, Rs. 50/-.

4. *Kartā-Karvitā, Adhunik Mendu-Sanshodhan va Aple Jeevan,* by Ramesh Panse, Rajyashree Kshirsagar, Anita Belhekar-Deshmukh, Pp. 242, Rs. 350/-.

5. *Governance, Supervision and Market Discipline: Lessons from Enron* by Jayanth R. Varma, Pp. 87, Rs. 100/-. Reprint from (*Journal of Indian School of Political Economy,* Vol. XIV, No. 4, October-December 2002)

6. *Poverty in India,* (Reprint 2008), by V.M. Dandekar and N. Rath, Reprinted by Books for Change Bangalore, Pp. vi+140, Price Rs 200/-

## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक
## वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २००/– रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/– रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/– रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८००/– रुपये** |

**The Bank details for NEFT are as under :**

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**